७० वर्ष

दैनिक संध्या

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

मंगळवार, दि. १७ मार्च २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ०८१ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रूपये

## दारू सोडा आणि ८० लाख मिळवा; चर्चेला उधाण

पुणे (दै. संध्या) : एकीकडे व्यसनाधीनतेमुळे अनेक संसार उद्ध्वस्त होत असताना, राजस्थानमधील एका मंत्र्याने गावाला व्यसनमुक्त करण्यासाठी एक अनोखी शक्कल लढवली आहे. "तुम्ही फक्त दारू सोडा, मी तुम्हाला गावाच्या विकासासाठी ८० लाख रुपये देईन," अशी जाहीर ऑफर राज्याचे शिक्षण आणि पंचायती राज मंत्री मदन दिलावर यांनी दिली. मंत्र्यांने दिलेल्या अजब ऑफरची सोशल मीडियावर जोरदार चर्चा सुरू आहे. मंत्री मदन दिलावर हे सध्या कोटा जिल्ह्यात जन हिताय-जन सुखाय पदयात्रेवर आहेत. या पदयात्रेच्या शेवटच्या दिवशी ते भैरूपुरा गावात पोहोचले. त्यावेळी गावकऱ्यांनी मंत्र्यांकडे रस्ते, नाली आणि इतर विकासकामांची मागणी केली. यावर बोलताना मंत्र्यांनी एक अट घातली. मदन दिलावर म्हणाले की, "मी तुमच्या सर्व मागण्या पूर्ण करेन, पण त्या बदल्यात तुम्हाला दारू सोडावी लागेल. आजपासून तुम्ही दारू पिणार नाही, अशी शपथ घेतली तरच मी हा निधी मंजूर करेन." सुरुवातीला मंत्र्यांची ही अट ऐकून गावकरी काहीसे गोंधळले आणि शांत झाले.

# ८६४ पुनर्वसन सदनिकांचे वितरण

## ■ बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पामुळे रहिवाशांच्या जीवनमानात सुधारणा होणार – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ■



**मुंबई (दै. संध्या)**

मुंबईतील मध्यमवर्गीयाच्या घराचे स्वप्न साकार करण्यासाठी हे शासन कटिबद्ध आहे. मुंबईतील बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाचा विकास होऊन रहिवाशांच्या जीवनमानात मोठी सुधारणा होणार असल्याचे सांगून बीडीडी चाळीतील रहिवाशांनी आपली घरे विकू नये, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरण (म्हाडा) मार्फत नायगाव बीडीडी चाळ पुनर्विकास प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील ८६४ पुनर्वसन सदनिकांचे वितरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले.

मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, बीडीडी चाळींचा पुनर्विकास प्रकल्प अनेक वर्षे प्रलंबित होता यामध्ये अनेक अडचणी होत्या. यामुळे राज्य शासनाने निर्णय घेतला की, व्यावसायिक बिल्डरच्या भरवशावर अवलंबून न राहता हा प्रकल्प राज्य शासन करेल. देशातील सर्वोत्तम कंपन्यांना हे काम देऊन हा प्रकल्प उत्तमरित्या तयार झाला. मुंबईतील इतर पुनर्विकासाचे काम वेगाने झाले पाहिजे यासाठी शासनाचा प्रयत्न सुरू असून २०२९ पर्यंत सर्व घराच्या चाव्या रहिवाशांना देण्याचे उद्दिष्ट्य आहे.

नायगाव, वरळी या ठिकाणची कामे अतिशय सुंदर झाली आहेत. बीडीडी येथील रहिवांशाना सर्व पायाभूत सुविधा देण्याचा प्रयत्न या ठिकाणी झाला आहे. नायगाव येथील पार्किंगच्या समस्येबाबत मार्ग काढू असे आश्वासनही मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. या ठिकाणी असलेल्या भवानी माता मंदिराबाबतचा प्रश्न सोडवण्यासाठी ९०० चौरस फूट जागा दिली जाणार आहे. बीडीडी चाळीला फार मोठा इतिहास आहे अण्णा भाऊ साठे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर अशा नवरत्नांची खाण या बीडीडी चाळीत राहिलेली आहे. यावर पुस्तक लिहिले पाहिजे असा मानसही मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, मुंबईतील अनेक ठिकाणी चाळीत राहणाऱ्या नागरिकांना अडचणींचा सामना करावा लागतो. सामान्य माणसामुळे मुंबई आहे. संस्कृती जपणारा मुंबईकर आहे. मुंबईतील व्यक्तींना मुंबईतच घर मिळाले पाहिजे.

जेवढे प्रकल्प हाती घेतले आहे ते पूर्ण करण्यासाठी राज्य शासन प्रयत्नशील आहे. पोलीसांना हक्काचे घर मिळाले पाहिजे यासाठी प्रयत्नशील असून त्यांच्या घराच्या किमतीच्या प्रश्नांबाबत उपमुख्यमंत्री तथा गृहनिर्माण मंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी बोलून तो सोडवला जाईल, तसेच यासाठी लागणारे समग्र धोरण तयार करावे लागेल.


२०१६ मध्ये पोलिसांना मालकी हक्काचे घर मिळावे यासाठी धोरण आणले आहे, त्यामध्ये सुधारणा कशी करता येईल यासाठी प्रयत्न केला जाईल. तसेच यासाठी कायदेशीर व्यवहारिक मार्ग काढता येईल यासाठी प्रयत्नशील असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले. पुर्नविकासाबाबत मुंबईमधील जवळपास एक हजार एकरचे पुर्नविकास प्रकल्प हाती घेण्यात आले आहेत. मोठ्या प्रमाणात मुंबई बदलणार आहे सामान्य माणसाला घर मुंबईत मिळणार आहे.

सामान्य माणसाचे जीवनात बदल घडवून राज्य शासन प्रयत्नशील आहे. बीडीडी वासीयांना जास्तीत जास्त सुविधा देण्याचा प्रयत्न केला जाणार असून नागरी पुनरुत्थानाच्या दृष्टीने आशिया खंडातील पहिला व सर्वात मोठा पुनर्विकास प्रकल्प म्हणून या उपक्रमाकडे पाहिले जात आहे. या प्रकल्पाअंतर्गत जुन्या १६० चौ. फूट घरांऐवजी रहिवाशांना सुमारे ५०० चौ. फूट क्षेत्रफळाच्या अत्याधुनिक सोयी-सुविधांनी युक्त टू बीएचके सदनिका विनामूल्य देण्यात येत आहेत.

## साहित्य अकादमी पुरस्काराची घोषणा; ‘काळ्यानिळ्या रेषा’ची निवड

**मुंबई (दै. संध्या)**

साहित्य क्षेत्रातील अत्यंत मानाच्या अशा साहित्य अकादमी पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. मराठी भाषेतून साहित्यिक राजू बाविस्कर यांच्या काळ्यानिळ्या रेषा या आत्मचरित्राची साहित्य अकादमी पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. मराठी भाषेतून शिफारस करण्यात आलेल्या एकूण 11 पुस्तकांमधून बाविस्कर यांच्या साहित्य कृतीची पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. राजू बाविस्कर हे एक प्रसिद्ध मराठी चित्रकार आणि लेखक आहेत. त्यांच्या साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी त्यांना अत्यंत प्रतिष्ठेचा साहित्य अकादमी पुरस्कार जाहीर झाला आहे. त्यांना




सन्मानचिन्ह (कोरीव ताम्रपट), शाल आणि 1 लाख रुपये रोख रक्कम पुरस्काराच्या स्वरुपात दिली जाईल. 31 मार्च 2026 रोजी नवी दिल्ली येथे आयोजित एका समारंभात हा पुरस्कार प्रदान केला जाईल. राजू बाविस्कर यांचे 'काळ्यानिळ्या रेषा' हे आत्मकथन विशेष गाजले आहे. राजहंस प्रकाशनाने हे पुस्तक प्रकाशित केले असून त्यात त्यांनी आपल्या चित्रकला प्रवासासोबतच वंचित वर्गातील संघर्षाचे चित्रण केले आहे.

## वाढत्या अतिक्रमणांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना राबवा

**मुंबई (दै. संध्या)**

मुंबई शहरातील वाढत्या अतिक्रमणांच्या समस्येवर प्रभावी उपाययोजना करण्यासाठी सर्व संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून एप्रिल महिन्याच्या शेवटपर्यंत कारवाईचा ठोस आराखडा तयार करावा, असे निर्देश मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.आशिष शेलार यांनी दिले. अतिक्रमण ओळखण्यासाठी नेत्रम या आज्ञावलीबरोबरच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून सॅटेलाईट मॅपिंग, ड्रोन सर्व्हे आणि मोबाईल ॲपच्या माध्यमातून माहिती संकलित करण्यावरही भर देण्याचेही त्यांनी निर्देश दिले. माहिती तंत्रज्ञान मंत्री तथा मुंबई उपनगर जिल्ह्याचे पालकमंत्री ॲड.शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयीन दालनात बैठक झाली.



या बैठकीस आमदार मिहिर कोटेचा, पर्यावरण विभागाच्या सचिव जयश्री भोज, मुंबई उपनगर जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्र विकास महामंडळाचे मिलिंद बोरीकर यांच्यासह झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई महानगरपालिका, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते.

आजच्या बैठकीत 2000, 2011 ते 2025 या कालावधीत मुंबईत उभ्या आणि आडव्या स्वरूपात झालेल्या अतिक्रमणांचा आढावा घेण्यात आला. शहरातील विविध भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर अनधिकृत बांधकामे, वाढीव मजले निदर्शनास आले. या अतिक्रमणांचे मॅपिंग करून संबंधित विभागांनी कारवाईसाठी संयुक्त कृती आराखडा तयार करावा, असे निर्देश पालकमंत्री ॲड.शेलार यांनी दिले. मुंबईतील नाले, नद्या आणि मोकळी जमीन अतिक्रमणमुक्त केल्याशिवाय शहराचा शाश्वत विकास शक्य नाही. त्यामुळे सर्व यंत्रणांनी समन्वयाने काम करून अतिक्रमणांवर टप्प्याटप्प्याने कारवाई करण्यासाठी विस्तृत आराखडा तयार करण्याचे निर्देश पालकमंत्री ॲड.शेलार यांनी दिले. हा आराखडा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमोर मांडून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचेही पालकमंत्री ॲड. शेलार यांनी स्पष्ट केले.

## भाजपची सत्ता असूनही बळजबरीने धर्मांतरांच्या संख्येत वाढ

**मुंबई (दै. संध्या)**

■ याला जबाबदार कोण? उद्धव ठाकरेंचा सवाल; विरोधी पक्षनेते पदावरूनही टीका

शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी पत्रकार परिषद घेत अनेक विषयांवर भाष्य केले आहे. धर्मांतर विरोधी कायद्याला देखील त्यांनी पाठिंबा दर्शवला आहे. तसेच दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही, त्यावरून सरकार घाबरत आहे का? असा सवाल देखील त्यांनी उपस्थित केलाय.

धर्मांतराच्या मुद्द्यावर बोलताना उद्धव ठाकरे म्हणाले, आता गेल्या काही वर्षांमध्ये जास्त करून भाजप प्रणीत सरकार राज्य आणि केंद्रात सत्तेवर आहे. असे हे सरकार असताना सुद्धा बळजबरीने किंवा फसवून धर्मांतराच्या संख्येत वाढ झाली असेल




तर ते अपयश कोणाचे आहे? याचे उत्तर मिळाले पाहिजे. नेमके कोणत्या समाजात, कोणत्या विभागात धर्मांतर होत आहेत, याची माहिती दिली तर आम्हाला सुद्धा सावध राहता येईल. आमचे सुद्धा कार्यकर्ते तिथे तत्पर राहतील. बळजबरीने कोणी धर्मांतर करत असेल तर त्याला आम्ही सुद्धा विरोध करू, असे म्हणत धर्मांतर विरोधी कायद्याला पाठिंबा असल्याचे देखील ठाकरेंनी यावेळी स्पष्ट केले.

उद्धव ठाकरे यांनी विरोधी पक्ष नेते पदावर भाष्य करताना म्हटले की, इतिहासात आम्ही पहिल्यांदाच असे पाहत आहोत की दोन्ही सभागृहात विरोधी पक्षनेता नाही. का घाबरत आहे सरकार? आम्ही प्रत्येक वेळेस जाऊन त्यांना विनंती केली होती. पण त्यांनी यावर अद्यापही निर्णय घेतला नाही. हे सगळे एकतर्फे कारभार सुरू असल्याची टीका ठाकरेंनी केली आहे. बेळगावमध्ये वर्ल्ड कप जिंकल्यानंतर महाराष्ट्र गीत काही मराठी तरुणांनी वाजवत जल्लोष केला होता. त्यानंतर त्यांच्यावर गुन्हे दाखल करण्यात आले होते. याविषयी प्रश्न विचारला असता उद्धव ठाकरे म्हणाले, महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांनी हस्तक्षेप केला पाहिजे. सरकार कोणाचेही असो, मराठी माणसांवर जसे जोरजबरदस्ती धर्मांतराला आम्ही विरोध करत आहोत, तसेच जोरजबरदस्ती भाषा, मग ती कोणाचीही असो, ती लादणे अयोग्य आहे. केंद्र सरकारने यात हस्तक्षेप केला पाहिजे.

## धर्मांतरविरोधी कायदा सर्वात वाईट

### असदुद्दीन ओवेसी यांची टीका

**मुंबई (दै. संध्या)**

महाराष्ट्रात प्रस्तावित असलेल्या धर्मस्वातंत्र्य विधेयक 2026 वरून राजकीय वातावरण तापले आहे. अखिल भारतीय मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन पक्षाचे अध्यक्ष असदुद्दीन ओवेसी यांनी या विधेयकावर तीव्र टीका केली आहे. भारतातील विविध राज्यांमध्ये लागू असलेल्या धर्मांतर विरोधी कायद्यांपेक्षाही महाराष्ट्राचा प्रस्तावित कायदा अधिक कठोर असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. सामाजिक माध्यमावर केलेल्या प्रतिक्रियेत त्यांनी या विधेयकाला सर्वात वाईट, अशा कायद्यांपैकी एक असे संबोधले. त्यांच्या मते, अशा प्रकारचे कायदे खऱ्या अर्थाने स्वेच्छेने होणाऱ्या धर्मांतरालाही गुन्हा ठरवू शकतात. ओवेसी यांनी सांगितले



की, अनेक राज्यांतील धर्मांतर विरोधी कायद्यांमुळे आधीच आंतरधर्मीय विवाह करणाऱ्या जोडप्यांवर दबाव निर्माण होतो. धर्मांतर करण्यासाठी आधी परवानगी घेण्याची अटही काही ठिकाणी आहे. आता महाराष्ट्रातील प्रस्तावित कायद्यात आणखी काही कठोर तरतुदी करण्यात आल्याचा आरोप त्यांनी केला. विशेषतः ‘शिक्षणाद्वारे ब्रेनवॉश करून धर्मांतर घडवणे’ या शब्दप्रयोगावर त्यांनी आक्षेप घेतला आहे.

## अंबादास दानवे यांना जीवे मारण्याची धमकी : CP कडे तक्रार, गुन्हाही दाखल

**छत्रपती संभाजीनगर**

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते अंबादास दानवे यांना अज्ञात व्यक्तीने फोनवरून जीवे मारण्याची धमकी दिली आहे. स्वतः अंबादास दानवे यांनी सोमवारी सकाळी एका वृत्तवाहिनीशी बोलताना याची माहिती दिली आहे. या प्रकरणी त्यांनी छत्रपती संभाजीनगरच्या पोलिस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. या घटनेमुळे ठाकरे गटात एकच खळबळ माजली आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, अज्ञात व्यक्तींनी रविवारी मध्यरात्री 2 च्या सुमारास फोनवरून अंबादास दानवे यांना जीवे मारण्याची धमकी दिली. या प्रकरणी छत्रपती संभाजीनगर येथील क्रांती चौक पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यानंतर पोलिसांनी खबरदारी म्हणून पोलिसांनी दानवेंच्या घराबाहेर बंदोबस्त तैनात केला आहे. तसेच ही धमकी कुणी दिली? याचा तपासही सुरू केला आहे. फोन कॉल कोणत्या क्रमांकावरून आला? तो कुठून करण्यात आला? व त्यामागे कुणाचा हात असू शकतो? अशा विविध प्रश्नांचा माग पोलिस काढण्याचा प्रयत्न करत आहे. याकामी सायबर सेलचीही मदत घेण्यात येत असल्याची माहिती आहे.

अंबादास दानवे यांनी एका मराठी वृत्तवाहिनीशी संवाद साधताना हा प्रकार मागील काही दिवसांपासून सुरू



असल्याचा व आपण त्याला गांभिर्याने घेतले नसल्याचे सांगितले आहे. गत काही दिवसांपासून मला अज्ञात व्यक्तीकडून धमक्या येत होत्या. आज पहाटे 2 च्या सुमारास मला पुन्हा फोन आला. त्यामुळे खबरदारी म्हणून आम्ही पोलिस आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. पोलिस या प्रकरणाची चौकशी करत आहेत, असे ते म्हणालेत. दानवे यांनी आपल्या तक्रारीत त्यांनी ज्या क्रमांकावरून फोन आला तो क्रमांकही दिला आहे. तसेच धमकी देणाऱ्याने ठोकून काढू, कापून टाकू असे शब्द वापरल्याचेही नमूद केले आहे. अंबादास दानवे आपल्या तक्रारीत म्हणालेत की, मला 11 ते 14 मार्चपर्यंत सलग 4 दिवस रात्री 1.54 ते 2 च्या सुमारास लागोपाठ फोन आले. फोन करणाऱ्यांनी मला कापून टाकण्याची धमकी दिली. ही धमकी 9595959303 या क्रमांकावरून देण्यात आली. या घटनेमुळे माझ्या व माझ्या कुटुंबीयांच्या सुरक्षेस धोका संभवू शकतो. त्यामुळे या घटनेची रीतसर चौकशी करून कारवाई करण्यात यावी. अंबादास दानवे यांना धमक्यांचे फोन आल्यानंतर ठाकरे गटाचे कार्यकर्ते चांगलेच संतापले. त्यांनी आरोपींचा शोध घेऊन तत्काळ कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### ढिंग-टांग




### ब्रेकिंग न्यूज

#### महाराजांविषयी वादग्रस्त विधान

मुंबई (दै. संध्या) : राज्य विधिमंडळाच्या अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू असून, आजपासून पुढील तीन दिवस महाराष्ट्र धर्म स्वातंत्र्य विधेयक २०२६ यावर चर्चा झाली. ही चर्चा सुरू असताना आमदार जितेंद्र आव्हाड यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या संदर्भात बोलताना वादग्रस्त विधान केले. त्यानंतर सभागृहात गदारोळ निर्माण झाला. सभागृहात गोंधळ निर्माण झाल्याने सभागृह 10 मिनिटांसाठी स्थगित करण्यात आले होते. त्यानंतर सभागृहाचे कामकाज सुरू झाल्यावर देखील गोंधळ सुरू झाला. त्यानंतर जितेंद्र आव्हाड यांनी दिलगिरी व्यक्त केली. परंतु, दादा भुसे तसेच नितेश राणे यांनी निलंबित करण्याची मागणी केली. यावर कारवाई म्हणून अध्यक्षांनी जितेंद्र आव्हाड यांचे विधान रेकॉर्डवरून काढून टाकले.

#### पूर्ववैमनस्यातून तरुणाची हत्या, सिंहगड रस्त्यावरील घटना!

धायरी (दै. संध्या) : शहरात कोयता गँग आणि सराईत गुन्हेगारांचा धुमाकूळ थांबण्याचे नाव घेत नाहीये. पुण्यातील सिंहगड रस्ता परिसरातील आनंदनगर येथे एका १९ वर्षीय तरुणाची कोयत्याने सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, करण गिरीश काशीद (वय १९, रा. धायरी) असे खून झालेल्या तरुणाचे नाव आहे. सोमवारी सायंकाळी ६ वाजेच्या सुमारास करण हा सिंहगड रस्त्यावरील आनंदनगर येथील संतोष हॉल परिसरात थांबला होता. यावेळी दोन ते तीन हल्लेखोर त्या ठिकाणी आले. काही समजण्याच्या आतच त्यांनी आपल्याजवळील लोखंडी हत्याराने करणवर हल्ला चढवला.

#### शिवाजीनगर-हिंजवडी मेट्रो जुलैमध्ये धावणार

पुणे (दै. संध्या) : शिवाजीनगर ते हिंजवडीमेट्रो प्रकल्पातील २३ किमींपैकी हिंजवडी ते बालेवाडी फाटा हा १२ किलोमीटरचा मार्ग मे महिन्यात सुरू होणार आहे तर उर्वरित बालेवाडी फाटा ते शिवाजीनगर हा ११ किलोमीटरचा मेट्रो मार्ग जुलैमध्ये सुरू होणार असल्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली. मेट्रो भवनच्या उद्घाटनप्रसंगी रविवारी ते बोलत होते. यामुळे आता शिवाजीनगर ते हिंजवडी मेट्रो जुलैमध्ये धावणार असल्याने या भागातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे. पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (पीएमआरडीए) यांनी पीपीपी तत्त्वावर ‘पुणे आयटी सिटी मेट्रो’ या कंपनीला हे काम दिले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मार्चअखेरपर्यंत हिंजवडी शिवाजीनगर मेट्रो मार्ग सुरू करण्याचे निर्देश दिले होते. परंतु, अनेक मेट्रो स्थानकांची कामे मोठ्या प्रमाणात शिल्लक होती. शिवाय हा संपूर्ण मार्ग एकाच टप्प्यात सुरू करणार होते. याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी वारंवार सूचना दिल्या होत्या.

## संपादकीय

# ‘शक्तिपीठ’ की पाणी? विकासाचा खरा मार्ग कोणता?

महाराष्ट्र सरकारने वर्धा जिल्ह्यातील पवनार ते सिंधुदुर्ग जिल्ह्यातील पत्रादेवी असा सुमारे ८५६ किलोमीटर लांबीचा ‘शक्तिपीठ महामार्ग’ उभारण्याचा निर्णय घेतला आहे. सहापदरी या महामार्गासाठी जवळपास एक लाख कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित असल्याचे सांगितले जाते. राज्यातील वाहतूक सुलभ करणे, पर्यटन आणि औद्योगिक गुंतवणुकीला चालना देणे, तसेच आर्थिक विकासाचा वेग वाढवणे हे या प्रकल्पामागील प्रमुख उद्दिष्ट असल्याचे शासनाचे म्हणणे आहे. परंतु, या महामार्गामुळे १३ जिल्ह्यांतील सुपीक जमीन मोठ्या प्रमाणावर संपादित होणार असल्याने शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे. अनेक ठिकाणी भूसंपादनाला विरोध होत असून, या प्रकल्पाच्या उपयुक्ततेवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

याच पार्श्वभूमीवर काही अभियंत्यांनी एक वेगळी कल्पना मांडली आहे. पुण्यातील अभियंते अभय गोडसे आणि श्रीशैल्य अंकलकोटे यांनी ‘प्रेशराइज्ड मल्टीडायरेक्शनल मॅनिफोल्ड सिस्टीम’ या तत्त्वावर आधारित एक पर्यायी सिंचन योजना सुचवली आहे. त्यांच्या मते, प्रस्तावित महामार्गाच्या पट्ट्यातच मोठ्या व्यासाच्या जलवाहिन्या टाकून अतिरिक्त पाणी असलेल्या नद्यांमधून पाणी उचलून दुष्काळी भागात वळवणे शक्य आहे. महामार्गालगत दर एक किलोमीटर अंतरावर पाणीपुरवठ्याचे कनेक्शन दिल्यास पिण्याचे पाणी, शेतीसाठी सिंचन आणि औद्योगिक वापर अशा तीनही गरजा पूर्ण होऊ शकतात.

या योजनेची रचना आठ टप्प्यांत करण्यात आली आहे. सुरुवातीच्या टप्प्यांत महामार्गाच्या दोन्ही बाजूंनी लहान व्यासाच्या सेवा जलवाहिन्या टाकल्या जातील. त्यानंतर १२०० मिमी व्यासाच्या मुख्य जलवाहिन्यांची उभारणी करण्यात येईल. अंतिम टप्प्यांत सुमारे ३००० मिमी व्यासाच्या मोठ्या जलवाहिन्यांद्वारे पावसाळ्यातील अतिरिक्त पाणी चार महिन्यांच्या कालावधीत मोठ्या प्रमाणात वळवण्याची व्यवस्था करता येईल. विशेष म्हणजे प्रस्तावित महामार्गाचा मार्ग २१ नद्यांना छेदतो. त्या प्रत्येक ठिकाणी बंधारे, जॅकवेल आणि पंपहाऊस उभारून पाणी उचलण्याची योजना मांडण्यात आली आहे. कृष्णा, पंचगंगा, भीमा, गोदावरी आणि पैनगंगा यासारख्या प्रमुख नद्यांवर सुमारे १०० एमएलडी क्षमतेची आठ जलशुद्धीकरण केंद्रे उभारता येतील, असेही या योजनेत नमूद आहे. संपूर्ण प्रकल्पाचा अंदाजित खर्च सुमारे ७,१०० कोटी रुपये असल्याचे अभियंत्यांचे म्हणणे आहे. जलवाहिन्या, पंपिंग स्टेशन, बंधारे आणि जलशुद्धीकरण केंद्रे यांचा एकत्रित विचार केला तर हा खर्च महामार्गाच्या खर्चाच्या तुलनेत अत्यल्प असल्याचे ते सांगतात.

महाराष्ट्रात पावसाचे वितरण अत्यंत असमान आहे. कोकण आणि सह्याद्री परिसरात दरवर्षी २५०० ते ३००० मिमीपर्यंत पाऊस पडतो, तर मराठवाडा आणि विदर्भातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण ८०० ते १००० मिमीपर्यंतच मर्यादित असते. त्यामुळे एका भागात पूरस्थिती निर्माण होते, तर दुसऱ्या भागात पिण्याच्या पाण्यासाठी टँकरची आवश्यकता भासते. सांगली-कोल्हापूर परिसरातील वारंवार येणारे पूर आणि मराठवाड्यातील भीषण पाणीटंचाई ही या विसंगतीची ठळक उदाहरणे आहेत. अशा परिस्थितीत जलसंपत्तीचे वैज्ञानिक नियोजन ही राज्याच्या विकासाची मध्यवर्ती गरज ठरते. अतिरिक्त पाणी असलेल्या नद्यांमधून पाणी उचलून दुष्काळी भागात वळवण्याची व्यवस्था निर्माण झाली, तर पावसाळ्यातील वाहून जाणारे प्रचंड पाणी उपयोगात आणता येईल. त्यातून शेती, उद्योग आणि पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मोठ्या प्रमाणात सोडवता येऊ शकतो. निश्चितच, अशा प्रकारच्या जलयोजनांची व्यवहार्यता तपासण्यासाठी सखोल अभ्यास आवश्यक असतो.

## गुरु वचन

### आध्यात्मिक आणि भौतिक धन एकत्र मिळत नाही

संसारात दोन प्रकारचे धन असते. भौतिक धन आणि दुसरे आध्यात्मिक धन. मनुष्याचा स्वभाव आहे की, तो जास्तीत जास्त धन कमवू इच्छितो. एखादी व्यक्ती सोने, चांदी, रूपयांचा ढिग लावल्याने धनवान म्हटला जातो. तर कोणी उपाशी, तहानलेला राहूनही धनवान म्हटला जातो. वास्तवात धनवान दोघेही आहेत. एक भौतिक धनाचा धनी आहे तर दुसरा अध्यात्मिक धनाचा धनी आहे.

शास्त्र आणि पुराण सांगातात की, दोन्ही धनात अध्यात्म रूपी धन जास्त श्रेष्ठ आहे. कारण हे धन कोणी चोरून घेऊ शकत नाही. ज्याच्याकडे अध्यात्म रूपी धन असते तो निश्चिंत असतो. त्याला कोणत्याही प्रकारची चिंता आणि भीती नसते. संसारात कोणतीही व्यक्ती अशी नाही जी एकत्र या दोन्ही संपत्तीचे सुख प्राप्त करू शकेल.

अध्यात्म आणि भौतिक धन दोन्ही दोन नावासमान आहेत. दोन्ही नावांतून एकाचवेळी प्रवास करता येत नाही, हे आपल्याला चांगल्याप्रकारे ठाऊक आहे. असे करण्याचा प्रयत्न केला तर बुडणे निश्चित असते. आपल्याला अध्यात्मिक धन अर्जित करून ईश्वराचे ऋण फेडायचे आणि जीवन-मरणाच्या चक्रातून मुक्ती मिळावायची की भौतिक धन अर्जित करून सांसारिक सुखाचा आनंद घ्यायचा आणि वारंवार जीवन-मरणाच्या चक्रात अडकून पापफळ प्राप्त करायचे, हे आपल्या हाती आहे.

भागवत् म्हणते ईश्वर ज्याच्यावर प्रेम करतो त्याचे सर्वकाही हिरावून घेतो. सर्वकाही हिरावून घेण्याचा अर्थ आहे सांसारिक सुख हिरावून घेणे. कबीर दास, तुलसीदास, रहीम, मीराबाई, सूरदास, करमैतीबाई याची उदाहरणे आहेत. येशू ख्रिस्तानेही म्हटले की, एकवेळ सूईच्या छिद्रातून ऊंट जाईल. मात्र श्रीमंत माणूस स्वर्ग प्राप्त करू शकत नाही. स्वर्ग न मिळण्याचा अर्थ आहे, ईश्वराची कृपा प्राप्त नसणे.

त्याचे कारण जेव्हा खूप धन येते व्यक्ती धन सांभाळणे आणि त्याच्या सुरक्षेबाबत सदैव चिंतित असतो. ईश्वरासाठी त्याच्याकडे वेळ नसतो. आणि भक्ती भावनाही नसते. धनाच्या अहंकारात व्यक्ती ईश्वरीय सत्तेलाही आव्हान देऊ लागतो. तीर्थस्थळांस पर्यटन स्थळ मानून त्याचा अपमान करतो. त्यामुळे अध्याात्मिक धन आणि सांसारिक धन एकत्र मिळू शकत नाही, असे म्हटले जाते.

## दै. ‘संध्या’ धमाल सूडोकु क्र. ८८९

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | 3 | | 4 | | 8 | | 2 | |
| | 5 | 4 | 6 | | 7 | | | 3 |
| 9 | 6 | | 1 | | | | | |
| | 8 | 7 | 2 | | | | | 5 |
| | | 9 | | 7 | | 8 | | |
| 3 | | | | | 4 | 7 | 9 | |
| | | | | | 5 | | 4 | 1 |
| 6 | | | 7 | | 2 | 3 | 8 | |
| | 9 | | 8 | | 6 | | 5 | |

### : सूडोकु :


खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३-३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोडयाचे केवळ एकच उत्तर आहे.या कोडयाला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. ८८८ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 3 | 7 | 2 | 6 | 8 | 9 | 5 | 4 |
| 5 | 2 | 9 | 3 | 1 | 4 | 8 | 6 | 7 |
| 8 | 4 | 6 | 9 | 5 | 7 | 3 | 1 | 2 |
| 4 | 8 | 3 | 1 | 2 | 9 | 6 | 7 | 5 |
| 7 | 1 | 2 | 5 | 8 | 6 | 4 | 3 | 9 |
| 9 | 6 | 5 | 7 | 4 | 3 | 2 | 8 | 1 |
| 6 | 7 | 8 | 4 | 9 | 5 | 1 | 2 | 3 |
| 2 | 5 | 4 | 8 | 3 | 1 | 7 | 9 | 6 |
| 3 | 9 | 1 | 6 | 7 | 2 | 5 | 4 | 8 |

## ‘दै. संध्या’ जम्बो शब्दकोडे क्र. ८८९



**आडवे शब्द**

१. पुलंचा लेखक म्हणून अखेरचा चित्रपट- ‘एक होता -----’
३. वार्ताहर
७. दाद, पोहोच
९. स्पष्ट उच्चार करता न येणारा
१०. गतीमान
१२. आरोळी
१४. यावर्षी
१५. गडीमाणसे
१८. ‘नॅनो’ आणणारे टाटा
२१. कंटाळवणे (भाषण)
२३. करायला गेला मारुती आणि झाले ---!
२५. राष्ट्राची सीमा
२९. मोका, संधी
३१. विश्वासघातकी
३२. खाटीक
३३. पदर
३४. दबा धरणे
३६. किरकोळ सामान
३९. आश्चर्याची गोष्ट
४२. आमटे, आढाव या सम ाजसेवकांचे प्रचलित नाव
४४. मोठी गाडी (सं.)
४६. दारावरील खुणेचा आवाज
४८. सजीव-निर्जीव सर्व
५०. नाकावरचा राग
५२. एक जंगली फूल
५३. भिक्षापात्र
५४. रक्त देणे
५७अ. कूळ कायद्याचे मूळ तत्त्व
६१. तात्काळ
६४. विषमच्या विरुद्ध
६६. केसांची बट
६८. पावलोपावली
६९. श्री विष्णूचे एक नाव
७१. किंचित वाकडा
७३. नवरत्नांपैकी एक प्राणिज रत्न
७४. कारस्थानी
७५. दाट, घट्ट
७६. अभिप्राय

**उभे शब्द**

१. प्रशाला
२. क्रिकेटमधील सहाचा फटका
३. च्या बद्दल
४. अखेर, शेवट
५. वैरी
६. अंगातीक मस्ती, जोम
७. जन्मदाता
८. मनात संशय निर्माण होणे याअर्थी वाक्प्रचार
११. बडबड्या
१३. पद्धतीनुसार
१६. लक्ष्मी
१७. बाजू, काठ
१९. पुरुष
२०. खोट्या नाण्याचा आवाज
२२. टाळाटाळ, चुकवाचुकव
२४. वार
२६. हद्दीच्या पलीकडे
२७. मिठाची चव
२८. शिर्डीचे संत
२९. अमावस्या
३०. वारा (सं.)
३१. होम
३५. सैन्याचे पथक
३७. घाबरणे
३८. तफावत, अंतर
४०. जंगलात विहार करणारे प्राणी
४१. परमेश्वर
४२. भारतभूषणचा गाजलेला सिनेमा, बैजू ---
४३. केर
४५. प्रेतावरील कापड
४६. रोखलेली नजर
४७. शेंगेवरील आवरण
४९. युद्ध, मारामारीत रक्त सांडणे
५१. घटस्फोट
५३. दगडाचा पातळ पापुद्रा
५५. नाठाळ, आडमुठ्या
५६. खळबळजनक
५७. चुलती
५८. सेनानायक
५९. हिंदीत राजीनामा
६०. वजनदार
६२. पाण्याचा गोंगाट?
६३. स्पष्टवक्ता, तोंडाळ
६५. शूर पुरुष
६७. हिंदुस्थान
६९. सततचे नामस्मरण
७०. पर्वत
७२. समान, तुल्यबळ

**जम्बो शब्दकोडे क्र. ८८८ चे उत्तर**

आडवे उत्तर : १.कुलवधू ४.कानवला ७.रगमतगमत १२.माग १३.पहेलवान १५.मगर १६.नोट १७.रब १८.लव १९.राजराणी २१.मोह २२.वग २४.जयजयकार २८.खास २९.रज ३१.कसाबसा ३३.सावज ३६.मासेमारी ३८.हर हर ४०.तन मन ४३.पाडवा ४५.सवत ४६.पापा ४७.मकर ४८.कल्प ४९.कळस ५०.सतत ५१.साव ५२.मत ५४.लगत ५६.टपाल ५८.टोळ ५९.सहज ६२.पोक ६३.बरसात ६५.कोरी ६६.अवयव ६७.दामचुंबक ६९.याचक ७०.ठार मारणे ७३.तगर ७५.रूस ७७.मानव ७९.जर ८०.रसद ८४.नरकवास ८५.साम ८६.मनमुराद

उभे उत्तर : १.कुमारवय २.लगबग ३.धूप ४.कालवण ५.नव ६.वनराज ७.रमणीय ८.मग ९.तर १०.मनोहर ११.तट १४.हेल २०.राजस २१.मोका २३.कसाब २५.जर २६. यजमान २६अ. खासा २७.वसाहत २८.खाज ३०.परिवार ३१.कवडसा ३२.साहस ३४.वर ३५.मौन ३७.मादक ३९.रवरव ४०.तपास ४१.मद्रास ४३.पारखणे ४४.वायफट ४६.पाळत ४७.मतलब ४९.कमळ ५१.साल ५३.ना हरकत ५७.पाणवठा ५८.टोकदार ५९.सबब ६०.जसा ६१.ठेव ६४.तयार ६५.कोकरू ६६.असामान्य ६८.मणेर ७१.रजक ७२.मारवा ७४.गरम ७६.सरोद ७८.वन ८१.ससा ८२.दम ८३.चमू

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १९२१ – डॉ. मेरी स्टोप्स यांचे पहिले कुटुंबनियोजन केंद्र लंडनमध्ये सुरु.
- १९५० – कॉलीफोर्नियम या मानवनिर्मिती मूलद्रव्याचा शोध जाहीर.
- १९६९ – गोल्डा मेयर इस्त्राईलच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या.

### राष्ट्रीय

- २००५ – सानिका तोडणकर ही साडेपाच वर्षांची मुलगी धरमतर ते गेट वे ऑफ इंडिया हे अंतर १२ तासांत पोहून गेली.
- २००५ – ’नाग’ या भारतीय क्षेपणास्त्राची अंतिम चाचणी यशस्वी.

### जन्म

- १४७३ – चौथा जेम्स या स्कॉटलंडच्या राजाचा जन्म.
- १७८७ – शोकात्मक भूमिकांमुळे गाजलेल्या एडमंडकीन या इंग्रज अभिनेत्याचा जन्म.
- १८३४ – चारचाकी यंत्रचलित गाडीचा आद्य निर्माता गॉट्लीब विल्हेल्म डेमलर यांचा जन्म.
- १८५६ – स्वामी श्रद्धानंद यांचा जन्म. ते स्वामी दयानंदांचे पट्टशिष्य म्हणून प्रसिद्ध होते.
- १८६३ – बडोद्याचे प्रजाहितदक्ष संस्थानिक सयाजीराव गायकवाड यांचा जन्म.
- १९०३ – कवी, समीक्षक वा.ना. देशपांडे यांचा जन्म.
- १९०९ – प्राच्यविद्या पंडित रा.ना. दांडेकर यांचा जन्म.

### निधन

- १८५३ – ख्रिस्तियन योहान डॉपलर या पदार्थ वैज्ञानिकाचे निधन. त्याचा शोध ’डॉपलर परिणाम’ म्हणून प्रसिद्ध होते.
- १८८२ – मराठी भाषेचे शिवाजी विष्णूशास्त्री चिपळूणकर यांचे निधन.
- १९३७ – बडोद्याचे राजकवी चंद्रशेखर (गोऱ्हे) यांचे निधन.

## उपदेशकथा

### सुख दु:ख

जसा आपला दृष्टिकोन तसं आपलं जीवन. याचा प्रत्यय देणाऱ्या अनेक घटना पदोपदी घडत असतात. फक्त त्या आपल्या लक्षात येत नाहीत. आता हेच पाहा ना. फक्त दोन संवाद आहेत पण केवढं मर्म सांगून जातात. जगद्विख्यात विचारवंत सॉक्रेटिसकडे एक तरुण गेला व म्हणाला, ‘सर, मला लग्न करायचं आहे, तुमचा सल्लाद्याल?’ सॉक्रेटिस म्हणाले, ‘तुला लग्न करायचं आहे ना तर अवश्य कर. सद्गुणी, चांगली पत्नी तुला लाभली तर तुझा संसार सुखाचा होईल आणि जर आक्रस्ताळी, भांडकुदळ बायको लाभली तर माझ्यासारखा तत्ववेत्ता होशील. म्हणजे दोन्हीवेळी सुखच सुख.

असाच एक तरुण हाच प्रश्न घेऊन विश्वकवी रवींद्रनाथ टागोरांकडे गेला. त्याने विचारले, ‘गुरुदेव, मी लग्न करू की नको?’ मिश्किलपणे गुरुदेव म्हणाले, ‘अरे तुला वाटेल तर कर. काहीही कर. तुला पश्चातापच होईल. म्हणजेच लग्न केले तरी दु:ख आणि नाही तरी दु:ख!’ आता खरे कोणाचे मानायचे ?

कथा उपदेश : दोन्ही उत्तरे वेगळी पण अर्थ एकच आहे. आपल्या पाहण्याच्या दृष्टिकोनावर सुख दु:ख या कल्पना अवलंबून असतात.

## : SMS :

sardar English k paper main fail hogaya translation ki wajah se..
1.Main ek aam admi hoon,..I Am a mango man.
2.Mujhe english ati hai.. English comes to me.
3.Mera taluq Haripur hazara se hai..I belong to Greenpur thousands.
4.sadak per goliyan chal rahi hai,tablets r walking on the rd.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३३ | २३.९ |
| अहमदनगर | ३२.५ | २२.३ |
| अकोला | ३६.५ | २५.६ |
| अमरावती | ३५.४ | २५.१ |
| बीड | ३९.१ | २४.२ |
| भंडारा | ३९.४ | २२.५ |
| बुलढाणा | २९ | १७.९ |
| चंद्रपूर | ४०.२ | २४.६ |
| चेन्नई | ३६.३ | २२.३ |
| नवी दिल्ली | २९.७ | १९.३ |
| धुळे | ३५.७ | २४.९ |
| गोंदिया | ३७.६ | २१.६ |
| जळगाव | ३६.९ | २४.९ |
| कोल्हापूर | ३४ | २०.४ |
| लातूर | ३४.२ | २४.३ |
| मुंबई | ३५.५ | २६.५ |
| नागपूर | ३६.७ | २३.१ |
| नांदेड | ३६.६ | २५ |
| नंदूरबार | ३३ | २५.१ |
| नाशिक | ३३.३ | २१.१ |
| पुणे | ३२.८ | २२.२ |
| पंढरपूर | ३५.४ | २४.८ |
| सातारा | ३४.२ | २०.७ |
| सांगली | ३५.२ | २१.८ |
| सोलापूर | ३५.६ | २६.४ |
| वर्धा | ३७.३ | २५ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग:लाल, शुभ दिशा :उत्तर महिलांनी कौटुंबिक छोट्याशा कारणांमुळे मूड घालवून बसू नका.

**तुळ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा:पश्चिम नोकरी-व्यवसायात सध्या पावले उचलणे आवश्यक.

**वृषभ :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व कामात केलेल्या सुधारणा आणि नव्या योजना यांचा फायदा पुढे होईल.

**वृश्चिक :** शुभ रंग :जांभळा,शुभ दिशा:दक्षिण संततीच्या दृष्टीने येणाऱ्या शुभवार्ता अभिमानास्पद ठरतील. धार्मिक विधी केल्यामुळे आनंद मिळेल.

**मिथुन :** शुभ रंग: पिवळा: शुभ दिशा: पूर्व कोणाशी वादविवाद करणे किंवा कोणाच्या अतिआहारी जाणे टाळायला हवे. मुलांचे नवीन प्रश्न उद्भवतील.

**धनु :** शुभ रंग: काळा, शुभ दिशा: पश्चिम मित्र-मैत्रिणीचा किंवा घरातील सदस्यांचा जीवनातला महत्त्वाचा प्रसंग साजरा कराल.

**कर्क :** शुभ रंग:निळा, शुभ दिशा: पूर्व आर्थिक व्यवहारात जातीने लक्ष घालणे आवश्यक. वडिलधाऱ्यांची सेवा करावी लागण्याची शक्यता.

**मकर :** शुभ रंग:पांढरा,शुभ दिशा: उत्तर बौद्धिक क्षेत्रात चांगले नाव करता येईल. आर्थिकदृष्ट्या स्वत:च्या मनाप्रमाणे व्यवहार होतील.

**सिंह :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा:उत्तर आपले हितसंबंध जपण्यासाठी एखाद्याच्या कार्यक्रमात जाऊन हजेरी लावावी लागेल.

**कुंभ :** शुभ रंग:केसरी, शुभ दिशा: पश्चिम शेतकऱ्यांना दिलासा देणाऱ्या घटना घडतील. नशिबाची साथ मोठ्या प्रमाणात मिळेल.

**कन्या :** शुभ रंग: हिरवा, शुभ दिशा: पूर्व युवकांनी कोणत्याही प्रलोभनापासून दूर राहिलेले बरे. महिलांनी कुटुंबात शब्दाने शब्द वाढतो हे लक्षात ठेवा.

**मीन :** शुभ रंग: गुलाबी, शुभ दिशा: उत्तर नोकरी-व्यवसायात अनेक संधी मिळणार आहेत. गोड बोलून कार्यभाग साधलेला बरा.

## पंचांग

| | |
|---|---|
| पंचांग | योग:सिद्ध ०८:१४:३६ |
| १७ मार्च २०२६ | योग:साध्य ३०:२१:४३+ |
| मंगळवार | करण:वणिज ०९:२३:१६ |
| विक्रम संवत्- २०८२ | करण:विष्टि २०:५९:१० |
| फाल्गुन शके | सूर्य:मीन |
| संवत्- १९४७ | चन्द्र:कुम्भ |
| संवत्सर – विश्वावसूनाम | हिजरी सन् – १४४६ |
| अयन- उत्तरायणारंभ | मुस्लिम मास – रमजान |
| मास- फाल्गुन | तारीख – २७ |
| ऋतु- सौर वसंत | विशेष |
| कृष्ण पक्ष | शिवरात्री |
| तिथि:त्रयोदशी ०९:२३:१६ | वारुणीयोग सकाळी |
| नक्षत्र:शतभिषा | ९.२२ पर्यंत |
| ३०:०८:४९+ | मधुकृष्ण त्रयोदशी |

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily “Sandhya” News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

# ‘सिंधी प्रीमिअर लीग’चे सातवे पर्व रंगणार १० एप्रिलपासून

## सामाजिक एकोप्याच्या भावनेतून आयोजन; सातव्या हंगामात १६ पुरुष, सात महिला संघ खेळणार

**पुणे (दै. संध्या) :**




सिंधी प्रीमिअर लीग क्रिकेट स्पर्धेचे सातवे पर्व यंदा १० एप्रिल ते ३ मे २०२६ या कालावधीत पिंपरी येथे रंगणार आहे. या स्पर्धेत यंदा १६ पुरुष, तर सात महिला संघ सहभागी होणार आहेत. पिंपरी येथील एमसीसी, मृणाल क्रिकेट ग्राउंडवर होणाऱ्या या स्पर्धेचे थेट प्रक्षेपण सिंधी प्रीमिअर लीग फेसबुक पेजवरून पाहता येणार आहे, अशी माहिती संयोजन समितीचे नरेश नशा व बिपीन दखनेजा यांनी पत्रकार परिषदेत दिली.

रावेत येथील हॉटेल ब्ल्यू वॉटरमध्ये झालेल्या पत्रकार परिषदेवेळी उद्योजक डब्बू आसवानी, श्रीचंद आसवानी, संयोजन समितीतील रोनक पंजाबी, अविनाश इसरानी, अंकुश मुलचंदानी, करण आसवानी, अवि तेजवानी, सोमेश गिडवाणी, कुणाल गुडेला, मनीष गेरेजा, यश थडानी, कंवल खियानी, गुलशन गंगवानी, कामेश पमनानी, पवन कोटवानी, मयूर तिलवानी यांच्यासह संघमालक व प्रायोजक उपस्थित होते. डब्बू आसवानी म्हणाले, "सिंधी समाजातील उद्योजक तरुणांनी एकत्र येऊन या क्रिकेट लीगचे आयोजन केले आहे. ही स्पर्धा आता समाजाचा एक महोत्सव झाला असून, निरोगी व व्यसनमुक्त आयुष्य, तंदुरुस्ती याविषयी समाजात जागरूकता वाढत आहे. मोबाईल-इंटरनेटच्या जाळ्यात न अडकता मैदानावर खेळण्याला प्रोत्साहन मिळत आहे. या स्पर्धेतून उभारलेल्या निधीचा समाजासाठी उपयोग होत आहे. यंदा या स्पर्धेतून उभा राहणाऱ्या निधीतून साधू वासवानी मिशन येथील एका विद्यार्थिनीचे संपूर्ण पालकत्व स्वीकारले जाणार आहे."

श्रीचंद आसवानी म्हणाले, "या 'सिंधी प्रीमिअर लीग सीजन-७'चे उद्घाटन १० एप्रिल २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणार आहे. यावेळी माजी क्रिकेटपटू, सिंधी समाजातील प्रतिष्ठित व्यक्ती, तसेच खेळाडू, संघ मालक व कुटुंबीयांची उपस्थिती असणार आहे. गेल्या सातही हंगामात या स्पर्धेला मोठा प्रतिसाद मिळाला आहे. पुण्यासह राज्यभरातून खेळाडू या स्पर्धेत सहभागी झाले आहेत. महिलांनाही खेळासाठी प्रोत्साहन दिले जात असून, यंदा महिलांचे सात संघ स्पर्धा खेळणार आहेत.

बिपीन दखनेजा म्हणाले, "आयपीएलच्या धर्तीवर या स्पर्धेची रचना करण्यात आली आहे. पुरुषांचे १६ संघमालक व महिलांचे सात संघमालक आपल्या २३ संघांसह स्पर्धेत उतरणार आहेत. पुरुष संघांची नवे सिंधी संस्कृतीवर आधारित, तर महिला संघांची नावे नद्यांवर आधारित आहेत. महिलांमध्ये ९८, तर पुरुषांमध्ये २५६ खेळाडूंनी सहभाग नोंदवला."

या स्पर्धेतील पुरुष गटामध्ये मस्त कलंदर (गीता बिल्डर्स, मयूर तिलवानी), सुलतान ऑफ सिंध (एए प्रमोटर्स अँड बिल्डर्स, हिरानंद आसवानी), मोहेंजोदरो वॉरियर्स (मिलेनियम डेव्हलपर्स, हरीश अभिचंदानी), सिंधफूल रेंजर्स (जीएस असोसिएट्स, जितू पहलानी), एसएसडी फाल्कन (विक्रम रोहेडा फोटोग्राफी, विक्रम रोहेडा), इंडस डायनामॉस (साईबाबा सेल्स, रोहन गेहानी), दादा वासवानीज ब्रिगेड (आसवानी प्रमोटर्स अँड बिल्डर्स, श्रीचंद आसवानी), झुलेलाल सुपरकिंग्ज (गोगिया ग्रुप, सनी गोगिया), हेमू कलानी ग्लॅडिएटर्स (ट्रिओ ग्रुप, कमलेश पमनानी), गुरुनानक नाइट्स (पीव्हीआर टाईल्स वर्ल्ड, प्रकाश रामनानी), संत कंवरम रॉयल्स (विजयराज असोसिएट्स, क्रिश लाडकानी), आर्यन्स युनायटेड (आसवानी प्रमोटर्स अँड बिल्डर्स, अनिल आसवानी), जय बाबा स्ट्रायकर्स (सुखवानी असोसिएट्स, सागर सुखवानी), सिंधी इंडियन्स (मनसुखवानी असोसिएट्स, मनीष मनसुखवानी), अजराक सुपरजायंट्स (लाइफक्राफ्ट रियल्टी, हितेश दादलानी) व पिंपरी योद्धाज (कुणाल कम्युनिकेशन्स, कुणाल लखानी) अशी या संघांची नावे आहेत. महिलांच्या संघात गंगा वॉरियर्स (दीक्षा खुबचंदानी, दीपक खुबचंदानी), गोदावरी जायंट्स (प्रेरणा गौरव रामचंदानी, जया प्रकाश रामचंदानी), झेलम क्वीन्स (शिखा व रॉकी सेवानी), सिंधू स्टारलेट्स (मनीषा अँड बिपीन दखनेजा), यमुना स्ट्रायकर्स (रिया व पवन कोटवानी), नर्मदा टायटन्स (रेशम वाधवानी व सपना मेलवानी), कृष्णा सुपरनोव्हाज (युवीना गेरेजा अँड मनीष गेरेजा) यांचा समावेश आहे.

### ५६ वर्षांचा खेळाडू मैदानात

हॉलीबॉल, क्रिकेट खेळात, तसेच राजकारणात यशस्वी कारकीर्द करणारे हिरानंद उर्फ डब्बू आसवानी हे ५६ वर्षांचे खेळाडू सिंधी प्रीमिअर लीगच्या मैदानात उतरले आहेत. सुलतान ऑफ सिंध या संघाने ५६ वर्षांच्या डब्बू आसवानी, तर सर्वात कमी १५ वर्षांच्या ऋषभ वाधवानी याला आपल्या संघात घेतले आहे. खेळामुळेच राजकारणातही यशस्वी ठरलो होतो. शारीरिक तंदुरुस्तीही चांगली राहते.त्यामुळे सातत्याने खेळात राहतो, असे आसवानी यांनी नमूद केले.

### स्पर्धेला यांचा भक्कम हातभार

सुखवानी लाईफ स्पेसेस (विकी सुखवानी), एएनपी कॉर्प (ऋषी अडवाणी), सिटी कार्स (रॉकी शेवानी), ग्रोफीन (अभिजित बोंगिरवार), सिंग स्टील अँड अल्युमिनियम (मनजीत सिंग वालेचा), उत्तम केटरर्स (नवजीत कोचर), रामा ग्रुप (रोनक व मनोज पंजाबी), रोहित इन्फ्रा (राजीव मोटवानी), एआर रियल्टी (संजय रामचंदानी), एसएसडी एक्स्पोर्ट हॉंगकॉंग लिमिटेड (वरून वर्यानी), सेवानी इन्शुरन्स (हर्ष सेवानी), साईबाबा सेल्स प्रायव्हेट लिमिटेड (रोहन गेहाने), सिंधू स्काईज (विनोद चांदवानी), क्लासिक कलेक्शन (नीरज चावला), सच्चिदानंद प्रॉपर्टीज (मुकेश मलिक), झमतानी अँड कंपनी (अमित झमतानी), इको मॅट्रिक्स (सचिन तलरेजा), आर्को रियल्टी (रवी ओचानी), विक्रम रोहिडा फोटोग्राफी, सीजे हब (चिनू जैन) यांचे या स्पर्धेसाठी सहकार्य लाभले आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे भव्य सामूहिक विवाह सोहळा संपन्न

■ उपक्रमाचे यंदा १३ वे वर्ष; २० जोडपी विवाहबंधनात

पुणे (दैनिक संध्या) : सामाजिक बांधिलकी जपत गरीब व गरजू कुटुंबांना आधार देणाऱ्या भगवान अग्रसेन चॅरिटेबल फाउंडेशनतर्फे आयोजित भव्य सामूहिक विवाह सोहळा रविवारी उत्साहात पार पडला. या सोहळ्यात २० जोडपी विवाहबंधनात अडकली. गंगाधाम रोड येथील गोयल गार्डन, आईमाता मंदिरासमोर सुमारे तीन एकर परिसरात भव्य मंडप उभारून हा सोहळा पार पडला. ज्येष्ठ समाजसेवक रतनलाल गोयल यांच्या ७३व्या वाढदिवसानिमित्त या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. हिंदू धर्मीय परंपरेनुसार सर्व विवाह विधी पार पडले. नवविवाहित जोडप्यांना सामाजिक, राजकीय व उद्योग क्षेत्रातील मान्यवरांनी उपस्थित राहून आशीर्वाद दिले. यामध्ये माजी आमदार मोहन जोशी, उद्योजक कृष्णकुमार गोयल, श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील रासने, माजी नगरसेवक अभय छाजेड, प्रवीण चोरबोले, गीता गोयल यांच्यासह लायन्स क्लबचे पदाधिकारी आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. फाउंडेशनचे विश्वस्त राजेश अग्रवाल यांनी सांगितले की, वाढत्या सामाजिक व आर्थिक विषमतेच्या पार्श्वभूमीवर सामूहिक विवाह सोहळे ही काळाची गरज बनली आहे. विवाह समारंभांवरील अवाजवी खर्चामुळे अनेक कुटुंबांवर आर्थिक ताण येतो. विशेषतः मुलीच्या विवाहाची चिंता पालकांसाठी मोठे ओझे ठरते. अशा वेळी सामूहिक विवाह सोहळे समाजात एकात्मता, सहकार्य आणि सामाजिक जबाबदारीचा सकारात्मक संदेश देतात. या सोहळ्यात विवाहबंधनात अडकलेल्या प्रत्येक जोडप्याला कपाट, पंखा, गादी, चादर, मिक्सर, देव्हारा तसेच भांडी-कुंडी संच असे गृहउपयोगी साहित्य भेटस्वरूप देण्यात आले. तसेच वधू-वरांना संपूर्ण वस्त्रसंच, मंगलसूत्र आणि आवश्यक वैवाहिक साहित्यही प्रदान करण्यात आले. या उपक्रमाचे यंदा १३वे वर्ष असून मागील १३ वर्षांत एकूण २६१ जोडप्यांचे विवाह या माध्यमातून लावण्यात आले आहेत. गोयल कुटुंबाच्या सामाजिक जाणिवेतून साकारलेला हा उपक्रम गरीब व सर्वसामान्य कुटुंबांना सन्मानाने वैवाहिक जीवनाची नवी सुरुवात करण्याची संधी देणारा ठरत असल्याचे मत नवीन गोयल, वेदप्रकाश गुप्ता, विनोद जालान, विनोद अग्रवाल आणि आशीष गोयल यांनी व्यक्त केले.




### ‘दोराबजी हाइट्स’ची खास ऑफर जाहीर; 2 बीएचकेच्या किमतीत 3 बीएचके

■ अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या उपस्थितीत गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर घोषणा

पुणे (दैनिक संध्या) : उंड्री परिसरात उभारण्यात येत असलेल्या अत्याधुनिक निवासी प्रकल्प ‘दोराबजी हाइट्स’मध्ये घर खरेदीदारांसाठी आकर्षक ऑफर जाहीर करण्यात आली आहे. गुढी पाडव्याच्या पार्श्वभूमीवर आयोजित कार्यक्रमात सुप्रसिद्ध मराठी अभिनेत्री प्राजक्ता माळी यांच्या प्रमुख उपस्थितीत २ बीएचकेच्या किमतीत ३ बीएचके फ्लॅट देण्याची विशेष घोषणा करण्यात आली. या प्रकल्पातील फ्लॅट्सची किंमत ८१ लाख रुपयांपासून सुरू होत असल्याची माहिती आयोजकांनी दिली. बांधकाम क्षेत्रातील विश्वासार्ह नाव म्हणून ओळख असलेल्या दोराबजी समूहाचा हा प्रकल्प असून त्याची उभारणी दोराबजी, मन्नत असोशीएट आणि रितेश अग्रवाल व्हेंचर्स यांच्या संयुक्त विद्यमाने केली जात आहे. अत्याधुनिक सोयी-सुविधांनी सज्ज, प्रशस्त आणि निसर्गरम्य परिसरात उभारला जाणारा हा प्रकल्प घर खरेदीदारांसाठी आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरत आहे. या प्रसंगी जहांगीर दोराबजी, डॅनियल दोराबजी, रितेश अग्रवाल व्हेंचर्सचे संस्थापक सतीश अग्रवाल, संचालक रितेश अग्रवाल, मनीष अग्रवाल, अंकुश अग्रवाल, अभिनेत्री प्राजक्ता माळी, अभिनेत्री शीतल ढेकळे, अमन घई तसेच मन्नत असोशीएटचे सर्व संचालक आणि विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. यावेळी अभिनेत्री प्राजक्ता माळी म्हणाल्या, “प्रत्येकाच्या आयुष्यात स्वतःच्या स्वप्नातील घर असावे, ही मोठी इच्छा असते. घरात भरपूर सूर्यप्रकाश, मोकळी हवा आणि सकारात्मक वातावरण असणे तितकेच महत्त्वाचे असते. दोराबजी हाइट्सच्या सदनिकांमध्ये या सर्व गोष्टींचा उत्तम समतोल साधलेला आहे. वास्तुशास्त्रानुसार पूर्व-पश्चिम प्रवेशद्वार असणे ही खास बाब आहे. प्रशस्त जागा, सुंदर रचना आणि मोक्याचे स्थान यामुळे हा प्रकल्प खरेदीदारांसाठी आकर्षक ठरेल. गुढी पाडव्याच्या शुभमुहूर्तावर किफायतशीर दरात उत्तम घर मिळविण्याची ही चांगली संधी आहे.” जहांगीर दोराबजी म्हणाले, “वास्तुशास्त्र हे एक विज्ञान असून त्यानुसारच आमचे प्रकल्प उभारले जातात. आमचा कॅपिटल बिल्ट-अप रेशो कमी असल्यामुळे ग्राहकांना परवडणाऱ्या किमतीत प्रशस्त आणि प्रीमियम सदनिका उपलब्ध करून देणे शक्य होते.

# महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ला राष्ट्रीय पुरस्कार; देशातील सर्वोत्तम स्मार्ट ग्रिड प्रकल्प

**पुणे (दै. संध्या) :**



मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांनी राज्यातील सर्व ग्राहकांना परवडणाऱ्या दरात वीज उपलब्ध करून देणे आणि तांत्रिक अचूकतेसाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करण्याची सूचना केली आहे. त्यानुसार महावितरणने स्मार्ट ग्रीड अंतर्गत विकसीत केलेली ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ देशात सर्वोत्तम ठरली आहे. इंडिया स्मार्ट ग्रिड फोरमच्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषदेमध्ये शुक्रवारी (दि. १३) या तंत्रज्ञानासाठी महावितरणचा ‘आयएसजीफ इनोव्हेशन अवॉर्ड २०२६’ या सर्वोच्च पुरस्काराने गौरव करण्यात आला. नवी दिल्ली येथे 'इंडिया स्मार्ट युटिलिटी विक २०२६' अंतर्गत १२व्या आंतरराष्ट्रीय स्मार्ट एनर्जी व इनोव्हेशन परिषद झाली. महावितरणच्या ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’ची अंमलबजावणी व फलनिष्पत्तीचे सादरीकरण तीत करण्यात आले. त्याचा अभ्यास करून पाच सदस्यीय राष्ट्रीय निवड समितीने या तंत्रज्ञानाची परिषदेतील सर्वोत्तम पुरस्कारासाठी निवड केली. सेवानिवृत्त केंद्रीय ऊर्जा सचिव श्री. पी. उमाशंकर यांच्याहस्ते कार्यकारी संचालक श्री. दत्तात्रेय पडळकर व मुख्य महाव्यवस्थापक (माहिती तंत्रज्ञान) श्री. अविनाश हावरे यांनी महावितरणच्या वतीने हा पुरस्कार स्वीकारला.

मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस यांच्या निर्देशानुसार, महावितरणचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक श्री. लोकेश चंद्र यांनी ऑनलाइन ग्राहकसेवा आणि अंतर्गत तांत्रिक कार्यप्रणालीला डिजिटल पद्धतीची जोड दिली आहे. यात प्रामुख्याने वीजपुरवठ्याशी संबंधित ‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’द्वारे राज्यातील ३ हजार २०० पेक्षा अधिक उपकेंद्रांना मुंबई मुख्यालयातील मध्यवर्ती ‘कमाण्ड अ‍ॅण्ड कंट्रोल सेंटर’सोबत डिजिटल पद्धतीने जोडले आहे. या प्रणालीमुळे प्रामुख्याने उच्च व लघुदाब वीजवाहिन्या (फीडर्स), ट्रान्सफॉर्मर्स, कॅपेसिटर बँक आणि ब्रेकर्स यांचे रिअल-टाइम नियंत्रण करणे शक्य झाले आहे.

विशेष म्हणजे मुख्यमंत्री सौर कृषिवाहिनी योजना २.० अंतर्गत शेतकऱ्यांना दिवसा वीजपुरवठा करण्यासाठी अत्यंत महत्वाच्या २ हजार ७०० पेक्षा अधिक सौर कृषी वीजवाहिन्यांचा यात समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना दिवसा व सुरळीत वीजपुरवठा करणे आणि सौर ऊर्जेचा प्रभावी वापर करणे अत्यंत सहजसोपे व प्रभावी झाले आहे.

‘सबस्टेशन मॉनिटरिंग सिस्टिम’च्या तंत्रज्ञानामुळे विजेच्या मागणीचे अचूक नियोजन होत आहे. विजेची मागणी किती राहील याचे अचूक पूर्वानुमान या प्रणालीद्वारे होत आहे. त्यामुळे महावितरणच्या वीज खरेदीमध्ये आर्थिक बचत सुरू झाली असून सुमारे एक हजार १०० कोटी रुपयांहून अधिक रकमेची बचत करण्यात आली आहे. तसेच तांत्रिक आणि वाणिज्यिक हानीमध्ये मोठी घट होऊन देखभाल-दुरुस्तीचा खर्चही कमी झाला आहे.

## सिंगापूरहून ‘डिस्नी अ‍ॅडव्हेंचर’चा पहिला सागरी प्रवास सुरू

**पुणे (दै. संध्या) :**



‘डिस्नी क्रूझ लाईन’चे नवीन जहाज डिस्नी अ‍ॅडव्हेंचर यांनी सिंगापूरमधून आपल्या पहिल्या सागरी प्रवासाला सुरुवात केली आहे. आशियामध्ये मुख्य बंदर असलेले हे पहिले डिस्नी क्रूझ जहाज ठरले असून या प्रवासात प्रवाशांचे उत्साहात स्वागत करण्यात आले. डिस्नीच्या शंभरहून अधिक वर्षांच्या कथा आणि पात्रांवर आधारित या जहाजामुळे आशियातील प्रवाशांना डिस्नी, मार्वल आणि पिक्सारच्या लोकप्रिय कथा नव्या रूपात अनुभवता येणार आहेत. या जहाजावर सात वेगवेगळ्या संकल्पनांवर आधारित आकर्षक विभाग तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये डिस्नी इमॅजिनेशन गार्डन, टॉय स्टोरी प्लेस, सॅन फ्रान्झोक्यो स्ट्रीट, टाऊन स्क्वेअर, वेफाइंडर बे, डिस्नी डिस्कव्हरी रीफ आणि मार्वल लँडिंग या भागांचा समावेश आहे. या सर्व भागांमध्ये कुटुंबातील प्रत्येकासाठी मनोरंजन, आकर्षणे, खाद्यपदार्थ आणि खरेदीची विशेष सोय करण्यात आली आहे. डिस्नी क्रूझ लाईनने या जहाजावर ४० हून अधिक मनोरंजन कार्यक्रम सादर करून नवीन विक्रम केला आहे. ‘डिस्नीज सीज द अ‍ॅडव्हेंचर’सारखे लोकप्रिय कार्यक्रम आणि पात्रांना प्रत्यक्ष भेटण्याची संधी प्रवाशांना मिळणार आहे.

## धनकवडी पुणे येथे ७० कर्तृत्ववान महिलांचा सन्मान

*जागतिक महिला दिनानिमित्त पोलीस तपास साप्ताहिक व महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचा उपक्रम*

**पुणे (दै. संध्या) :**




जागतिक महिला दिनाचे औचित्य साधत येथील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते मा. विजय कोल्हापुरे यांच्या धनकवडी,पुणे येथील दशमुखी भवानी माता मंदिराजवळील सभागृहात झालेल्या समारंभात विविध क्षेत्रात उल्लेखनीय सामाजिक कार्य करणाऱ्या ७० कर्तृत्ववान महिलांचा प्रशस्तीपत्रक देऊन सन्मान करण्यात आला. हा उपक्रम पोलीस तपास साप्ताहिक वृत्तपत्र व महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने नुकताच आयोजित करण्यात आला होता.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी धनकवडी,पुणे येथील वरिष्ठ सामाजिक कार्यकर्त्या श्रीमती वर्षाताई नाईक या होत्या. तर प्रमुख मान्यवर म्हणून सेवानिवृत्त पीएसआय विठ्ठलराव माने, वरिष्ठ पत्रकार प्रा.सुभाष अण्णा शेटे, महाराष्ट्र पोलीस बॉईज संघटनेचे पुणे शहराध्यक्ष व क्राईम रिपोर्टर श्री.चेतन शर्मा, तसेच सामाजिक कार्यकर्ते श्री.दत्तात्रेय जरंडे उपस्थित होते. या मान्यवरांच्या हस्ते उपस्थित ७० महिलांना प्रशस्तीपत्रक देऊन गौरविण्यात आले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते धनकवडी येथील विजय कोल्हापुरे यांच्या दशमुखी भवानी माता मंदिरातील भवानी मातेची विधिवत आरती करण्यात आली.समाजसेवा, महिला सक्षमीकरण व विविध सामाजिक उपक्रमांमध्ये उल्लेखनीय कार्य करणाऱ्या महिलांचा सन्मान झाल्यामुळे उपस्थित महिलांच्या चेहऱ्यावर आनंद आणि अभिमानाचे वातावरण दिसून आले. कार्यक्रमाच्या शेवटी श्रीमती वर्षाताई नाईक यांच्या वतीने उपस्थित सर्व महिलांना गुलाबपुष्प व चहापान देऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.अशा प्रकारच्या उपक्रमांमुळे समाजात कार्य करणाऱ्या महिलांना प्रोत्साहन मिळत असल्याची भावना यावेळी उपस्थितांनी व्यक्त केली.

# पुरस्कारासाठी चित्रपट बनवू नका : प्रा. संतोष पाठारे



**पुणे (दै. संध्या) :**

आनंदासाठी चित्रपट तयार करा. मला व्यक्त व्हायचे आहे, काहीतरी लोकांना सांगायचे आहे, दर्जेदार कलाकृती निर्माण करायची आहे या दृष्टिकोनातून चित्रपट तयार करा आणि तो कसा झाला आहे हे प्रेक्षक ठरवतील. केवळ कोणत्या स्पर्धेत पारितोषिक मिळवायचे आहे म्हणून चित्रपट बनवू नका असा सल्ला चित्रपट समीक्षक, दिग्दर्शक लेखक प्रा. संतोष पाठारे यांनी दिला.

अनेकांत एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयातील डिपार्टमेंट ऑफ मीडिया अँड कम्युनिकेशन स्टडीज विभागातर्फे आयोजित पहिल्या अनेकांत राष्ट्रीय लघुपट महोत्सवाचा पारितोषिक समारंभ शुक्रवारी (दि.१४ मार्च) रोजी पार पडला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून पाठारे बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अनेकांत एज्युकेशन सोसायटी नियामक मंडळ सदस्य राहुल शाह, चंद्रवदन विद्याचंद्र शहा (मुंबईकर), उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर, डॉ. अरुण मगर, वाणिज्य शाखेचे

अधिष्ठाता डॉ. निरंजन शहा, कला शाखेच्या अधिष्ठाता डॉ सीमा नाईक- गोसावी, महोत्सव डायरेक्टर प्रा. राहुल चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते. महोत्सवाला प्रायोजकत्व दिल्याबद्दल सोहन इंडस्ट्रीजचे भारतबापू तावरे यांच्यावतीने संदीप तावरे यांचा तसेच विश्वास शंकरराव लोंढे यांचा सत्कार करण्यात आला. पहिल्या फेरीचे ज्युरी प्रा. डॉ. अजय ढवळे, स्वरूप गायकवाड यांनाही यावेळी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सर्वोत्तम लघुपटांच्या दिग्दर्शकांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानचिन्हे, प्रमाणपत्र , रोख रक्कम असा पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. लेखक, दिग्दर्शक निलेश कुंजीर यांनी स्पर्धेचे दुसरे परीक्षक म्हणून काम पहिले . राहुल शाह म्हणाले, अनेकांत राष्ट्रीय लघुपट महोत्सव बारामतीत आपल्या महाविद्यालयात पहिल्यांदा पार पडला. सर्व लघुपट विजेत्यांचे मी अभिनंदन करतो. तसेच ज्यांना पारितोषिक मिळाले नाही त्यांना पुढील वर्षी संधी मिळेल अशी अपेक्षा व्यक्त करतो. पाठारे म्हणाले, इंडस्ट्रीमध्ये यशस्वी झालेल्या कलाकृतींमधून दिग्दर्शकाकडून प्रेरणा घ्या मात्र त्याच पद्धतीचे काम करणे टाळा. आशय हा कायम चित्रपटाच्या केंद्रस्थानी असला पाहिजे यासह तांत्रिकदृष्ट्या तो कसा उत्तम बनवावा याकडे लक्ष दिले पाहिजे. कोणतीही कलाकृती परिपूर्ण नसते.

महोत्सवात सहभाग घेतलेल्या खिचडीभात लघुपटाचे दिग्दर्शक प्रवीण खाडे यांनी बारामती मध्ये जसे मुरब्बी राजकीय नेते घडले आहेत त्या प्रमाणेच चित्रपट निर्माते घडावेत असा आशावाद व्यक्त केला. तर अंकुर या चित्रपटाचे दिग्दर्शक मोहन धुळधर यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. गुरुवारी दि. १२ मार्च रोजी प्रसिद्ध अभिनेते, दिग्दर्शक प्रियदर्शन जाधव, अनेकांत एज्युकेशन सोसायटीचे सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), खजिनदार विकासभाई लेंगरेकर, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप यांच्या उपस्थितीत महोत्सवाचा उद्घाटन सोहळा पार पडला. महोत्सवात दोन दिवसात पहिल्या फेरीतून निवडलेले उत्कृष्ट ३५ लघुपट दाखविण्यात आले. समारोपाच्या कार्यक्रमामध्ये पाहुण्यांचे स्वागत उपप्राचार्य प्रा. डॉ. सचिन गाडेकर यांनी केले, प्रास्ताविक महोत्सवाचे संचालक प्रा. राहुल चौधरी यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुनंदा शेळके आणि प्रा. डॉ. सुनील खामगळ यांनी केले तर आभार उपप्राचार्य अरुण मगर यांनी व्यक्त केले.

**पारितोषिक**

उत्कृष्ट शॉर्ट फिल्म -
पाहिले पारितोषिक - शॉर्ट फिल्म: केकी - डायरेक्टर: तुषार उडेग.
द्वितीय पारितोषिक - शॉर्ट फिल्म: उन्मेय - डायरेक्टर: निशित हिवरकर.
तृतीय पारितोषिक - शॉर्ट फिल्म: डंप यार्ड - डायरेक्टर: निखिल शिंदे.
वयक्तिक अवॉर्ड-
बेस्ट रायटिंग - रायटर्स: आनंद पांडे व राजकुमार तांगडे - शॉर्ट फिल्म: हरवले आहेत ६ डिसेंबर १९५६ पासून.
बेस्ट डायरेक्शन - डायरेक्टर: प्रवीण अजिनाथ खाडे - शॉर्ट फिल्म: खिचडी भात.
बेस्ट सिनेमॅटोग्राफी - सिनेमॅटोग्राफर: प्रथमेश रांगोळे - शॉर्ट फिल्म: केकी
बेस्ट एडिटिंग- एडिटर: किरण ओत्तूर- शॉर्ट फिल्म: चिकन करी
स्पेशल ज्यूरी मेन्शन अवॉर्ड-
१)स्पेशल ज्यूरी मेन्शन फॉर साउंड डिज़ाइनिंग - साउंड डिज़ाइनर: देवेश कमसे - शॉर्ट फिल्म: उन्मेय.
२)स्पेशल ज्युरी मेन्शन फिल्म - शॉर्ट फिल्म: थुनाई डायरेक्टर: विघ्नेश परमसिवम - प्रोड्यूसर: आनंद वरदराज .
३) स्पेशल ज्युरी मेन्शन फिल्म - शॉर्ट फिल्म: मीरा- डायरेक्टर आणि प्रोड्यूसर: चैतन्य बडवे.
४) स्पेशल ज्युरी मेन्शन फिल्म - शॉर्ट फिल्म: अंकुर - डायरेक्टर आणि प्रोड्यूसर: मोहन धुळधर.

## थोडक्यात पण महत्वाचे...

### एन्ड टीव्हीवरील कलाकार सांगतायत त्यांचा गुढीपाडवा साजरा करण्याचा प्लॅन



पुणे (दैनिक संध्या) : गुढीपाडवा हा आनंद, नव्या सुरुवाती आणि सकारात्मकतेचे प्रतीक मानला जाणारा सण आहे. या दिवशी घरासमोर गुढी उभारणे, सुंदर रांगोळी काढणे आणि पारंपरिक गोड पदार्थ तयार करून सण साजरा केला जातो. एन्ड टीव्हीवरील कलाकारांसाठीही हा सण खास असून ते आपल्या कुटुंबीयांसोबत आनंदात हा दिवस साजरा करतात. या सणाच्या आठवणी आणि साजरीकरणाच्या योजना सांगताना 'घरवाली पेडवाली' मालिकेतील पनोती मामाची भूमिका साकारणारे अमिताभ घाणेकर म्हणाले, "गुढीपाडवा म्हणजे परंपरा, कुटुंबासोबतचा आनंद आणि नव्या सुरुवातींचा सण. माझ्या बालपणीच्या आठवणीत घराबाहेर उभारलेली गुढी, आईने केलेली पुरणपोळी, बटाट्याची भाजी आणि श्रीखंड यांचा सुगंध आजही ताजा आहे. यंदाही मी कुटुंबासोबत सण साजरा करणार असून मालिकेच्या सेटवर सहकलाकारांसोबतही गुढीपाडव्याचा आनंद घेणार आहे." तर 'भाबीजी घर पर है २.०' मालिकेत अंगूरी भाभीची भूमिका साकारणारी शिल्पा शिंदे म्हणाली, "गुढीपाडवा हा माझ्यासाठी खूप खास सण आहे. लहानपणी प्रत्येक घरासमोर उभारलेली गुढी पाहायला मला खूप आवडायचे. आई पहाटे उठून पुरणपोळी आणि श्रीखंड तयार करायची आणि घरभर गोड सुगंध दरवळायचा. आजही मी हा सण साध्या पण पारंपरिक पद्धतीने कुटुंबासोबत साजरा करते." दरम्यान, प्रेक्षकांना 'घरवाली पेडवाली' ही मालिका रात्री १० वाजता आणि 'भाबीजी घर पर है २.०' रात्री १०.३० वाजता दर सोमवार ते शुक्रवार एन्ड टीव्हीवर पाहायला मिळते. तसेच या मालिकांचे सर्व भाग प्रेक्षकांना झी५ या मंचावरही पाहता येतात.

### सिंधू सेवा दलातर्फे शुक्रवारी (ता. 20) 'चेटीचंड' महोत्सव

पुणे (दैनिक संध्या) : सिंधी समाजाचे नूतन वर्ष व भगवान साई झुलेलाल यांच्या १०७६ व्या जन्मोत्सवानिमित्त सिंधू सेवा दलातर्फे 'चेटीचंड' महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. येत्या शुक्रवारी (दि. २० मार्च) हा महोत्सव डेक्कन कॉलेज बँक्वेट हॉल, डेक्कन कॉलेज ग्राउंड, बॉम्बे सॅपर्स जवळ, येरवडा, पुणे येथे होणार आहे, अशी माहिती सिंधू सेवा दलाचे अध्यक्ष सचिन तलरेजा यांनी पत्रकार परिषदेत दिली. प्रसंगी सिंधू सेवा दलाचे माजी अध्यक्ष सुरेश जेठवानी, अशोक वासवानी ॲड. हरेश हेमराजानी व विजय दासवानी, सचिव जय पिंजानी, सहसचिव किरण फेरवानी, खजिनदार राजेंद्र फेरवानी व जनसंपर्क अधिकारी देवेंद्र चावला आदी उपस्थित होते. सचिन तलरेजा म्हणाले, "चेटीचंड महोत्सवात सांस्कृतिक कार्यक्रम आणि सिंधी समाज बांधवांचा मेळावा होणार आहे. सायंकाळी ७ वाजता भगवान साई झुलेलाल यांच्या प्रतिमेचे पूजन व आरती करून सामाजिक आणि सांस्कृतिक महोत्सवाची सुरुवात होईल. यंदाचा चेटीचंड महोत्सव महिला सक्षमीकरणावर आधारित आहे. संपूर्ण महिलांचा कलाकारांच्या संचाकडून यंदा सादरीकरण होणार आहे. यामध्ये संगीतकार, गायक, वादक सर्वच कलाकार महिला असून, त्यांच्यातील क्षमता, कल्पकता आणि नेतृत्व पुणेकरांना अनुभवता येणार आहे. जयपूर, भोपाळ, मुंबई, नागपूर, कोलकाता आदी शहरांतून हे कलाकार येत आहेत." या महोत्सवासाठी प्रमुख पाहुणे म्हणून नेटवर्क १८ ग्रुपचे व्यवस्थापकीय संपादक किशोर आजवानी असणार आहेत. सिंधी समाजात कपिल शर्मा अशी ओळख असलेल्या मोहित शेवानी कार्यक्रम संचालित करणार आहे. जनरेशन नेक्स्ट डान्स अकॅडमीतर्फे नृत्यकलेचे सादरीकरण होणार आहे. त्यानंतर प्रीतिभोजने (महाप्रसाद) महोत्सवाची सांगता होईल. पुणे आणि पिंपरी-चिंचवड परिसरातील चार ते साडेचार हजार अधिक सिंधी बांधव या महोत्सवात सहभागी होतील. सिंधी समाजाचा विकास करून समाजाच्या संस्कृतीविषयी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करणे व सिंधू समाजाच्या परंपरा जास्तीत जास्त लोकांपर्यंत पोहचविण्याचा आमचा मानस आहे. सिंधू सेवा दल गेली ३९ वर्ष कार्यरत आहे," असे सुरेश जेठवानी यांनी नमूद केले.




# स्वच्छता अभियानाने रुई गावचा परिसर झाला चकाचक

## संपदा चौधर यांच्या पुढाकारातून दिला संदेश

**बारामती (दै. संध्या) :**

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांनी पाहिलेले स्वच्छ व सुंदर बारामतीचे स्वप्न साकार करण्याच्या उद्देशाने रुई (ता. बारामती) येथे स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बारामती नगर परिषदेच्या नगरसेविका तथा उपगटनेते संपदा चौधर, प्रा. अजिनाथ चौधर यांच्या पुढाकारातून आयोजित करण्यात आलेल्या या मोहिमेला ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून संपूर्ण रुई परिसर चकाचक करण्यात आला.

दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांना अभिवादन करून या अभियानाचा प्रारंभ केला गेला.अजित पवार यांना स्वच्छतेची कमालीची आवड होती,त्याच भावनेतून नगराध्यक्ष सचिन सातव,आरोग्य समिती सभापती नवनाथ बल्लाळ यांच्या विशेष प्रयत्नातून हे अभियान हाती घेण्यात आले आहे. उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खासदार पार्थ पवार,युवा नेते जय पवार यांच्या मार्गदर्शनाखाली बारामती स्वच्छ व सुंदर राहावी या साठी प्रयत्न केला जाणार आहे.

या स्वच्छता अभियानांतर्गत गावातील मुख्य रस्ते,सार्वजनिक ठिकाणे,शाळा परिसर,नाले तसेच




चौकांची स्वच्छता करण्यात आली. ग्रामस्थ,युवक मंडळांचे कार्यकर्ते,महिला बचत गट तसेच विविध सामाजिक संस्थांचे सदस्य मोठ्या संख्येने सहभागी झाले. सर्वांनी एकत्रितपणे कचरा गोळा करून त्याची योग्य विल्हेवाट लावली तसेच प्लास्टिक कचरा वेगळा संकलित करण्यात आला.

स्वच्छता ही केवळ एका दिवसाची मोहीम नसून ती प्रत्येक नागरिकाची सवय झाली पाहिजे,असा संदेश या अभियानातून देण्यात आला.स्वच्छतेमुळे गावाचे सौंदर्य वाढतेच, शिवाय नागरिकांचे आरोग्यही चांगले राहण्यास मदत होते,असे मत यावेळी व्यक्त करण्यात आले.या उपक्रमामुळे रुई गावात स्वच्छतेबाबत सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून पुढील काळातही अशा प्रकारचे उपक्रम सातत्याने राबविण्याचा निर्धार ग्रामस्थांनी व्यक्त केला.संपदा चौधर यांच्या पुढाकारातून झालेल्या या स्वच्छता अभियानाचे गावकऱ्यांकडून कौतुक करण्यात येत आहे.

> "दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांच्या स्वच्छ व सुंदर बारामतीच्या संकल्पनेला प्रेरणा मानत हा उपक्रम आयोजित करण्यात आला. ग्रामस्थ, युवक मंडळे,महिला बचत गट तसेच विविध सामाजिक संस्थांच्या सहभागातून गावातील रस्ते,चौक,नाले आणि सार्वजनिक ठिकाणांची स्वच्छता करण्यात आली. नागरिकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत परिसर चकाचक केला. या अभियानातून स्वच्छतेबाबत जनजागृतीही करण्यात आली."
>
> **- संपदा चौधर**
> **(नगरसेविका तथा उपगटनेते बा.न.प)**

# राष्ट्रीय खेळाडू डॉ. सुषमा तायडे यांचा राजीव जालनापूरकर यांच्या हस्ते सन्मान

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

शिवछत्रपती पुरस्कार विजेते श्री राजीव जालनापुरकर यांच्या हस्ते राष्ट्रीय खेळाडू डॉ.सुषमा तायडे यांना गौरव मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ यांच्यावतीने वार्षिक क्रीडा पारितोषक समारंभा पुणे विद्यापीठात पार पडला याप्रसंगी अनेक खेळाडू तसेच अनेक क्रीडा संचालकांना त्यांच्या कार्याबद्दल पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आलेले आहे श्रीरामचंद्र अभियांत्रिक महाविद्यालयाच्या क्रीडा संचालिका डॉ. सुषमा तायडे यांनी युवकांच्या




क्रीडा विकासासाठी उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल त्याची दखल घेत श्री राजीव जालनापुरकर यांच्या हस्ते गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. डॉ.सुषमा तायडे यांनी युवकांमध्ये क्रीडा स्पर्धा आणि विविध क्रीडा प्रकारांमध्ये सहभाग वाढवा यासाठी मोलाचे प्रयत्न केले आहेत त्यांच्या मार्गदर्शनामुळे पुणे विद्यापीठातील तसेच इतर ठिकाणचे अनेक युवकांनी राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय कामगिरी केली आहे या गौरव सोहळ्यात उपस्थितांनी त्यांच्या कार्याबद्दल प्रशंसा करत असताना सांगितली की एका सामान्य कुटुंबातून असताना सुद्धा खेडेगावातून येऊन क्रीडा क्षेत्रामध्ये त्यांनी नावलौकिक केले आहे त्यामुळे त्यांना भारताचे राष्ट्रपती के आर नारायण यांच्या हस्ते डॉ. तायडे यांना राष्ट्रीय पदक मिळाले आहेत तसेच त्यांनी पुणे विद्यापीठाच्या महिला हॉकी संघाचे व्यवस्थापक आणि महाराष्ट्र सॉफ्टबॉल क्रिकेट महिला संघाचे प्रशिक्षक खेलो इंडिया मध्ये सुद्धा प्रशिक्षक म्हणून काम केले आहे हॉकी आणि बॉल बॅडमिंटन मध्ये सहा राष्ट्रीय प्रमाणपत्र आणि हॉकीमध्ये पाच अंतर विद्यापीठ प्रमाणपत्र मिळालेले आहे युवकांचे सक्षमीकरणासाठी त्यांनी केलेले योगदानाचे कौतुक केले डॉ. सुषमा तायडे यांच्या अथक प्रयत्नामुळे युवकांमध्ये क्रीडा विषयी जागृती आणि ऊर्जा निर्माण झाली आहे या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती ऑलिंपिक खेळाडू कविता राऊत पुणे विद्यापीठ कुलगुरू डॉ.सुरेश गोसावीसर , डॉ. पराग काळकर सर तसेच क्रीडा संचालक सुदाम शेळके सर अनेक विद्यार्थी खेळाडू क्रीडा संचालक शिक्षक उपस्थित होते.

डॉ. तायडे यांना मिळालेल्या पुरस्काराबद्दल रामचंद्र एज्युकेशन संस्थेचे सर्व कर्मचारी वर्ग तसेच संस्थापक अध्यक्ष सचिव खजिनदार प्राचार्य यांनी त्यांना मिळालेल्या गौरव मानचिन्ह बद्दल व त्यांच्या पुढील कारकीर्दस शुभेच्छा देऊन त्यांचे अभिनंदन केले.

# अर्थनकडून 'पीपल लीडर्स कॉन्क्लेव्ह २०२६' चे नवी दिल्लीत आयोजन

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

सामाजिक प्रभाव क्षेत्रातील नेतृत्व, संघटनात्मक विकास आणि मानवी संसाधन व्यवस्थापनावर सखोल चर्चा घडवून आणण्यासाठी अर्थनने नवी दिल्लीत प्रथमच 'पीपल लीडर्स कॉन्क्लेव्ह 2026' आयोजित केला. देशभरातील सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या संस्थांचे वरिष्ठ पीपल लीडर्स, एचआर प्रमुख आणि संघटनात्मक बांधणी करणारे अनेक नेते या कॉन्क्लेव्हमध्ये सहभागी झाले. या संवादमंचातून संस्थांनी नेतृत्वाची पुढील पिढी कशी घडवावी, संस्थात्मक बदलांच्या टप्प्यांमधून कसे मार्गक्रमण करावे आणि संस्थांची अंतर्गत रचना वाढत्या प्रमाणात मजबूत कशी करावी यावर व्यापक चर्चा झाली. या कॉन्क्लेव्हला अर्थनसाठीही

**■ सामाजिक प्रभाव क्षेत्रातील वरिष्ठ नेते एकत्र**

एक महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. मागील दहा वर्षांत मिशन-केंद्रित संस्थांसोबत काम करताना नेतृत्व, टीम्स आणि संघटनात्मक क्षमता बळकट करण्यासाठी अर्थनने केलेल्या प्रवासाचेही यावेळी स्मरण करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात अर्थनचे संस्थापक आणि सीईओ सत्यम व्यास यांच्या स्वागतपर भाषणाने झाली. त्यांनी सामाजिक क्षेत्रात मजबूत 'पीपल लीडरशिप' का आवश्यक आहे यावर प्रकाश टाकला. त्यानंतर आर्थनच्या सहसंस्थापक अंचल कक्कड यांनी मागील दशकातील संस्थेच्या प्रवासावर आणि विविध संस्थांसोबत काम करताना उभ्या केलेल्या नेतृत्व मॉडेल्सवर आपले विचार मांडले.

# बौद्ध बांधवांकडून मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन

## बारामतीत सामाजिक सलोख्याचा संदेश

**बारामती (दै. संध्या) :**

बारामती येथील मानव एकता युवक संघटना, शेरसुहास मित्र मंडळ आणि भारतदादा अहिवळे युवाशक्ती यांच्या संयुक्त विद्यमाने पवित्र रमजान महिन्याचे औचित्य साधत सालाबाद प्रमाणे याही वर्षी मुस्लिम बांधवांसाठी आमराई परिसरातील महात्मा फुले नगर येथे इफ्तार पार्टीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी या इफ्तार पार्टीला मुस्लिम बांधवांसह मराठा सेवा संघ,संभाजी ब्रिगेड यांसारख्या विविध सामाजिक संघटन व पक्षातील मान्यवरांनी मोठ्या संख्येने हजेरी लावली.

सध्या देशात आणि राज्यात सामाजिक ऐक्याला बाधा येईल असे वातावरण काही शक्तींकडून जाणीवपूर्वक निर्माण केले जात आहे.आशा देशविघातक शक्तींना रोखण्यासाठी व सर्व



जातीधर्मातील सामाजिक एकोपा आणि सलोखा कायम ठेवण्यासाठी गेल्या सहा वर्षांपासून आपण या इफ्तार पार्टीचे आयोजन करत असल्याचे आयोजक ॲड.सुशील अहिवळे आणि शुभम अहिवळे यांनी सांगितले. याप्रसंगी,माजी उपनगराध्यक्ष भारत अहिवळे,माजी नगराध्यक्ष इम्तियाज शिकिलकर, माजी नगरसेवक आसिफ अली खान, ॲड.अब्दुलकरीम बागवान, नगरसेवक अल्ताफ सय्यद, मराठा सेवा संघ आणि संभाजी ब्रिगेडचे दीपक भराटे,विकास खोत,प्रकाश टेमघर,राष्ट्रवादी युवक कॉंग्रेसचे अध्यक्ष अभिजीत घाडगे,कार्याध्यक्ष गौतम शिंदे,राष्ट्रवादी शरद पवार गटाचे अल्पसंख्यांक सेलचे अध्यक्ष मोहसीन पठाण, सामाजिक कार्यकर्ते दाऊद शेख,इम्रान पठाण,अल्ताफ बागवान,शब्बीर शेख, बिलाल बागवान,ओवेज बागवान,अस्लम शेख, सलिम सय्यद,विष्णुपंत चव्हाण,विठ्ठल आगवणे, सिकंदर शेख,युनुस शेख यांच्यासह आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी बिलाल बागवान,सिद्धार्थ लोंढे, अशपाक सय्यद,रफिक शेख,संजय शिंदे,रितेश गायकवाड,सोमनाथ कदम,सुमित मोहिते यांनी परिश्रम घेतले.विश्वास लोंढे यांनी आभार व्यक्त केले.

# महापालिकेच्यावतीने जागतिक महिला दिन कार्यक्रमाचे आयोजन

## समाजाचे व देशाचे सशक्तिकरण करायचे असेल तर सर्व क्षेत्रातील महिलांचे सशक्तिकरण होणे गरजेचे आहे : आयुक्त अनमोल सागर

**भिवंडी (दै. संध्या) :**

महिलांना विविध क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे अनेक क्षेत्रात महिला वर्ग यांचे मोठे योगदान आहे. घरगुती क्षेत्रात देखील त्यांच्या जबाबदाऱ्या आणि व व्यावसायिक, सार्वजनिक क्षेत्रातल्या जीवनातील जबाबदाऱ्या येतात या दोन्ही जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडत आहेत. जर समाजाचे व देशाचे सशक्तिकरण करायचे असेल तर सर्व क्षेत्रातील महिलांचे सशक्तिकरण होणे गरजेचे आहे, असे उद्गार महानगरपालिका आयुक्त अनमोल सागर यांनी काढले. भिवंडी निजामपूर शहर महानगरपालिकेच्यावतीने जागतिक महिला दिनाच्या कार्यक्रमाचे आयोजन कामतघर येथील वऱ्हाळदेवी माता मंगलभवन येथे करण्यात आले होते, त्यावेळी पालिका आयुक्त उद्घाटक म्हणून बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उप-महापौर तारिक अब्दुल बारी मोमीन होते. या कार्यक्रमाला अतिरिक्त आयुक्त विठ्ठल डाके, समाज कल्याण विभागाच्या अतिरीक्त आयुक्त नयना ससाणे, समाज कल्याण विभाग उपायुक्त सपना वसावा,



उपायुक्त मुख्यालय विक्रम दराडे, शिक्षण विभागाचे उपायुक्त बाळकृष्ण क्षिरसागर, मा. शहर अभियंता जमील पटेल,सहाय्यक संचालक नगररचना अजय साबळे, मुख्य लेखा व वित्त अधिकारी रामप्रसाद सोळुंके, समाज कल्याण विभागाचे सहाय्यक आयुक्त शैलेश दोंदे, निवडणूक विभागाचे सहाय्यक आयुक्त नितीन पाटील,सहायक आयुक्त प्रभाग समिती क्र. 1 मकसुम शेख, प्रभाग समिती क्र. 2 विनोद मनोरे, प्रभाग समिती क्र. 3 सुरेंद्र भोईर, प्रभाग समिती क्र. 4 गिरीष घोष्टेकर, प्रभाग समिती क्र. 5 ,सईद चिवणे व अन्य सर्व विभाग प्रमुख उपस्थित होते. आयुक्त अनमोल सागर पुढे म्हणाले की, महिलांना विविध क्षेत्रात समान संधी उपलब्ध करून देणे आवश्यक आहे अनेक क्षेत्रात महिला वर्ग यांचे योगदान आहे. घरगुती क्षेत्रात देखील त्यांच्या जबाबदाऱ्या आणि व व्यावसायिक, सार्वजनिक क्षेत्रातल्या जीवनातील जबाबदाऱ्या येतात या दोन्ही जबाबदाऱ्या चांगल्या प्रकारे पार पाडत आहेत. अनेक महिला कुटूंबासाठी व इतरांकरिता त्याग करतात. इतिहासात अनेक ठिकाणी महिलांचे योगदान देखील महत्त्वाचे आहे. ज्या महिला घरगुती स्वरूपाची कामे करतात त्यांचे सशक्तीकरण होणेदेखील आवश्यक आहे. समाजाचे व देशाचे सशक्तिकरण करायचे असेल तर सर्व क्षेत्रातील महिलांचे सशक्तिकरण होणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्या अध्यक्षीय मनोगतात उप-महापौर तारिक मोमीन यांनी नमूद केले की, प्रत्येक समाजाने महिलांचा सन्मान करणे आवश्यक आहे. जो समाज महिलांचा सन्मान करतो तो समाज प्रगत होतो. कोणतीही महिला ही चांगली अर्थतज्ञ असते. महिलांचे सक्षमीकरण, त्यांच्यामध्ये जागृतीची सुरवात ही आपल्या घरापासुनच व्हायला हवी. अतिरीक्त आयुक्त नयना ससाणे यांनी आपल्या प्रस्ताविकात विविध क्षेत्रातील महिला कशा कार्यरत आहेत याचा सविस्तर आढावा घेतला. महिलांच्या प्रत्येक क्षेत्रातील कर्तृत्वाची दखल समाजाने घेणे आवश्यक आहे. मिळालेल्या संधीचं सोनं महिला वर्ग करीत आहे. महिलांनी व्यक्त व्हायला शिकलं पाहिजे. कोणावरही अन्याय करू नये आणि कोणत्याही प्रकारचा अन्याय सहन करू नये असे प्रतिपादन ससाणे मॅडम यांनी आपल्या प्रास्ताविकात केले.

प्रसिद्ध स्त्रीरोग तज्ञ डॉ. उज्वला बर्दापूरकर यांचे महिलांचे आरोग्य व त्यांच्या समस्या यावर मुख्य मार्गदर्शन सत्र झालं, यावेळेला डॉ. उज्वला बर्दापूरकर यांनी नमूद केले की केंद्र शासनाने कॅन्सर प्रतिबंधक लस तयार केली आहे त्याचा लाभ सर्व महिलांनी घ्यावा. वय वर्ष 14 वरील सर्व महिलांनी कॅन्सर प्रतिबंधक लस घ्यावी असे आवाहन त्यांनी केले. महिलांनी आपल्या तब्येतीकडे प्रथम लक्ष द्या, स्वत:करिता वेळ द्या. घरातील महिलेची प्रकृती चांगली असेल तर कुटुंबाची चांगली काळजी घेतली जाते. या कार्यक्रमात बचत गटातील महिलांनी तयार केलेल्या वस्तूंचे प्रदर्शन व विक्री करिता स्टॉल लावण्यात आले होते. तसेच मनपाच्या वैदयकीय आरोग्य विभागातर्फे महिलांची आरोग्य तपासणी देखील करण्यात आली. पालिका कर्मचारी, अशा सेविका व शालेय विद्यार्थीनींनीं विविध सामाजिक, आरोग्य विषयक जनजागृतीपर मनोरंजनात्मक संगीत नृत्याचे कार्यक्रम सादर केले. पालिकेच्या सर्व विभागातील महिला कर्मचारी, आशा सेविका, बचत गटातील महिला या कार्यक्रमास फार मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

**PUBLIC NOTICE**

This is to inform that, my clients Mr. Yogesh Babaji Bhor, Mr.Yogesh Babaji Bhor is the owner of land of Gat no.94 area 0.31 R, 275- area 0.81 R, 278/2 area- 0.40 R situated at revenue Village Jadhavwadi, Taluka- Ambegoan, District- Pune. However Deed of assignment at Ambegoan Sub-Registrar at Sr.No. 2878/2021, Date 13/07/2021 Original Gift deed has been lost and misplaced Dated 02/01/2026. My client has already file missing police complaint at Manchar Police station on 13/03/2026 and lost certificate issued by Manchar Police station Ragi no. 98/2026.

This notice is issued in general public interest and to avoid any misuse of the above said original documents. Kindly note that missing complaint is also been filed by my client.

If anybody found the above stated original documents, kindly return the same to the undersigned.

Dated- 16/03/2026

Sd/-
Adv. Bhagyashri Babaji Shinde
M.A., LL.B./Notary (Govt. of India)
OFFICE : Shri Krushna Plaza,
Aalekar Near S.T. Stand Narayangao
Tal: Junnar, Dist : Pune.
Mob: 9960186361/962312

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**कार्यकारी अभियंता**
महाराष्ट्र ग्रामीण रस्ते विकास संस्था
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना, अण्णासाहेब मगर बिल्डींग,
पहिलामजला, गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे ४११०३७

ई-मेल mh-pun@nic.in
☎ 020-24260501

**निविदा सुचना क्रमांक ०१ / २०२५ २०२६**

मा. जिल्हाधिकारी, यांनी निर्देश दिल्यानुसार पुणे जिल्ह्याकरीता मुख्यमंत्री बळीराजा शेत/पाणंद रस्ते योजने साठी लागणाऱ्या यंत्र सामुग्री व पाईप पुरवठा दर तसेच कंत्राटदारांचे Empanelment निश्चित करणेस्तव कंत्राटदारांकडून विधानसभाक्षेत्र निहाय दोन वर्षासाठी ई-दरपत्रक मागविणेसाठी निविदा सूचना क्र. ०१/२०२५-२६ www.mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दिनांक १७/०३/२०२६ सकाळी ११.०० पासून प्रसिध्द करणेत आलेली आहे.

सही/-
(स. स. नगरारे)
कार्यकारी अभियंता
प्रधानमंत्री ग्रामसडक योजना महाराष्ट्र
ग्रामीण रस्त विकास संस्था, पुणे

क्रमांक : आरओसी-2025-26/क्र-5/C6591

## थोडक्यात पण महत्वाचे...

### सर्वसामान्यांचे हाल; रेशनवर 'रॉकेल' देण्याची विजय गुप्ता यांची मागणी



पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : आखाती देशांमध्ये सुरू असलेल्या युद्धजन्य परिस्थितीचा थेट परिणाम आता भारतातील घरगुती इंधन पुरवठ्यावर होऊ लागला आहे. पुणे, पिंपरी चिंचवडसह राज्यभरात देखील आयात विस्कळीत झाल्यामुळे बाजारपेठेत गॅस सिलिंडरचा प्रचंड तुटवडा निर्माण झाला असून, विशेषतः हातावर पोट असणाऱ्या नागरिकांना लागणारा पाच किलोचा छोटा सिलिंडरही मिळेनासा झाला आहे. या संकटकाळात गरीब जनतेला दिलासा देण्यासाठी राज्य सरकारने तातडीने रेशन कार्डावर दोन ते तीन लिटर रॉकेल उपलब्ध करून द्यावे, अशी मागणी ऑल महाराष्ट्र रेशन धान्य दुकानदार संघटनेचे खजिनदार विजय गुप्ता यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. त्यात विजय गुप्ता यांनी म्हटले आहे की, 'सध्याच्या जागतिक तणावामुळे एलपीजी (LPG) गॅसच्या पुरवठा साखळीवर मोठा परिणाम झाला आहे. मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना वेळेवर गॅस सिलिंडर मिळत नसल्याने त्यांच्यासमोर चुली पेटवण्याचे मोठे संकट उभे राहिले आहे. एकेकाळी स्वयंपाकासाठी मुख्य पर्याय असलेले रॉकेल आता रेशन दुकानातून जवळपास हद्दपार झाले आहे. खुल्या बाजारातही रॉकेल उपलब्ध नसल्याने लोकांच्या अडचणीत भर पडली आहे. गॅस सिलिंडरचा तुटवडा आणि वाढत्या किमतींमुळे गरीब जनता भरडली जात आहे. पाच किलोच्या सिलिंडरची उपलब्धता नसल्याने अनेकांवर उपासमारीची वेळ आली आहे. अशा वेळी सरकारने किमान आपत्कालीन उपाय म्हणून रेशन कार्डधारकांना दरमहा २ ते ३ लिटर रॉकेलचे वाटप करणे अत्यंत गरजेचे आहे." त्यांनी संघटनेच्या वतीने राज्य सरकारला विनंती केली आहे की, 'इंधन टंचाईच्या या काळात गरिबांच्या घरांतली चूल पेटती ठेवण्यासाठी प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत. रॉकेलचा कोटा पुन्हा सुरू केल्यास रेशन दुकानांच्या माध्यमातून सामान्यांना मोठा आधार मिळेल, असा विश्वास गुप्ता यांनी व्यक्त केला आहे.




### सायबर सुरक्षेबाबत सर्वांनी दक्षता बाळगणे आवश्यक - डॉ. रोहन न्यायाधीश

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : डिजिटल साधनांचा वापर करताना सायबर सुरक्षेबाबत सर्वांनी दक्षता बाळगणे आवश्यक आहे,असे मत सायबर तज्ञ् डॉ.रोहन न्यायाधीश यांनी व्यक्त केले.सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या गुणवत्ता सुधारणा कार्यक्रमाअंतर्गत इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स पुनाजच्या इन्स्टिट्यूट ऑफ बिझनेस मॅनेजमेन्ट अँड रिसर्च अर्थात आयबीएमआर यांच्यावतीने वाकड येथील शैक्षणिक संकुलात आयोजित सायबर सुरक्षा विषयावरील कार्यशाळेत ते बोलत होते. यावेळी बोलताना ते पुढे म्हणाले की, समाजमाध्यमांचा वापर करताना कोणत्याही प्रकारची वैयक्तिक माहिती देऊ नये,तसेच कायम सजग राहून कोणत्याही प्रलोभनाला बळी पडू नये असे सांगत मोबाईलचा वापर करताना गरजेपुरत्या ऍप्सचाच वापर करावा आणि सायबर गुन्हा घडल्यास पोलिसांशी तात्काळ संपर्क साधावा असेही न्यायाधीश यांनी सांगितले. तर यावेळी बोलताना यशस्वी एज्युकेशन सोसायटीच्या आयआयएमएसचे संचालक डॉ. शिवाजी मुंढे यांनीही त्यांच्या मनोगतात सांगितले की, देशात सायबर गुन्ह्यांची संख्या लक्षणीयरीत्या वाढत असून लाखो करोडो रुपयांची फसवणूक झाल्याची प्रकरणे सामोरे येत आहेत. तर पिंपरी चिंचवड सायबर पोलीस विभागातील तपास अधिकाऱ्यांनी सायबर गुन्हे नेमके कसे घडतात याची उदाहरणे सांगत त्यापासून बचाव करण्यासाठी कशा प्रकारे उपाययोजना करून सावधगिरी बाळगावी याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले.

### तरुणाची गळफास घेऊन आत्महत्या

पिंपरी चिंचवड (दैनिक संध्या) : दिघी परिसरातील गंगोत्री हॉस्पिटलजवळ राहणाऱ्या १९ वर्षीय तरुणाने राहत्या घरी गळफास घेऊन आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना रविवारी रात्री घडली. अथर्व विजय देशमुख असे आत्महत्या केलेल्या तरुणाचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, अथर्व हा गंगोत्री हॉस्पिटल परिसरात पार्वती भोजने यांच्या घरी भाड्याने राहत होता. रविवारी सायंकाळी साडेसातच्या सुमारास त्याने राहत्या घरात सीट बेल्टच्या सहाय्याने गळफास घेतला. घटना घडली तेव्हा घराचा दरवाजा आतून बंद होता. अथर्वने बराच वेळ प्रतिसाद न दिल्याने त्याची आई ज्योती देशमुख आणि शेजाऱ्यांनी खिडकीतून घराची कडी उघडून आत प्रवेश केला. त्यानंतर अथर्वला खाली उतरवून तातडीने जवळच्या गंगोत्री हॉस्पिटलमध्ये नेण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर असल्याने त्याला पुढील उपचारासाठी यशवंतराव चव्हाण रुग्णालयात हलविण्यात आले. तेथे डॉक्टरांनी तपासून त्याला मृत घोषित केले. या प्रकरणी दिघी पोलीसांनी घटनास्थळी पंचनामा करून मृतदेहाचे शवविच्छेदन केले आहे. अथर्वच्या आत्महत्येचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र आत्महत्येपूर्वी त्याने आपला मोबाईल फोन फॉरमॅट केल्याची माहिती समोर आली असून पोलिस पुढील तपास करत आहेत.

# पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडोरची अलाईनमेंट बदला

## खासदार श्रीरंग बारणे यांची लोकसभेत मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

पुणे-हैदराबाद हायस्पीड रेल्वे कॉरिडोर या प्रकल्पाचा मार्ग संत तुकाराम महाराजांचे पवित्र स्थळ असलेल्या भंडारा डोंगराखालून जात आहे. त्यामुळे या मार्गात बदल करावा. धार्मिक भावना व पर्यावरणाचे रक्षण होण्यासाठी रेल्वे मार्गाची अलाईनमेंट बदलवावी. पुणे ते लोणावळा मार्गावर दुपारच्या वेळेत लोकल रेल्वे सुरु करावी. पुणे-लोणावळा तिसरा व चौथा रेल्वे मार्गिकेसाठी राज्य सरकारने ५ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. केंद्र सरकारनेही यास गती देण्यासह राज्यातील विविध रेल्वेच्या प्रश्नांकडे खासदार श्रीरंग बारणे यांनी सभागृहाचे लक्ष वेधले. रेल्वेच्या २०१६-२७ च्या अर्थसंकल्पावर शिवसेना पक्षाच्या वतीने खासदार श्रीरंग बारणे यांनी चर्चेत सहभाग घेतला. त्यांनी मावळ लोकसभा मतदारसंघ तसेच महाराष्ट्राशी संबंधित विविध रेल्वे विषयक महत्त्वाचे प्रश्न मांडले. वाढत्या प्रवासी संख्येचा आणि औद्योगिक तसेच पर्यटन क्षेत्राच्या गरजांचा विचार करता महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांना अधिक गती देण्याची मागणी खासदार बारणे यांनी केली. खासदार बारणे




म्हणाले, देशात चार हजार किलोमीटर हाय स्पीड कॉरिडोर बनविण्याची तयारी सुरु आहे. मुंबई, पुणे, हैद्राबाद आणि बंगळुरु या प्रमुख आर्थिक शहराला हा कॉरिडोर जोडणार आहे. यामुळे रेल्वेची नवीन आणि आधुनिक क्रांती होईल. मुंबई परिसरात जागा नसल्याने भुयारी किंवा ओव्हर राईड रेल्वे करण्याची गरज आहे. पर्यटनदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या लोणावळा स्थानकावर मुंबई-पुणे 'वंदे भारत' एक्स्प्रेसला थांबा द्यावा. पुणे ते लोणावळा मार्गावर दुपारच्या वेळेत लोकल रेल्वे सुरु करावी. पुणे-लोणावळा तिसरा व चौथा रेल्वे मार्गिकेसाठी राज्य सरकारने ५ हजार १०० कोटी रुपयांची तरतूद केली आहे. केंद्र सरकारनेही यास गती दिल्यास लाखो प्रवाशांचा प्रवास अधिक सुरक्षित व सुलभ होईल. 'अमृत भारत स्टेशन' योजनेअंतर्गत चिंचवड, आकुर्डी, देहूरोड, तळेगाव, लोणावळा आणि पनवेल स्थानिकांचा पुनर्विकास केला आहे. कर्जत स्थानक राहिले आहे. कर्जत स्थानकाचाही समावेश करावा. कर्जत रेल्वे स्टेशन तयार होत आहे. मावळ लोकसभा मतदारसंघ रायगडपर्यंत विस्तारला आहे. श्री संत तुकाराम महाराजांची पावन भूमी देहूगाव आणि संत ज्ञानेश्वर महाराजांची तपोवन भूमी आळंदीत वर्षभरात लाखो वारकरी येतात. पंढरपूर, देहू आणि आळंदी या पवित्र स्थळांपर्यंत रेल्वे कनेक्टिव्हिटी अधिक सक्षम करण्याबरोबरच वारकऱ्यांसाठी विशेष गाड्यांची सोय करण्यात यावी. रेल्वे स्थानकांचे आधुनिकीकरण करावे. ही तीर्थस्थळे भक्तीची केंद्रे आहेत. चार ज्योतिर्लिंग महाराष्ट्रात आहेत. कोल्हापूर ते पुण्यापर्यंत धावणारी सह्याद्री एक्स्प्रेस मुंबईपर्यंत सुरु करावी. महाराष्ट्रातील प्रवासी, उद्योग आणि पर्यटन क्षेत्राला चालना देणारे प्रकल्प वेगाने पूर्ण व्हावेत. लोणावळ्यात पर्यटक मोठ्या संख्येने येतात. त्यांच्यासाठी सुविधा करावी. रेल्वे विभागाच्या जागेवर झालेल्या झोपड्यांवर एसआरए योजना लागू करावी. झोपडीत राहणाऱ्या लोकांना हक्काचे घर मिळेल, असेही खासदार बारणे म्हणाले.

## विरोधकांच्या अफवांवर विश्वास ठेवू नका – आ. शंकर जगताप

पिंपरी (दै. संध्या) :

आखाती देशांमधील युद्धजन्य परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर शहरात गॅस सिलिंडरचा तुटवडा निर्माण झाल्याच्या वावड्या उठल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले होते. या पार्श्वभूमीवर आमदार शंकर जगताप यांनी तातडीने प्रशासकीय यंत्रणा हलवून अन्नपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांसोबत महत्त्वाची बैठक घेतली. "शहरात गॅसचा पुरेसा साठा उपलब्ध असून पुरवठा सुरळीत आहे, त्यामुळे नागरिकांनी विरोधकांच्या कोणत्याही अफवांवर विश्वास ठेवू नये," असे आवाहन आमदार जगताप यांनी केले आहे. गेल्या काही दिवसांपासून शहरात गॅस टंचाई असल्याच्या चर्चांमुळे गॅस एजन्सीबाहेर नागरिकांच्या लांबच लांब रांगा लागल्याचे चित्र पाहायला मिळत होते. काही ठिकाणी गॅस मिळत नसल्याच्या तक्रारी वाढल्याने शहरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. परिस्थितीचे गांभीर्य ओळखून आमदार शंकर जगताप यांनी अन्न पुरवठा परिमंडळ अधिकारी विजयकुमार क्षीरसागर व अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांची तातडीने बैठक बोलावली. या बैठकीत आमदारांनी शहरातील गॅस पुरवठ्याची सद्यस्थिती, साठवणूक आणि वितरण व्यवस्थेचा सविस्तर आढावा घेतला. "नागरिकांना रांगेत उभे राहावे लागत असेल किंवा गॅसचा काळाबाजार होत असेल, तर ते खपवून घेतले जाणार नाही," अशा कडक सूचना त्यांनी प्रशासनाला दिल्या. गॅस सिलिंडरचा तुटवडा भासणार नाही याची खात्री करून घेण्यासाठी त्यांनी अधिकाऱ्यांकडून सविस्तर माहिती घेतली.

## ५९ अनुसूचित जातींसाठी 'अ-ब-क-ड' वर्गीकरणाची मागणी

पिंपरी (दै. संध्या) :

अनुसूचित जातींमधील सर्व घटकांना समान न्याय, प्रतिनिधित्व आणि विकासाच्या संधी मिळाव्यात, यासाठी 'अ-ब-क-ड' वर्गीकरण तातडीने लागू करण्यात यावे, अशी मागणी आमदार अमित गोरखे यांनी केली आहे. अनुसूचित जातींमधील ५९ विविध जातींना त्यांच्या लोकसंख्या, सामाजिक आणि शैक्षणिक स्थितीनुसार योग्य संधी मिळण्यासाठी हे वर्गीकरण आवश्यक असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. या मागणीसाठी आज आमदार अमित गोरखे यांनी अनोख्या पद्धतीने आंदोलन करत शासनाचे लक्ष वेधले. ५९ अनुसूचित जातींच्या नावांचा प्रतीकात्मक हार परिधान करून त्यांनी 'अ-ब-क-ड' वर्गीकरणाची मागणी अधोरेखित केली. या आंदोलनातून अनुसूचित जातींमधील सर्व घटकांना समान संधी देण्याची गरज अधोरेखित



करण्यात आली. यावेळी बोलताना आमदार अमित गोरखे म्हणाले की, अनुसूचित जातींमधील काही घटकांना आरक्षण व शासकीय योजनांचा लाभ मोठ्या प्रमाणात मिळत असताना काही जाती अजूनही विकासाच्या मुख्य प्रवाहापासून दूर आहेत. या पार्श्वभूमीवर अनुसूचित जातींच्या अंतर्गत 'अ-ब-क-ड' वर्गीकरण केल्यास वंचित आणि मागास घटकांना अधिक प्रभावीपणे न्याय मिळू शकतो. सत्तेत असतानाही समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी रस्त्यावर उतरून आवाज उठवणे ही आमची नैतिक आणि सामाजिक जबाबदारी आहे, असेही आमदार अमित गोरखे यांनी यावेळी सांगितले. सामाजिक न्यायाची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी आणि अनुसूचित जातींमधील सर्व घटकांचा समतोल विकास साधण्यासाठी 'अ-ब-क-ड' वर्गीकरण अत्यंत महत्त्वाचे पाऊल ठरेल, असा विश्वास आमदार अमित गोरखे यांनी यावेळी व्यक्त केला.

यापूर्वीही त्यांनी 'अ, ब, क, ड' अशी अक्षरे असलेला शर्ट परिधान करून विधानसभेत आणि बाहेरही या विषयाचा पाठपुरावा केला होता. आजच्या या कृतीतून त्यांनी उपवर्गीकरणाचा मुद्दा किती संवेदनशील आणि न्याय्य आहे, हे पुन्हा एकदा अधोरेखित केले आहे. आमदार गोरखे यांच्या या आंदोलनामुळे उपवर्गीकरणाचा मुद्दा पुन्हा एकदा चर्चेच्या केंद्रस्थानी आला आहे.

त्वरित हे वर्गीकरण जाहीर करावे असे आमदार गोरखे यांनी मागणी केली आहे.

> या वर्गीकरणामुळे दीर्घकाळापासून वंचित राहिलेल्या घटकांना शिक्षण, नोकरी आणि विविध शासकीय योजनांमध्ये न्याय्य प्रतिनिधित्व मिळेल. तसेच समाजातील असमानता कमी होऊन अनुसूचित जातींतील सर्व घटक मुख्य प्रवाहात येण्यास मदत होईल. राज्य शासनाने या मागणीची गांभीर्याने दखल घेऊन लवकरात लवकर सकारात्मक निर्णय घ्यावा आणि अनुसूचित जातींमधील 'अ-ब-क-ड' वर्गीकरण लागू करून सामाजिक न्यायाच्या दिशेने ठोस पाऊल उचलावे.
> - अमित गोरखे, आमदार

## 'ती'ने आत्मविश्वासाने जीवनाचे संतुलन साधावे- पद्माताई भोसले

पिंपरी (दै. संध्या) :

'ती' ने फक्त घरातील जबाबदाऱ्यांपुरतं मर्यादित न राहता स्वतःच्या करिअर आणि वैयक्तिक आकांक्षा शोधून पुढे यावे. 'ती' ने आत्मविश्वास आणि दृढ निश्चयाने व्यावसायिक आणि कौटुंबिक जीवन दोन्हीचे संतुलन साधावे. तसेच इतरांचे अनुकरण करण्यापेक्षा 'स्व' ची ओळख स्वीकारली तर जीवनात आनंद मिळेल. सर्व क्षेत्रात आता महिला महत्त्वाच्या भूमिका बजावत आहेत. आंतरराष्ट्रीय महिला दिन हा महिला सक्षमीकरणाचा उत्सव आणि विविध क्षेत्रातील त्यांच्या कामगिरीची ओळख आहे असे पीसीइटीच्या उपाध्यक्षा पद्माताई भोसले यांनी सांगितले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या (पीसीइटी) पिंपरी चिंचवड अभियांत्रिकी महाविद्यालय (पीसीसीओइ) येथे महाविद्यालय अंतर्गत तक्रार समिती यांच्या सहकार्याने महिला दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमात पद्माताई भोसले बोलत होत्या.



यावेळी मॅनेजमेंट इन्फॉर्मेशन सिस्टीम प्रमुख डॉ. एस. शिंदे, शैक्षणिक प्रमुख डॉ. के. राजेश्वरी, इनोव्हेशन इंक्युबेशन प्रमुख डॉ. रजनी पीके, फॅकल्टी डेव्हलपमेंट अँड वेल्फेअर डॉ. एस. भंडारी, इंटरनॅशनल रिलेशन्स प्रमुख डॉ. रोशनी राऊत, क्वालिटी ऍशुरन्स डॉ. व्ही. हरपाळे, उपयोजित विज्ञान प्रमुख डॉ. लीना शर्मा, संगणक अभियांत्रिकी प्रमुख डॉ. सोनाली पाटील, माहिती तंत्रज्ञान विभाग डॉ. जयश्री कट्टी, सीएसइ प्रमुख डॉ. अनुराधा ठाकरे, संगणक अभियांत्रिकी प्रमुख डॉ. रचना पाटील, बहुविद्याशाखीय अभ्यास विभाग प्रमुख डॉ. संजीवनी सोनार, कॉम्प्युटर एप्लीकेशन प्रमुख डॉ. अश्विनी लाडेकर आदी उपस्थित होते.

शिक्षणामुळे महिलांना स्वतःची खरी ओळख आणि क्षमता समजून घेण्याची संधी मिळते. तसेच आत्मविश्वास निर्माण होऊन स्वतंत्र निर्णय घेण्याची प्रेरणा मिळते आणि भविष्यासाठी योग्य, अयोग्य निवड करण्याचे धैर्य प्राप्त होते असेही पद्माताई भोसले म्हणाल्या. पीसीसीओइ ने हे शैक्षणिक वर्ष "एआय वर्ष" म्हणून घोषित केले आहे. यावेळी महिला सक्षमीकरणासाठी एआय या विषयावर आधारित प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये विद्यार्थिनींनी महिलांच्या सुरक्षितता, आरोग्य, शिक्षण, आर्थिक साक्षरता, करियर संबंधित समस्या यावर एआय आधारित उपाय सादर केले होते. पीसीसीओइच्या विद्यार्थ्यांनी ऑस्ट्रेलियातील लाट्रोब विद्यापीठाच्या सहकार्याने विकसित केलेल्या "निर्भया" प्रकल्प सादर केला होता.

तसेच प्राध्यापक, विद्यार्थी आणि कर्मचाऱ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे सादरीकरण केले. प्रास्ताविक आयसीसी प्रभारी डॉ. वृषाली भालेराव यांनी तर सूत्रसंचालन श्रावणी भांडलकर आणि प्राजक्ता चव्हाण या विद्यार्थिनींनी केले.

प्रा. डॉ. सोनल गोरे यांनी आभार मानले. पीसीइटीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई आणि पीसीसीओइचे संचालक, प्राचार्य डॉ. गोविंद कुलकर्णी यांनी सर्वांना महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या.

## चाकणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात महिलेचा मृत्यू

पिंपरी (दै. संध्या) :



पुणे जिल्ह्यातील चाकण येथे भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्ल्यात ३२ वर्षीय महिलेचा जागीच मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. ही घटना सोमवारी मध्यरात्री सुमारे दोनच्या सुमारास आंबेठाण चौक परिसरात घडली असून परिसरात मोठी खळबळ उडाली आहे. शोभा विजय वाघमारे असे मृत महिलेचे नाव असून त्या सध्या चाकण परिसरात वास्तव्यास होत्या. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी मध्यरात्री शोभा वाघमारे या आंबेठाण चौकातील उड्डाणपुलाखालून सर्व्हिस रोडने जात असताना सहा ते सात भटक्या कुत्र्यांनी त्यांना घेरले. अचानक झालेल्या या हल्ल्यात कुत्र्यांनी त्यांच्यावर झडप घातली. सीसीटीव्ही फुटेजमध्ये दिसत आहे की, शोभा यांनी दगड उचलून कुत्र्यांना पळवून लावण्याचा आणि स्वतःचा बचाव करण्याचा प्रयत्न केला. मात्र कुत्र्यांच्या झुंडीसमोर त्यांचा निभाव लागला नाही. कुत्र्यांनी त्यांच्या हात, पाय, तोंड आणि मानेवर गंभीर चावे घेतल्याने त्यांना मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. या भीषण हल्ल्यात अवघ्या १५ मिनिटांतच त्यांचा मृत्यू झाला. सकाळी विवस्त्र अवस्थेत मृतदेह आढळून आल्याने परिसरात सुरुवातीला खून किंवा अत्याचाराचा संशय व्यक्त केला जात होता. मात्र पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर कुत्र्यांच्या हल्ल्यामुळेच मृत्यू झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, चाकण औद्योगिक वसाहत आणि शहर परिसरात भटक्या कुत्र्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असल्याची नागरिकांची तक्रार आहे. या घटनेनंतर नागरिकांमध्ये प्रशासनाविरोधात संताप व्यक्त होत असून भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी जोर धरत आहे.

# भगवान बुद्ध आणि महावीरांची शिकवणच आजच्या जागतिक परिस्थितीवर तोडगा

### प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस

पिंपरी (दै. संध्या) :

पिंपरी-चिंचवड-सायन्स पार्क सभागृहात कर्मयोगिनी महिला संस्था आयोजित कवयित्री सीमा शिरीष गांधी यांच्या "मी झाड व्हावे" या काव्यसंग्रहाचे तसेच स्वर्गीय पुष्पाबाई शांतीलाल गांधी यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ आणि जागतिक महिला दिनाच्या औचित्याने आयोजित "पत्र पुष्पांजली" या पत्रलेखन स्पर्धेतील पत्रसंग्रहाचे प्रकाशन सोहळा उत्साहात पार पडला. ज्येष्ठ साहित्यिक प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या शुभहस्ते हा प्रकाशन सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी ॲड. प्रार्थना सदावर्ते, प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, नीलिमा फाटक, अरुण



बोऱ्हाडे आणि दिनेश भोंबड यांची प्रमुख उपस्थिती लाभली होती.

यावेळी मार्गदर्शन करताना प्रा. डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, आजच्या जागतिक परिस्थितीत संघर्ष, असहिष्णुता आणि मूल्यांचा ऱ्हास वाढताना दिसतो. अशा काळात भगवान बुद्ध आणि भगवान महावीर यांच्या शांतता, करुणा आणि अहिंसेची शिकवणच मानवजातीला योग्य दिशा देऊ शकतात. समाजात समता, सहअस्तित्व आणि संवेदनशीलता वाढवण्यासाठी त्यांच्या विचारांची आज अत्यंत गरज आहे, असे त्यांनी प्रतिपादन केले.

कवयित्री सीमा शिरीष गांधी यांच्या "मी झाड व्हावे" या काव्यसंग्रहाबद्दल बोलताना त्यांनी सांगितले की, झाड हे जगण्याचे तत्त्वज्ञान शिकवते. झाड देत राहते. सावली देते, फळे देते आणि कोणतीही अपेक्षा न ठेवता जग समृद्ध करते. अशा झाडासारखे होण्याची प्रामाणिक इच्छा या कवितांमधून व्यक्त होते. हा काव्यसंग्रह समृद्ध जाणिवांचा चांदणप्रवास अभिव्यक्त करणारी सुंदर कलाकृती आहे.

या कवितांवर ज्येष्ठ कवी मा.धो. महानोर आणि बालकवी यांच्या काव्यपरंपरेचा प्रभाव जाणवतो. मुक्तछंदात लिहिलेल्या या कविता वाचकांशी थेट संवाद साधतात. साधी, सहज आणि हृदयस्पर्शी भाषा ही या कवितांची ताकद आहे तर अर्थपूर्णता हा त्यांचा आत्मा आहे, असेही त्यांनी नमूद केले. "पत्र पुष्पांजली" या संग्रहाची सूक्ष्म समीक्षा समीक्षक ॲड. प्रार्थना सदावर्ते यांनी अचूक केली, नीलिमा फाटक यांनी कवयित्री सीमा गांधी यांच्या "मी झाड व्हावे " या कवितासंग्रहाचे भावसौंदर्य रसिकांसमोर उलगडले. "कुणा पांथस्थाला बुद्ध करण्या वृक्ष ज्ञानी अजान व्हावे, मी झाड व्हावे, मी झाड व्हावे" अशा समृद्ध जाणिवांनी नटलेला हा काव्यसंग्रह कवयित्री सीमा गांधी यांनी स्नेहल आणि सलोनी या त्यांच्या दोन सुनांना अर्पण केला. अरुण बोऱ्हाडे यांनी सौ सीमा गांधी यांच्या काव्य वाटचालीस शुभेच्छा दिल्या, प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया यांनी कर्मयोगिनी महिला संस्थेच्या मराठी संवर्धन आणि पर्यावरण विषयक कार्याबद्दल प्रशंसक उद्गार काढले.

भारतीय टपाल पत्र विभागातील जनसंपर्क अधिकारी दिनेश बोंबड यांनी लोप पावलेल्या पत्रलेखनाच्या संस्कृतीला उजाळा दिल्याबद्दल टपाल विभागातर्फे संस्थेचे अभिनंदन केले.

कार्यक्रमात "पत्र पुष्पांजली" पत्रलेखन स्पर्धेतील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

प्रथम क्रमांक (विभागून) : सौ. राजश्री बिनायकिया, विभावरी कुलकर्णी
द्वितीय क्रमांक (विभागून) : ॲड. रामचंद्र पाचुणकर, रेणुका कळंबे
तृतीय क्रमांक (विभागून) : डॉ. पौर्णिमा कोल्हे, नेहा शेटे
उत्तेजनार्थ : जयंत कोपर्डेकर, राधिका बडगुजर, अपर्णा जाधव


सर्व विजेत्यांना रोख पारितोषिक, सन्मानचिन्ह आणि "पत्र पुष्पांजली" हा विशेष अंक देऊन सन्मानित करण्यात आले.

या कार्यक्रमाला साहित्यप्रेमी, कवी, वाचक आणि संस्थेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. साहित्य, निसर्गप्रेम आणि मानवी मूल्यांचा संगम घडवून आणणारा हा कार्यक्रम उपस्थितांसाठी प्रेरणादायी आणि संस्मरणीय ठरला.

प्रा. दिगंबर ढोकळे यांनी या देखण्या प्रकाशन सोहळ्याचे प्रभावी, बहारदार निवेदन करून रसिकांची मने जिंकली,

स्नेहल गांधी यांनी गणेश वंदना केली, सौ सीमा शिरीष गांधी यांनी प्रास्ताविक केले, राज, नील,सलोनी, शिरीष, शांतीलाल गांधी यांनी संयोजनात मदत केली.या प्रकाशन सोहळ्यासाठी पुण्यातील आणि पिंपरी चिंचवड परिसरातील अनेक दिग्गज साहित्यिक उपस्थित होते, सौ.स्नेहल गांधी यांनी आभार मानले.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### वैष्णवी गोरे यांचे निधन

चाकण (दैनिक संध्या) : चाकण येथील उच्चशिक्षित कुमारी वैष्णवी महेंद्र गोरे (वय.२३ वर्षे) यांचे निधन झाले. त्यांच्या मागे आई, वडील, आजी, आजोबा, भाऊ, बहीण असा मोठा परिवार आहे. बाजार समितीचे संचालक महेंद्र गोरे यांच्या त्या कन्या होत.

### नारायणगाव येथे भावी शिक्षकांना मोफत पुस्तकांचे वाटप

नारायणगाव (दैनिक संध्या) : 'सत्कार्येणभावी राष्ट्रकल्याणं सम्भवति!' या ध्येयवाक्यानुसार कार्यरत असलेल्या श्री. संत गाडगेबाबा भानुप्रभाकार सेवा प्रतिष्ठान, संगमनेर (जि. अहिल्यानगर) यांच्या वतीने ग्रामोन्नती मंडळ शिक्षणशास्त्र महाविद्यालय, नारायणगाव येथे वाचन संस्कृतीचे महत्त्व भावी शिक्षकांमध्ये रुजवण्यासाठी २३७ व्या कार्यक्रमांतर्गत मोफत पुस्तकांचे वाटप करण्यात आले. यदुनाथ थत्ते लिखित 'पुढे व्हा' या पुस्तकाच्या ५० प्रतींचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले मा. प्रा. चं. का. देशमुख यांनी विद्यार्थ्यांना वाचनाचे महत्त्व पटवून देताना सांगितले की, वाचन ही व्यक्तिमत्त्व विकासाची गुरुकिल्ली असून शिक्षकांनी स्वतः वाचनाची सवय जोपासली तरच विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाची आवड निर्माण होऊ शकते. वाचनामुळे विचारसरणी व्यापक होते आणि समाज घडविण्याची ताकद शिक्षकांमध्ये निर्माण होते, असे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एस. मुरादे यांनी संस्थेच्या उपक्रमाचे कौतुक करत विद्यार्थ्यांना अधिकाधिक वाचन करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाला डॉ. रविशा टाक, प्रा. शरद तरटे, प्रा. वैभव खराडे, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच बी.एड. प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापक, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी बी. एड. प्रथम व द्वितीय वर्षातील सर्व छात्राध्यापकांनी विशेष प्रयत्न केले. या उपक्रमामुळे भावी शिक्षकांमध्ये वाचनाची आवड निर्माण होण्यास निश्चितच प्रेरणा मिळणार असल्याची भावना उपस्थितांनी व्यक्त केली.

### नारायणगाव येथे भरदिवसा घरफोडी करून साडेतीन लाख रुपयांचा ऐवज लंपास

नारायणगाव (दैनिक संध्या) : नारायणगाव येथील शिवविहार सोसायटीतील शिवतेज बिल्डिंगमधील एका बंद सदनिकेचे कुलूप तोडून अज्ञात चोरट्यांनी साडेतीन लाख रुपयांचे सोन्या चांदीचे दागिने आणि रोख रक्कम चोरून नेली. रविवार दि. 15 मार्च 2026 रोजी शिवतेज बिल्डिंगमध्ये राहणारे सविता शांताराम कवडे या आपल्या आईसह दुपारी बाहेर गेल्या असताना पांढऱ्या रंगाच्या मोटरीतून आलेल्या तीन चोरट्यांनी त्यांच्या घराचा कडी कोयंडा तोडून आत प्रवेश केला. चोरट्यांनी कपाटातील दोन तोळे सोने चांदीचे दागिने आणि वीस हजार रुपये रोख असा एकूण साडेतीन लाखांचा ऐवज लंपास केला. या घटनेची माहिती मिळताच नारायणगाव पोलिस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक प्रवीण सपांगे यांनी पथकासह घटनास्थळी धाव घेतली. पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज ताब्यात घेतले असून चोरट्यांचा शोध सुरू केला आहे. याआधीही 4 डिसेंबर रोजी कोल्हेमळा येथील समृद्धी रेसिडेन्सी मधील सहा सदनिका फोडून दहा तोळे सोने व 80 हजारांची रोकड चोरण्यात आली होती. या गुन्ह्यांचा तपास अद्याप लागलेला नसल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे.

### डॉ. शरद गोरे नॅशनल आयडियल पर्सनालिटी अवॉर्डने सन्मानित



कोरेगावमुळ (दैनिक संध्या) : अखिल भारतीय मराठी साहित्य परिषदेचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ.शरद गोरे यांना पुणे येथे नॅशनल आयडियल पर्सनालिटी अवॉर्ड देऊन सन्मानित करण्यात आले राष्ट्रभक्ती संस्थेच्या वतीने हा पुरस्कार देण्यात आला. गेली ३३ वर्षे गोरे हे साहित्य संवर्धनाचे कार्य करीत आहेत आजवर विविध १९३ साहित्य संमेलनाचे यशस्वी आयोजन त्यांनी केले आहे,छत्रपती संभाजी महाराज यांनी संस्कृत भाषेत लिहिलेल्या बुधभूषण या ऐतिहासिक ग्रंथाचा त्यांनी मराठी काव्य अनुवाद केला आहे,ते प्रकाशक संपादक असलेल्या युंगधर प्रकाशन संस्थेच्या वतीने १४८ दर्जेदार पुस्तकांचे प्रकाशन आजवर झाले आहे. त्यांनी लेखक आणि दिग्दर्शक अभिनेता व संगीतकार म्हणून केलेल्या एक प्रेरणादायी प्रवास सूर्या या मराठी चित्रपटाने काना बर्लिन सारख्या आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात पारितोषिकावर आपली मोहोर उमटवली आहे.



### ॲड. गणेश सांडभोर यांचे निधन

चाकण (दैनिक संध्या) : भारतीय जनता पार्टीचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष व उद्योजक ॲड. गणेश नारायण सांडभोर (वय - ५४) यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. ॲड. सांडभोर यांनी आपल्या राजकीय कारकीर्दीत विविध संघटनांमध्ये प्रामाणिकपणे काम केले. शिवसेनेच्या खेड तालुकाप्रमुख पदी असताना त्यांची राजकीय कारकीर्द प्रचंड गाजली होती. भारतीय विद्यार्थी सेनेच्या वेगवेगळ्या पदावर त्यांनी जबाबदारी सांभाळली होती. राजगुरुनगर सहकारी बँकेची निवडणूकही त्यांनी लढवली होती. त्यांच्या निधनाने खेड तालुक्यात शोककळा पसरली असून सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे. सामाजिक व राजकीय क्षेत्रात सांडभोर यांचा मोठा दबदबा होता.

### चाकण परिसरात घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार; प्रशासनाचे दुर्लक्ष



चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यात चाकण सह बऱ्याच ठिकाणी घरगुती गॅस सिलेंडरचा काळाबाजार सुरू असल्याची बाब चव्हाट्यावर येवूनही प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याचा आरोप नागरिकांकडून होऊ लागला आहे. गॅसचा काळाबाजार रोखण्यासाठी राज्यातील अनेक ठिकाणी निरीक्षकांची नेमणूक करण्यात आल्याची माहिती समोर येत असताना खेड तालुक्यात अशी कोणतीही नेमणूक झाली आहे का ? याबाबत प्रशासनाकडून स्पष्ट माहिती दिली जात नसल्याने नागरिकांमध्ये संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे. घरगुती वापरासाठी मिळणारा सुमारे ९१७ रुपयांचा गॅस सिलेंडर काही ठिकाणी २,५०० रुपयांपर्यंत विकला जात असल्याचा आरोप होत आहे. विशेषतः काही हॉटेल व्यावसायिकांकडून घरगुती गॅसचा वापर केला जात असल्याचे बोलले जात असून सर्वसामान्य नागरिक मात्र गॅस मिळावा म्हणून रात्रंदिवस तासन्तास रांगेत उभे राहत असल्याचे चित्र चाकण परिसरात दिसून येत आहे. दरम्यान, प्रशासनाकडून मात्र गॅसचा कोणताही तुटवडा नाही असा दावा केला जात आहे. त्यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला आहे. जर तुटवडा नाही तर काळ्या बाजारात सिलेंडर सहज कसा उपलब्ध होतो? असेही बोलले जात आहे.

# महिलेच्या गळ्यातील ४.१२ लाखांचे दागिने लुटण्याचा प्रयत्न

**धाडसी पती-पत्नीमुळे चोर अटकेत**

**उरुळी कांच न(दै. संध्या)**

उरुळी कांचन (ता. हवेली) येथे सकाळच्या फेरफटक्यासाठी गेलेल्या महिलेच्या गळ्यातील अडीच तोळ्यांचे सोन्याचे दागिने मोटरसायकलवरून आलेल्या चोरट्याने हिसकावण्याचा प्रयत्न केला. मात्र पती-पत्नीच्या धाडसामुळे चोराला पकडण्यात यश आले असून अल्पवयीन चोराला व त्याच्या ताब्यात असलेली मोटरसायकल उरुळी कांचन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आली. तसेच उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत मिळालेल्या माहितीनुसार, उरुळी कांचन येथील भरत लक्ष्मण काळे (वय ५१) व त्यांची पत्नी जयश्री भरत काळे (वय ४३) हे सोमवार (दि.१६ मार्च) रोजी सकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नेहमीप्रमाणे एम.जी. रोड परिसरात सकाळचा फेरफटका मारत होते. यावेळी लोणारी नगर परिसरात समोरून मोटरसायकलवरून आलेल्या एका अल्पवयीन रा कामशेत (ता. मावळ, पुणे) या चोरट्याने जयश्री काळे यांच्या गळ्यातील सुमारे अडीच तोळे वजनाचे सोन्याचे दागिने आजच्या बाजार भाव प्रमाणे अंदाजे किंमत (४,१२,५००/-रु, चार लाख बारा हजार पाचशे) रुपये किमतीचे दागिन्याचा ऐवज हिसकावण्याचा प्रयत्न केला. घटना घडताच भरत काळे व जयश्री काळे यांनी प्रसंगावधान राखत चोरट्याचा पाठलाग सुरू केला. भरत काळे यांनी मोटरसायकलच्या मागील बाजूला पकडण्याचा प्रयत्न केल्याने



मोटरसायकल घसरून पडली. त्यानंतर चोरट्याने पळ काढण्याचा प्रयत्न केला. मात्र कोणतेही हत्यार असण्याची शक्यता असतानाही भरत काळे यांनी धाडस दाखवत चोराचा पाठलाग करून त्याला पकडले. दरम्यान परिसरातील नागरिकही घटनास्थळी जमा झाले. पोलीस विजय कांचन व नागरिकांच्या मदतीने चोराला व दागिने उरुळी कांचन पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले असल्याची माहिती भरत काळे यांनी दिली. उरुळी कांचन परिसरात यापूर्वीही दागिने हिसकावण्याच्या अनेक घटना घडल्या असल्याची चर्चा नागरिकांमध्ये आहे. काही दिवसांपूर्वी उरुळी कांचन यात्रेदरम्यान एका लहान मुलाच्या गळ्यातील सोन्याचा दागिना चोरण्याचा प्रयत्न करताना एका चोराला नागरिकांनी पकडल्याची घटना घडली होती.

तसेच गेल्या काही दिवसांपासून परिसरात अतिवेगाने फिरणाऱ्या दुचाकींबाबत नागरिकांनी पोलिसांना माहिती दिली होती. या घटनेमुळे सकाळी फेरफटका मारणाऱ्या नागरिकांमध्ये काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पती-पत्नीने दाखवलेल्या धाडसाचे परिसरात सर्वत्र कौतुक केले जात आहे.

> मी स्वतः पोलीस स्टेशनशी संपर्क साधून उरुळी कांचन परिसरात महिलांच्या गळ्यातील सोने हिसकवण्याबाबत तसेच उरुळी कांचन परिसरात संशयित अतिवेगाची दुचाकी वारंवार फिरत असल्याची माहिती दिली होती. यापूर्वीही उरुळी कांचन परिसरात भरदिवसा अनेक महिलांच्या दागिन्यांच्या चोऱ्या झाल्या आहेत. त्यामुळे पोलीस प्रशासनाने ग्रस्त वाढवाव्यात.
> **- संतोष आबासो कांचन, माजी नियोजन समिती सदस्य पुणे.**


# भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात महिलेचा करुण अंत

**दहा ते बारा कुत्र्यांच्या झुंडीचा हल्ला, चाकण हादरले**

**चाकण (दै. संध्या)**

पुणे जिल्ह्यातील औद्योगिक शहर असलेल्या चाकणमध्ये भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात एका ३२ वर्षीय महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. पुणे–नाशिक महामार्गावरील आंबेठाण चौकाजवळ मध्यरात्रीच्या सुमारास दहा ते बारा भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने महिलेवर हल्ला चढवून तिचा जागीच जीव घेतला. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

शोभा विजय वाघमारे (वय ३२) असे मृत महिलेचे नाव असून त्या मूळच्या नांदेड जिल्ह्यातील देगलूर येथील रहिवासी होत्या. सध्या त्या चाकण परिसरात वास्तव्यास होत्या. सोमवारी



(दि. १६) मध्यरात्री सुमारे दोन वाजण्याच्या सुमारास त्या आंबेठाण चौकाजवळील उड्डाणपुलाखालून सर्व्हिस रोडने जात असताना अचानक भटक्या कुत्र्यांच्या झुंडीने त्यांच्यावर हल्ला केला. दहा ते बारा कुत्र्यांच्या टोळीने एकाच वेळी हल्ला केल्याने त्या पूर्णपणे घेरल्या गेल्या. जीव वाचवण्यासाठी त्यांनी दगड उचलून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला. मात्र, कुत्र्यांच्या आक्रमक झुंडीपुढे त्यांचा निभाव लागला नाही. हा संपूर्ण प्रकार परिसरातील सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला आहे.

कुत्र्यांनी त्यांच्या हात, पाय, चेहरा आणि मानेवर गंभीर चावे घेतले. कपडे फाडून अंगाचे अक्षरशः लचके तोडल्याने मोठ्या प्रमाणात रक्तस्त्राव झाला. जवळपास १५ मिनिटे हा भीषण प्रकार सुरू होता. अतिरक्तस्त्राव आणि तीव्र जखमांमुळे शोभा वाघमारे यांचा घटनास्थळीच मृत्यू झाला. मंगळवारी सकाळी परिसरातील नागरिकांना विवस्त्र अवस्थेतील मृतदेह आढळून आला. सुरुवातीला हा अत्याचार किंवा खुनाचा प्रकार असावा अशी चर्चा सुरू होती. मात्र, पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासल्यानंतर हा प्रकार भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यामुळे झाल्याचे स्पष्ट झाले.

चाकण शहर आणि परिसरात भटक्या कुत्र्यांचा त्रास मोठ्या प्रमाणात वाढल्याची तक्रार नागरिकांकडून सातत्याने केली जात आहे. काही नागरिकांनी ही कुत्री सामान्य नसून लांडगा आणि कुत्रा यांच्या संकरित प्रजातीची असावीत, असा संशयही व्यक्त केला आहे. या घटनेनंतर नागरिक, महिला, मुले आणि ज्येष्ठ नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

भटक्या कुत्र्यांच्या हल्ल्यात आजवर अनेक घटना घडल्या आहेत. मागील महिन्यात मार्केटयार्ड परिसरात एका भटक्या कुत्र्याने तब्बल पंचवीस ते तीस जणांना चावे घेतले होते. परंतु आजच्या भीषण घटनेनंतर चाकण परिसरातील भटक्या कुत्र्यांवर तातडीने नियंत्रण मिळवावे, अशी मागणी स्थानिक नागरिकांकडून प्रशासनाकडे केली जात आहे.

## वाघोलीत भव्य कष्टकरी शेतकरी महिला परिषद

**वाघोली (दै. संध्या)**

महिला दिनाच्या निमित्ताने संतुलन संस्था महाराष्ट्रतर्फे दुपारी २.३० वाजता वाघोली येथील सोयरीक गार्डन मंगल कार्यालय, डिकॅथलॉनजवळ 'भव्य कष्टकरी शेतकरी महिला परिषद'चे आयोजन करण्यात आले आहे. महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उपसभापती व शिवसेना नेत्या डॉ. नीलम गोऱ्हे या कार्यक्रमात प्रमुख अतिथी म्हणून मार्गदर्शन करतील. परिषदेत शेतकरी महिलांच्या नावे जमिनीवर प्रथम नोंदणी, शाळकरी मुलींसाठी मोफत बस पास व सायकल योजना, वृद्ध महिलांसाठी दरमहा १० हजार रुपये पेन्शन, दगडखाण कामगारांच्या गायरान जमिनीवर घरे, बांधकाम विकास महामंडळात प्रतिनिधित्व आदी मागण्यांसह ठराव जाहीर करण्यात येणार आहे.



संतुलन संस्थेच्या अध्यक्षा वंदना भुजबळ, परिषद अध्यक्षा ॲड. पल्लवी रेगे व दगडखाण कामगार विकास परिषद महाराष्ट्र अध्यक्ष ॲड. बी. एम. रेगे यांच्या प्रयत्नातून हा कार्यक्रम होत आहे. कष्टकरी शेतकरी महिलांच्या समस्या, सशक्तीकरण, आर्थिक स्वावलंबन, शिक्षण व आरोग्याशी संबंधित मुद्द्यांवर चर्चा होईल. संस्था १९९७ पासून स्थलांतरित कामगार, ग्रामीण-आदिवासी महिलांच्या स्वाभिमानासाठी कार्यरत आहे.

## तालुका भाजपचं प्रसिद्धीपत्रक

**बारामती (दै. संध्या)**

बारामती विधानसभा पोटनिवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी भाजपच्यावतीने राजकीय पदाधिकारी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना विनंती केली जाणार आहे. महाराष्ट्रातील बारामती व राहुरी विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीचा कार्यक्रम घोषित झाला आहे.

या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांनी माध्यमांशी संवाद साधताना या पोटनिवडणुका सर्व पक्षांशी समन्वय साधून बिनविरोध व्हाव्यात, यासाठी प्रयत्न करण्याची भूमिका मांडली होती. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केलेल्या या भूमिकेचे बारामती तालुका भारतीय जनता पक्षाच्या वतीने स्वागत करण्यात आले आहे. बारामतीची निवडणूक बिनविरोध व्हावी या साठी राजकीय पदाधिकारी व सामाजिक संघटनांच्या पदाधिकाऱ्यांना भेटून विनंती करण्यात येणार असल्याची माहिती भाजपचे स्थानिक नेते दिलीप खैरे यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे दिली आहे.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, भाजप प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सरचिटणीस राजेश पांडे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक नेतृत्वासोबत समन्वय साधून ही निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी सर्वतोपरी प्रयत्न करण्यात येणार असल्याचे भाजपच्या वतीने सांगण्यात आले आहे.

# जांबुत-वडनेर रस्त्यावर दोन महिन्यापासून मातीचा ढिगारा

*अपघातास ठरतोय कारणीभूत : जीव गेल्यावरच प्रशासन जागे होणार का?*

**कवठे येमाई (दै. संध्या)**

शिरूरच्या बेट भागातून जाणाऱ्या जांबुत - वडनेर रस्त्यावर मागील दोन महिन्यापासून एक मोठा मुरूम मातीचा ढिगारा रस्त्याच्या अर्धवट भागा पर्यंत पडून असून अनेकदा या ठिकाणी घडत आहेत हा ढिगारा अपघातास कारणीभूत ठरत आहे.एखाद्याचा जीव गेल्यावर च प्रशासन जागे होणार का ? असा संतप्त सवाल वडनेर खुर्द येथील सामाजिक कार्यकर्ते विनायक चौधरी यांनी केला आहे.

याच ढिगाऱ्याजवळ दुचाकी घसरल्याने झालेल्या अपघातात विनायक चौधरी यांच्या मातोश्री



शांताबाई रखमा चौधरी या डोक्याला मार बसल्याने गंभीर जखमी झाल्या तर त्यांच्या पत्नी अर्चना विनायक चौधरी यादेखील जखमी झाल्याची घटना नुकतीच घडली असून ध्रुव बाबाजी सुरकुंडे आणि इतर अनेक दुचाकीस्वार याच ठिकाणी घसरून पडल्याने जखमी झाले आहेत. दररोज दोन तीन जण त्या ठिकाणी पडत आहेत अनेक अपघात झाले असून या ठिकाणी एखादा जीव गेल्यावर च प्रशासन जागे होणार का असा प्रश्न चौधरी यांनी उपस्थित केला आहे. या रस्त्याचे काम अतिशय संथगतीने सुरू आहे. दररोज एक दोन दुचाकीस्वार हमखास घसरून पडतात. येथे काल पण दोन अपघात झाले एखादा जीव जाऊ शकतो.

हा ढिगारा खूप धोकादायक ठरत आहे.संबंधित विभागाने रस्त्यालगत पडलेला ढिगारा लवकरात लवकर हलवावा योग्य योग्य तेथे दिशादर्शक फलक लावावेत आणि काम वेगाने पूर्ण करावे.अन्यथा ग्रामस्थांसह आंदोलन करण्याचा इशारा कार्यकारणी सदस्य भाजपा पुणे जिल्हा पदवीधर आघाडी विनायक रखमाजी चौधरी यांनी दिला आहे.

# गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य गेला चुलीत



**नारायणगाव (दै. संध्या)**

सध्या गॅस टंचाईमुळे सर्वसामान्य व गरीब भरडला जाऊ लागला आहे. या गॅस टंचाईचा फटका सर्वसामान्यांना मोठ्या प्रमाणात बसला असून आता हा वर्ग पुन्हा चुली व कोळश्यांच्या भट्टीकडे वळू लागला आहे. त्यामुळे सर्वसामान्य गेला चुलीत म्हणण्याची वेळ आली आहे. सध्या अमेरिका, इराण व इस्त्रायल या देशांतील चाललेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे निर्माण झालेली गॅस टंचाई आणि सतत वाढणारे गॅस सिलेंडरचे दर यामुळे ग्रामीण भागात पुन्हा एकदा पारंपरिक मातीच्या चुली पेटू लागल्या आहेत. गॅसची बचत करण्यासाठी आणि चुलीवरच्या जेवणाची चव घेण्यासाठी अनेक कुटुंबांनी आता चुलीला पसंती दिली आहे.

गॅस टंचाई या संकटामुळे ज्यांच्याकडे गॅस कनेक्शन आहे, त्यांनीही खबरदारी म्हणून घराबाहेर किंवा ओट्यावर चुली बसवून घेण्यास सुरुवात केली आहे. यामुळे अनेक वर्षानंतर ग्रामीण भागात पुन्हा एकदा चुलीचा धूर दिसू लागला असून मातीच्या चुली बनवणाऱ्या कारागिरांना सुकीचे दिवस आले आहेत.

> सध्या एका मातीच्या चुलीला दीडशे ते दोनशे रुपये दर मिळत आहे. चुलींना मागणी वाढली असली तरी हे काम करण्यासाठी कामगारांची मोठी कमतरता भासत आहे. तसेच चूल बनवण्यासाठी लागणारी माती मिळवनेही कठीण झाले आहे. या अडचणीमुळे भविष्यात मातीच्या चुलींच्या किमतीत वाढ होण्याची शक्यता आहे.
> **- शिवदास रसाळ कुंभार**

## महिला मोर्चा अध्यक्षपदी योजना ठोकळे यांची नियुक्ती

**मुलुंड (दै. संध्या)**

मुलुंड, भारतीय जनता पार्टीच्या मुंबई महिला मोर्चा अध्यक्षपदी योजना ठोकळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजपा मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत ही महत्त्वाची जबाबदारी त्यांच्याकडे सोपवली आहे. या नियुक्तीबद्दल ठोकळे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच पक्षातील सर्व वरिष्ठ नेत्यांचे मनःपूर्वक आभार मानले. नियुक्तीनंतर प्रतिक्रिया देताना योजना ठोकळे यांनी सांगितले की, "हा माझ्यासाठी अत्यंत अभिमानाचा आणि भावनिक क्षण आहे. मी बौद्ध समाजातील, सामान्य शेतकरी कुटुंबात जन्मलेली मुलगी असून सामाजिक क्षेत्रात काम करत असतांना आंबेडकरी चळवळीशी नाळ जोडलेली असून अनेक सामाजिक,शैक्षणिक योजनांचा लाभ महिलांना मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे."



संविधान जागर यात्रा संयोजिका म्हणुन महाराष्ट्र भर संविधानाची जनजागृती केली. २०२५ ला त्यांना महाराष्ट्र शासनाचा डॉ बाबासाहेब आंबेडकर समाजभूषण पुरस्काराने गौरविण्यात आले होते. त्या पुढे म्हणाल्या की, "मुंबईसारख्या आंतरराष्ट्रीय शहरात एका राष्ट्रीय पक्षाच्या सामान्य कार्यकर्तीपासून महिला मोर्चाच्या मुंबई अध्यक्षपदापर्यंत पोहोचणे ही मोठी जबाबदारी आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### स्वर्गीय दिना बामा पाटील प्रतिष्ठान तर्फे गुणवंत विद्यार्थ्याचा लॅपटॉप देऊन सत्कार

मुंबई (दैनिक संध्या) : सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी मित्र मंडळ, घाटकोपर (पंतनगर) यांच्या वतीने वार्षिक कौटुंबिक स्नेहसंमेलनाचे आयोजन उत्साहात पार पडले. या कार्यक्रमात दहावीच्या परीक्षेत ९२ टक्के गुण मिळवून उल्लेखनीय यश संपादन केलेल्या दिवेश अवधूत हडकर याचा मुंबईच्या महापौर रितू तावडे आणि ईशान्य मुंबईचे खासदार संजय दिना पाटील यांच्या हस्ते लॅपटॉप देऊन गौरव करण्यात आला. स्वर्गीय दिना बामा पाटील प्रतिष्ठान तर्फे लॅपटॉप देण्यात आले होते. घाटकोपर पंतनगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या स्नेहसंमेलनाला भांडुप प्रभाग क्रमांक ११४ च्या नगरसेविका राजोल पाटील यांचीही प्रमुख उपस्थिती होती. यावेळी मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थी दिवेश अवधूत हडकर याला लॅपटॉप भेट देऊन त्याच्या शैक्षणिक यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले. स्वर्गीय दिना बामा पाटील प्रतिष्ठान तर्फे लॅपटॉप देऊन हा सत्कार करण्यात आला. या प्रसंगी बोलताना खासदार संजय दिना पाटील यांनी सांगितले की, आजची तरुण पिढी समाजाला आधुनिक तंत्रज्ञानाच्या दिशेने पुढे नेत आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) मुळे जग झपाट्याने बदलत असून या बदलत्या काळात शिक्षणाला अत्यंत महत्त्व प्राप्त झाले आहे. शिक्षणामुळे व्यक्तीचा पाया भक्कम होत असून समाजाच्या प्रगतीसाठीही शिक्षण आवश्यक आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांनी शिक्षणावर भर देऊन पुढील पिढीलाही त्याचे महत्त्व पटवून द्यावे, असे आवाहन त्यांनी केले. तसेच भविष्यातही अशा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्याची संधी मिळावी, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. या कार्यक्रमाला सिंधुदुर्ग जिल्हा रहिवासी मित्र मंडळाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला.

### कल्याण येथे सावित्रीबाई फुले यांचा स्मृती दिन साजरा

कल्याण (दैनिक संध्या) : सामाजिक बंधन, रुढी परंपरा, अनिष्ठ चालिरिती या मध्ये अडकलेल्या स्त्रीला शिक्षणाच्या माध्यमातून ताठ मानेने सन्मानाने जगण्याची क्रांती ज्योत सावित्रीबाई फुले यांनी पेटविली असे प्रतिपादन श्री सावता माळी मंडळ कल्याण या संस्थेचे अध्यक्ष अनिल थोरात यांनी येथे केले. संस्थेच्या वतीने कल्याण (प) येथे सावित्रीबाई फुले यांच्या १२९ व्या स्मृती दिना निमित्ताने केले सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेस महिला मंडळच्या अनुराधा भुजबळ (मा मुख्याध्यापिका )ठाणे म न पालिका यांच्या हस्ते पुष्पहार व ज्योत पेटवून अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी विद्या चौधरी यांनी आपले विचार मांडले. अनुराधा भुजबळ यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवनावर ओवी सादर केली. जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुदाम गाडेकर यांनी आपले विचार मांडताना सांगितले की,आपण भाग्यवान आहोत की या कार्यक्रमास सातत्याने उपस्थितांपैकी विद्या चौधरी यांचे शिक्षण महात्मा ज्योतिराव फुले यांनी सुरु केलेली ओतूर तालुका जुन्नर या शाळेत शिक्षण घेतले आहे. हे सावित्रीबाई फुले यांचे कार्य दिडशे वर्षांनी आपल्या समोर आहे. या ऋणातुन आपण उतराई होण्याकरिता सामाजिक बांधिलकी जपली पाहिजे या कार्यक्रमास विद्या चौधरी, शोभा थोरात, मंदा ताम्हाणे अनुराधा भुजबळ, रविंद्र चौधरी, नवनीत गायकवाड,बाजीराव पाटील,अंकित पिंगळे इत्यादी मान्यवर समाज बांधव भगिनी उपस्थित होते.

### कामगार नेते अभिजीत राणे यांची भाजपा आघाडी च्या महाराष्ट्र प्रदेशाध्यक्षपदी निवड



मुंबई (दैनिक संध्या) : धडक कामगार युनियनचे संस्थापक-महासचिव आणि 'दैनिक मुंबई मित्र'चे संपादक अभिजीत राणे यांची महाराष्ट्र प्रदेश भाजपा कामगार आघाडीच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल कामगार वर्गात आनंदाचे वातावरण असून, विविध संघटनांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर, राज्य गुणवंत कामगार असोसिएशन महाराष्ट्र राज्य च्या वतीने मुंबई जिल्हाध्यक्ष प्रभाकर कांबळे यांच्या नेतृत्वाखाली मुंबई शहराचे उपाध्यक्ष केरबा डावरे, कार्याध्यक्ष दत्तात्रय मुळीक, ठाणे जिल्हाध्यक्ष भरत सकपाळ, मैत्री संस्थेचे अध्यक्ष सुरेश भोईर व इतर पदाधिकाऱ्यांसह अभिजीत राणे यांची गोरेगाव कार्यालयात भेट घेतली. यावेळी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे अभिनंदन करण्यात आले. कामगारांच्या प्रश्नांना आता नवा न्याय मिळणार असून अभिजीत राणे यांनी गेली अनेक वर्षे धडक कामगार युनियनच्या माध्यमातून हजारो कामगारांच्या हक्कासाठी लढा दिला आहे. आता सत्ताधारी पक्षाच्या कामगार आघाडीच्या प्रदेशाध्यक्षपदाची धुरा त्यांच्याकडे आल्याने, राज्यभरातील असंघटित आणि संघटित कामगारांच्या प्रलंबित प्रश्नांना मार्गी लावण्यासाठी मोठी मदत होईल, असे कामगार श्रेत्रात व्यक्त केला जात आहे.

# तनिष्कचे नवे 'डोर मंगळसूत्र कलेक्शन'

## संस्कृतीचा वारसा जपणाऱ्या आधुनिक मराठी महिलेच्या सन्मानार्थ, गुढीपाडव्यासाठी ब्रँडची खास भेट

पुणे (दै. संध्या)

पुण्यातील घराघरांतून नवसंकल्पांची आणि लग्नसराईच्या आगमनाची शुभसूचक गुढी उभारण्याची तयारी सुरु असताना, भारतातील सर्वात मोठा ज्वेलरी रिटेल ब्रांड आणि टाटा समूहाचा एक भाग 'तनिष्क', महाराष्ट्रातील 'मनस्विनी'च्या सन्मानार्थ एक विशेष मोहीम सादर करत आहे. ही मोहीम स्वाभिमानी मराठी महिलेला समर्पित आहे, जी आपल्या परंपरांचा आदर राखत, अभिमानाने आणि स्वतःच्या खास शैलीत त्या पुढे नेत आहे. या सांस्कृतिक उत्सवाचे औचित्य साधून, तनिष्कने खास गुढीपाडवा मंगळसूत्र कलेक्शन—'डोर' प्रस्तुत केले आहे; जे महाराष्ट्राचा सांस्कृतिक वारसा आणि आजच्या आधुनिक मराठी स्त्रीच्या व्यक्तिमत्त्वातून प्रेरित होऊन तयार करण्यात आले आहे.




या उत्सवाचे औचित्य साधून, तनिष्कने आधुनिक मराठी स्त्रीच्या सन्मानार्थ आपली पहिली प्रादेशिक कॅम्पेन फिल्म सादर केली आहे. ही फिल्म तिच्या दैनंदिन जीवनातील संस्कृती, स्वाभिमान आणि तिचे वेगळेपण अधोरेखित करते; तसेच याच भावनेचे प्रतिबिंब असलेल्या 'डोर' कलेक्शनला अतिशय जिवंतपणे साकारते. प्रसिद्ध अभिनेत्री प्रिया बापट हिच्या सहजसुंदर अभिनयाने ही फिल्म अधिकच उठावदार झाली आहे. या फिल्मची कथा 'डोर' कलेक्शनला अभिमान, ओळख आणि सामाजिक बांधिलकीचे एक मौल्यवान प्रतीक म्हणून अतिशय सुंदररीत्या गुंफते. आधुनिक मराठी स्त्री आपला वारसा अभिमानाने कसा पुढे नेत आहे, याचे दर्शन या कथेतून घडते. अस्सल सांस्कृतिक बारकावे आणि मनाला भिडणाऱ्या मांडणीमुळे, तनिष्क हा ब्रँड मराठी संस्कृती आणि त्यातील आत्मीयता केंद्रस्थानी ठेवणारा ब्रँड म्हणून अधोरेखित होतो.

'चंद्र डोर' — एक असे मंगलसूत्र ज्यात पेशवाई वैभव आणि मराठा साम्राज्याची शान सामावलेली आहे. याची उत्कृष्ट 'गोल्ड फिनिश' आणि अलंकृत 'वाटी', मराठा राजघराण्यातील शालीनता आणि सांस्कृतिक समृद्धीचे दर्शन घडवते. मंदिरांची वास्तुकला आणि सूर्यकिरणे दर्शवणाऱ्या नक्षीकामातून प्रेरित हा दागिना, नाजूक 'फिलीग्री' काम आणि 'वार्म अँटिक गोल्ड'च्या अप्रतिम कारागिरीने सजलेला आहे. हे केवळ एक आभूषण नसून, वारसा आणि आधुनिकता यांना जोडणारा एक सोनेरी दुवा आहे.

'डोर' कलेक्शनच्या निमित्ताने प्रथमच सादर होत आहे अतिशय आगळेवेगळे 'बनारसी इनॅमल मंगलसूत्र'; जे नाजूक मीनाकारी, कलात्मक फुलांची नक्षी आणि सळसळत्या 'इनॅमल' रंगांचा एक अद्भूत संगम आहे. हे कलेक्शन शतकानुशतके चालत आलेल्या कलेला आधुनिक आणि समकालीन रूप देते. यातील मुख्य आकर्षण म्हणजे 'कमल डोर'— एक अतिशय प्रभावी दागिना, ज्यामध्ये उमललेल्या कमळाच्या नक्षीसह बनारसी इनॅमलची जिवंत कारागिरी दिसून येते.

याला काळ्या मण्यांच्या दुहेरी पदरी माळेने जोडले गेले आहे, जे या डिझाइनचा राजेशाही थाट आणि त्याचे प्रतिकात्मक महत्त्व अधिकच वाढवते.

# चयापचय विकाराने ग्रस्त असलेल्या मुलाला नवीन जीवन मिळाले

मुंबई (दै. संध्या)

वेदांत (नाव बदलले आहे), जो व्हेरी-लाँग-चेन ॲसिल-कोए डिहायड्रोजनेज डेफिशियन्सी नावाच्या दुर्मिळ चयापचय विकाराने ग्रस्त आहे, त्याच्यासाठी सामान्य आजार देखील लपलेले धोके आहेत. अलिकडेच, एका साध्या श्वसन संसर्गाचे अचानक गंभीर वैद्यकीय आणीबाणीत रूपांतर झाले. तथापि, नारायणा हेल्थ एसआरसीसी चिल्ड्रन्स हॉस्पिटलमधील वैद्यकीय पथकाच्या त्वरित आणि तज्ञ काळजीने मुलाला जीवनाची एक नवीन संधी दिली. या प्रकरणात प्राथमिक प्रतिसाद देणारे डॉ. भरत परमार, वरिष्ठ सल्लागार, बालरोग औषध होते, तर आयसीयूमध्ये उपचार डॉ. संकेत सोनटक्के, सल्लागार - क्रिटिकल केअर मेडिसिन, पीआयसीयू सल्लागार यांच्या नेतृत्वाखाली होते. आरएसव्ही ब्रॉन्कायओलायटिसच्या गंभीर घटनेने वेदांतच्या नाजूक शरीरावर भार टाकला आणि तो अचानक आणि गंभीर चयापचय संकटात पडला. संसर्ग वाढत असताना त्याच्या श्वासोच्छवासाच्या अडचणी वाढल्या. रक्तातील साखरेची पातळी वेगाने कमी झाली, ज्यामुळे शरीराची ऊर्जा हिरावून घेतली गेली. काही वेळातच, त्याचे हृदय निकामी होऊ लागले. वेदांतला हृदयविकाराचा झटका आला आणि हृदयाचे ठोके गंभीर बिघडले. कुटुंबाला एक भयानक परिस्थितीचा सामना करावा लागला, त्यांना आश्चर्य वाटले की त्यांचा मुलगा त्या रात्री वाचेल का. गंभीर अवस्थेत, त्याला ताबडतोब नारायण एसआरसीसी बाल रुग्णालयात नेण्यात आले, जिथे डॉक्टरांनी ताबडतोब जीवनरक्षक उपचार सुरू केले. परिस्थिती व्यवस्थापित करण्यासाठी आपत्कालीन पुनर्जीवन, प्रगत व्हेंटिलेटरी सपोर्ट आणि चयापचय असंतुलनाचे अचूक नियंत्रण आवश्यक होते. डॉ. संकेत सोनटक्के म्हणाले, "ही एक अतिशय गंभीर परिस्थिती होती. प्रत्येक निर्णय जलद, काळजीपूर्वक आणि अचूक असणे आवश्यक होते. व्हीएलसीएडीडी असलेल्या मुलांमध्ये, ताणतणावात शरीर ऊर्जा निर्माण करू शकत नाही. आरएसव्ही सारखा सामान्य विषाणू देखील संपूर्ण प्रणाली अचानक कोलमडून टाकू शकतो.

# शिंगणापूर यात्रेसाठी पाणी पुरवठा विभाग सज्ज

माळशिरस (दै. संध्या)

अखिल महाराष्ट्राचे कुलदैवत असलेल्या शिखर शिंगणापूरच्या मोठ्या महादेवाची यात्रा २३ मार्चपासून सुरू होत असून, यात्रेसाठी येणाऱ्या भाविकांना आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी माळशिरस तालुक्याची प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. यात्रेदरम्यान भाविकांना पिण्याच्या पाण्याची अडचण भासू नये यासाठी विविध उपाययोजना करण्यात आल्या असल्याची माहिती पंचायत समितीचे पाणीपुरवठा उपअभियंता जयेश सदावरे यांनी दिली. यात्रेदरम्यान पिण्याच्या पाण्यासाठी पाच टँकरची मागणी करण्यात आली असून, या टँकरमध्ये कारुंडे येथील पाणीपुरवठा विहिरीतून पाणी भरले जाणार आहे. शिंगणापूर घाट, पिंपरी परिसर, कोथळे परिसर तसेच मुंगी घाट परिसरातील भाविकांना या टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्यात येणार असून, दररोज चार ते पाच खेपा करण्यात येणार आहेत. दरवर्षीप्रमाणे पाणी शुद्धीकरण व तपासणीसाठी आरोग्य विभागातील कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

# आमदार शेखर निकम यांचा 'जलजीवन मिशन' पाणी योजनेबाबत ठाम आवाज

मुंबई (दै. संध्या)

मुंबई येथे सुरू असलेल्या महाराष्ट्र अर्थसंकल्प अधिवेशन २०२५-२६ मध्ये चिपळूण-संगमेश्वर मतदारसंघाचे आमदार शेखर निकम यांनी ग्रामीण भागातील जलजीवन मिशन पाणी योजनेबाबत अत्यंत महत्त्वाचा प्रश्न सभागृहात मांडला.

गावोगावी सुरू असलेल्या जलजीवन मिशन अंतर्गत पाणीपुरवठा योजनांचे काही सुधारित आराखडे शासनाकडे सादर झालेले आहेत, असे त्यांनी सांगितले. अनेक ठिकाणी काम सुरू असताना पाईपलाईनचे पाईप कमी पडल्यामुळे अतिरिक्त मंजुरीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठवण्यात आले आहेत. या प्रस्तावांना तातडीने मंजुरी दिली तरच सुरू असलेली कामे वेळेत पूर्ण होऊन ग्रामीण जनतेला दिलासा मिळेल, अशी मागणी त्यांनी केली.




याचबरोबर त्यांनी सोलार प्रणालीचा मुद्दा अत्यंत ठामपणे मांडला. जलजीवन मिशनच्या काही योजनांमध्ये सुरुवातीला सोलारचा समावेश करण्यात आला होता, मात्र आता ती प्रणाली बसवली जाणार नसल्याचे सांगितले जात असल्याचे त्यांनी सभागृहात स्पष्ट केले.

जर सोलार बसवले नाहीत तर पाणीपुरवठा योजनेची वीज बिले लहान ग्रामपंचायतींना दरमहा पाच-पाच लाख रुपये भरणे शक्य होणार नाही, अशी वस्तुस्थिती आमदार निकम यांनी मांडली. त्यामुळे मंत्री महोदयांनी ग्रामीण भागासाठी मंजूर केलेल्या या महत्त्वाच्या योजनांमध्ये सोलार प्रणालीचा समावेश करणे अत्यावश्यक आहे, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

गावागावातील पाणी प्रश्न आणि ग्रामपंचायतींवरील आर्थिक ओझे लक्षात घेऊन जलजीवन मिशन योजना प्रभावीपणे राबवावी, यासाठी आमदार शेखर निकम यांनी विधानभवनात हा प्रश्न ग्रामीण जनतेच्या हक्कासाठी मुद्देसूद मांडला.

# *हायड्रेशन, प्रोटेक्शन आणि साधी काळजी : सोनी सब कलाकारांनी सांगितले उन्हाळ्यातील स्किनकेअर टिप्स*

मुंबई (दै. संध्या)

उन्हाळा म्हणजे तेजस्वी दिवस, वाढते तापमान आणि त्वचेची जरा जास्त काळजी घेण्याची गरज. कलाकारांना लांब वेळा तेजस्वी लाईट्सखाली आणि बाहेरच्या सेटवर काम करावे लागते, त्यामुळे त्वचा ताजीतवानी आणि सुरक्षित ठेवणे त्यांच्या रोजच्या दिनचर्येचा महत्त्वाचा भाग बनतो.

प्रत्येक जण उष्णतेशी वेगवेगळ्या पद्धतीने सामना करतो, पण अनेक कलाकार काही ठराविक स्किनकेअर सवयी पाळतात ज्यामुळे त्यांना संपूर्ण हंगामात आराम मिळतो. भरपूर पाणी पिणे, त्वचेचे सूर्यापासून संरक्षण करणे आणि छोट्या पण सातत्यपूर्ण सवयी पाळणे—या



गोष्टी उन्हाळ्यात आवश्यक ठरतात.

या उन्हाळ्यात सोनी सब कलाकार श्रेणू पारिख, दीक्षा जोशी, अक्षया हिंदळकर, ऋषी सक्सेना आणि नितीन बाबू यांनी त्यांच्या स्किनकेअर टिप्स आणि वैयक्तिक सवयी शेअर केल्या आहेत, ज्यामुळे व्यस्त शूटिंग शेड्यूलमध्येही त्यांची त्वचा ताजीतवानी आणि निरोगी राहते.

अक्षया हिंदळकर, पुष्पा इम्पॉसिबल मधील राशी पटेलची भूमिका साकारणारी, म्हणाली "उन्हाळ्यात मी गोष्टी अगदी साध्या ठेवते. मी भरपूर पाणी पिते आणि अलीकडे मी पाण्यात सब्जा बीज घेणे सुरू केले आहे. शूटिंगमुळे सनस्क्रीन कधीही चुकवत नाही. मी नेहमी छत्री घेऊन बाहेर पडते आणि शक्य असेल तर दुपारी बाहेर जाणे टाळते. खरं सांगायचं तर, पाणी आणि इलेक्ट्रोलाइट्स पुरेसे घेणे, दिवसातून दोनदा पटकन आंघोळ करणे—या छोट्या सवयी मला उष्णतेत ताजेतवाने ठेवतात आणि त्वचा निरोगी राहते."

नितीन बाबू, पुष्पा इम्पॉसिबल मधील चिरागची भूमिका साकारणारा, म्हणाला: "कलाकार म्हणून आमच्या त्वचेवर खूप ताण येतो—लांब वेळ लाईट्सखाली, मेकअपच्या थराखाली आणि कधी कधी शूट्सदरम्यान प्रवासही करावा लागतो. उष्णता त्यात भर घालते. मला जाणवले आहे की साधेपणा सर्वात चांगला काम करतो. मी दिवसाची सुरुवात सौम्य क्लेन्सिंगने करतो, त्यानंतर मॉइश्चरायझर आणि सनस्क्रीन कधीही चुकवत नाही. दिवसाच्या शेवटी मेकअपचे थर आणि प्रदूषणामुळे आलेली घाण व्यवस्थित साफ करणे तितकेच महत्त्वाचे आहे. सातत्याने बेसिक गोष्टी पाळणे हेच सर्वात महत्त्वाचे आहे."

श्रेणू पारिख, गणेश कार्तिकेय मध्ये देवी पार्वतीची भूमिका साकारणारी, म्हणाली "उन्हाळ्यात मी स्किनकेअर रूटीन हलके आणि साधे ठेवते. उष्णता आणि लांब वेळ मेकअपमुळे त्वचेवर ताण येतो, त्यामुळे भरपूर पाणी पिणे आणि सनस्क्रीन कधीही न चुकवणे महत्त्वाचे वाटते. मी त्वचा व्यवस्थित क्लेन्स करून तिला श्वास घेऊ देते, विशेषतः सेटवरच्या लांब दिवसानंतर. मला जाणवले आहे की साधेपणा आणि सातत्य ठेवल्यास त्वचा जास्त चांगला प्रतिसाद देते."

दीक्षा जोशी, पुष्पा इम्पॉसिबल मधील दीप्तीची भूमिका साकारणारी, म्हणाली "माझ्या मते उन्हाळ्यात सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे भरपूर पाणी पिणे—शरीरासाठी आणि त्वचेसाठी. आपण अनेकदा सतत प्रॉडक्ट्स वापरण्याची गरज वाटते, पण मला वाटते की त्वचेला कधी कधी श्वास घेऊ देणेही आवश्यक आहे. रूटीन साधे ठेवणे आणि खूप सिरम्स किंवा मॉइश्चरायझर्स न वापरणे ठीक आहे. मला वैयक्तिकरित्या चेहऱ्यावर आईसिंग करायला आवडते, विशेषतः लांब दिवसानंतर ते खूप ताजेतवाने वाटते."

ऋषी सक्सेना, इत्ती सी खुशी मधील संजयची भूमिका साकारणारा, म्हणाला "माझे स्किनकेअर रूटीन खूप साधे आहे आणि उन्हाळ्यातही फारसे बदलत नाही. मी दिवसाची सुरुवात थंड पाण्याचे काही शिंतोडे मारून करतो, ज्यामुळे त्वचा लगेच ताजीतवानी होते. त्यानंतर मी बेसिक्स पाळतो व्हिटॅमिन सी सिरम, मॉइश्चरायझर आणि सनस्क्रीन. मला साधेपणा आवडतो कारण सातत्यच सर्वात चांगले काम करते." सोनी सबवर पाहा 'इत्ती सी खुशी', 'गणेश कार्तिकेय' आणि 'पुष्पा इम्पॉसिबल'

# डब्ल्यूफॉरविमेन पॅरिस फॅशन वीकमध्ये पदार्पण करणारा पहिला इंडियन वेअर रिटेल ब्रँड

पुणे (दै. संध्या)

■ गेल्या वर्षी न्यूयॉर्कमध्ये ऐतिहासिक पदार्पणानंतर डब्ल्यूच्या पॅरिसमधील प्रदर्शनामधून जगातील सर्वात प्रतिष्ठित रनवेवर समकालीन भारतीय पोशाखांचे वाढते वर्चस्व दिसून येते.




पॅरिसमधील आपल्या पदार्पणासह डब्ल्यूने धाडसी महत्त्वाकांक्षा व्यक्त केली आहे, ती म्हणजे भारतीय एथनिक वेअरला जागतिक फॅशनमधील गतिमान आणि विकसित होणारी शक्ती म्हणून प्रस्थापित करणे. जागतिक प्रेक्षक सांस्कृतिक देवाणघेवाण आणि विविध शैलींचा स्वीकार करत आहेत, ज्यासह डब्ल्यूच्या पॅरिसमधील उपस्थितीमधून संदेश मिळाला आहे की भारतीय फॅशन आता जागतिक स्तरावर आत्मविश्वासाने पाऊल टाकत आहे आणि जागतिक शैलीचे भविष्य घडवत आहे. पॅरिस फॅशन वीकमध्ये दाखवण्यात आलेले कलेक्शन्स आता देशभरातील डब्ल्यूफॉरविमेन स्टोअर्समध्ये आणि ब्रँडची ऑफिशियल वेबसाइट https://www.wforwoman.com/ वर उपलब्ध आहे, ज्यासह रनवेवरील फॅशन प्रत्यक्ष भारतातील व भारताबाहेरील ग्राहकांसाठी सादर करण्यात आली आहे.

भारतीय फॅशनसाठी महत्त्वपूर्ण क्षणामध्ये आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि.च्या अधिपत्याखालील डब्ल्यूफॉरविमेन पॅरिस फॅशन वीकमध्ये त्यांच्या स्प्रिंग-समर26 कलेक्शनला सादर करणारा पहिला भारतीय वेअर बँड ठरला आहे, जेथे समकालीन भारतीय फॅशनला जगातील सर्वात प्रभावी प्लॅटफॉर्मवर नेले आहे.

डब्ल्यूचे पॅरिसमधील प्रदर्शन जागतिक स्तरावर महत्त्वाकांक्षी विकासाच्या दिशेने पुढील पाऊल आहे. न्यूयॉर्कपासून पॅरिसपर्यंत ब्रँडच्या रनवे उपस्थिती भारतीय फॅशनच्या दीर्घकाळापर्यंत जागतिक स्तरावरील विस्ताराला दर्शवते, जेथे आधुनिक भारतीय महिलेच्या अद्वितीय फॅशन शैलीची आता जागतिक स्तरावर चर्चा होत आहे.

या ऐतिहासिक क्षणाबाबत मत व्यक्त करत आदित्य बिर्ला फॅशन अँड रिटेल लि.च्या टीसीएनएस डिव्हिजनचे चीफ एक्झिक्युटिव्ह ऑफिसर अनंत डागा म्हणाले, हे रनवे प्रदर्शन आमच्या ब्रँडसाठी, तसेच भारतीय फॅशनसाठी महत्त्वपूर्ण टप्पा आहे. वर्षानुवर्षे आम्ही भारतीय एथनिक वेअरकडे जगाचा पाहण्याचा दृष्टिकोन बदलत आहोत, परंपरा व आधुनिकतेचे संयोजन करत आधुनिक भारतीय महिलांशी संलग्न होणारी फॅशन निर्माण करत आहोत. पॅरिसच्या रनवेवर आमच्या डिझाइन्स सादर होताना पाहणे, हे अत्यंत प्रभावी आणि खास आहे. गेल्या वर्षी न्यूयॉर्कमध्ये आंतरराष्ट्रीय मंचावर पाऊल ठेवल्यानंतर आता आमचे कलेक्शन पॅरिसमध्ये नेणे स्वाभाविक प्रगती आहे. यासह आमचा विश्वास अधिक दृढ झाला आहे की, भारतीय डिझाइन, संस्कृती आणि शैली यांना जागतिक फॅशन विश्वात हक्काचे स्थान आहे. आणि ही तर फक्त सुरुवात आहे. पॅरिस फॅशन वीकमध्ये डब्ल्यूने सण-उत्सव, विशेष प्रसंगांसाठीचे पेहराव आणि समकालीन डिझाइन्सचे विशेष रनवे प्रदर्शन सादर केले. प्रत्येक लूकमधून आजच्या भारतीय स्त्रीची जीवनशैली दिसून आली, ज्यामध्ये स्टायलिश आकर्षकता आणि सहज परिधान करता येण्याजोगी सुलभता यांचे संतुलन होते, जे जागतिक प्रेक्षकांसाठी अतिशय बारकाईने संकल्पित करण्यात आले होते. हे प्रदर्शन फक्त वेशभूषा किंवा उच्च-स्तरीय फॅशनपर्यंत मर्यादित राहिले नाही, तर हाय-स्ट्रीट इंडियन एथनिक वेअरने जागतिक फॅशनच्या सर्वात प्रभावशाली मंचावर आत्मविश्वासाने पाऊल ठेवले आणि आंतरराष्ट्रीय डिझाइनच्या सर्वोच्च स्तरावर आपले स्थान दृढ केले. पारंपारिक कारागिरी आणि समकालीन डिझाइनच्या विनासायास संयोजनासह डब्ल्यूफॉरविमेन सतत सर्जनशीलतेमध्ये येणाऱ्या मर्यादांना दूर करत आहे आणि आधुनिक एथनिक फॅशनमध्ये नवीन निकष स्थापित करत आहे. पॅरिस फॅशन वीकमधील जागतिक पदार्पणानंतर प्रत्येक नवीन कलेक्शन समर गाथेला सांगते, ज्यामध्ये परंपरा आणि उन्हाळ्यामधील परिधान करण्यात अनुकूल पेहरावामधील आधुनिकतेचे संयोजन आहे.

सण-उत्सव, सुट्ट्या आणि सोनेरी क्षणांसाठी डिझाइन केलेले हे पोशाख समुद्रकिनाऱ्यावरील सुट्ट्यांपासून शहरात फेरफटका मारण्यापर्यंत सहजपणे शोभून दिसतात. हे कलेक्शन आधुनिक भारतीय शैलीतील उत्साहीपणा, सुलभता आणि अद्वितीय आकर्षकतेला सादर करते. सौम्य पेस्टल रंग, अलौकिक सिल्हूट्स आणि नाजूक नक्षीकाम यांच्या संयोजनातून समर वेडिंग्जचा उत्साहवर्धक भाव टिपण्यात आला आहे. हलकेफुलके कापड आणि गुंतागुंतीची उत्कृष्ट कारागिरी उत्तम पेहरावांची निर्मिती करते, जे वैभवशाली, डौलदार आणि कालातीत वाटतात. आकर्षक द्विरंगी रंगसंगती आणि पृष्ठभागावरील उठावदार तपशील समकालीन भारतीय पेहरावाच्या या शैलीला सादर करतात. हलकी आणि झळाळी असलेली रूपरेषा सूर्यप्रकाशित दिवसातील सोहळ्यांसाठी आणि उन्हाळ्यातील भव्य मेळाव्यांसाठी सुसंस्कृत वॉर्डरोब तयार करते, ज्यामध्ये स्पष्ट जागतिक संवेदनशीलता दिसून येते. आकर्षक प्रिंट्स, उत्साही सिल्हूट्स आणि लक्षवेधक नक्षीकाम उत्सवाचा आनंद द्विगुणित करतात. हवेत लहरणारे केप्स आणि मोहक पोटील्स यांसारखे विचारपूर्वक जोडलेले पैलू उत्सवी पोशाख व साजरीकरणामध्ये समकालीन उत्साहाची भर करतात. आरामदायी सिल्हूट्स, गडद प्रिंट्स आणि ग्राफिक डिझाइन्स भारतीय रिसॉर्ट वेअरला नवीन रूपात सादर करतात. अत्यंत प्रभावी आणि वैविध्यपूर्ण असलेले हे लुक्स उन्हाळ्यातील सहली आणि सुट्ट्यांमधील आनंदाला सादर करतात.

## थोडक्यात पण महत्वाचे...



## येरवडा खुल्या कारागृहात द्वि हृदय ध्यान धारणा सत्राचे आयोजन

पुणे (दैनिक संध्या) : अप्पर पोलीस महासंचालक व महानिरीक्षक(कारागृह सुधारसेवा,महाराष्ट्र राज्य पुणे) विशेष कारागृह महानिरीक्षक योगेश देसाई तसेच कारागृह उप महानिरीक्षक(पश्चिम विभाग) सुनील ढमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली दिनांक१२/०३/२०२६ रोजी येरवडा खुले कारागृह येथे कैद्यांसाठी विशेष' ट्विनहार्ट हार्ट मेडिटेशन'या सत्राचे आयोजन करण्यात आले होते.दुपारी३.३० ते ४.३० या वेळेत विद्या प्राणिक हिलिंग फाउंडेशनच्या स्वयंसेवकामार्फत हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमासाठी फाउंडेशनचे स्वयंसेवक संपदा परदेशी,प्रशिक्षक ज्योतिका पवार,सुनयना पाटील,आणि योगेश परदेशी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. येरवडा खुले जिल्हा कारागृहाचे अधीक्षक शामकांत शेडगे यांच्या हस्ते सर्व मान्यवरांचे स्वागत करण्यात आले.कार्यक्रमाच्या सुरुवातीला प्राणी व ट्विन हार्ट मेडिटेशनच्या लाभाविषयी कैद्यांना परिचयात्मक माहिती देण्यात आली आणि त्यानंतर मार्गदर्शन आणि ध्यान सत्र घेण्यात आले.कैद्यांमध्ये अंतर्मनाची शांतता,भावनिक स्थैर्य आणि मानसिक स्वास्थ्य वृद्धिंगत करणे हा या सत्राचा मुख्य उद्देश होता.प्राणिक हिलिंगही विना औषध व विना स्पर्श उपचार पद्धती असून त्याचे संस्थापक ग्रँडमास्टर चोआ कॉक सुई यांनी शारीरिक व मानसिक आरोग्यासाठी हे तंत्र विकसित केले आहे.आपल्या ऊर्जा शरीरावर प्राणशक्तीचा वापर करून याद्वारे उपचार केले जातात. जगभरातील१२० पेक्षा अधिक देशांमध्ये या परिणामकारक पद्धतीचा प्रसार झालेला आहे.सत्राच्या शेवटी घेण्यात आलेल्या प्रश्नोत्तराच्या संवादात्मक भागात सहभागी कैद्यांनी उत्साहाने सहभाग नोंदवून आपले अनुभव आणि सकारात्मक अभिप्राय व्यक्त केले.याप्रसंगी अधीक्षक शामकांत शेडगे,वरिष्ठ तुरुंगाधिकारी नागेश कांबळे,सुभेदार सुनील गायकवाड,हवालदार राजेंद्र धनगर,प्रकाश भोसले,कारागृह शिपाई संतोष भिंगारे,निलेश मांढरे,मोसिन जमादार,महिला शिपाई शैला कदम यांच्यासह बंदी बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## आमदार सुनील कांबळे यांच्या आमदार निधीतून विविध कामांचे भूमिपूजन



पुणे (दैनिक संध्या) : पुणे कॅन्टोन्मेंट मधील भीमपुरा भागातील नागरिकांच्या अनेक वर्ष जुन्या ड्रेनेज लाईन बदलून नवीन लाईन तसेच पाण्याच्या नवीन लाईनच्या कामाला अखेर यश आले आहे. पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदार संघाचे आमदार सुनील कांबळे यांच्या आमदार निधीतून भीम पुरा गल्ली क्रमांक 1 ते 21 या सर्व ठिकाणी नवीन पाणी पुरवठ्याच्या पाईपलाईन तसेच ड्रेनेज लाईनचे विविध कामाचे शुभारंभ आमदार सुनील कांबळे यांच्या हस्ते नुकताच झाले. यावेळी पुणे महानगरपालिकेतील नगरसेवक निलेश आल्हाट,ॲड, प्रशांत यादव, दिलीप गिरमकर, सचिन मथुरावाला, शैलेश बिडकर अमित वोरा, संतोष इंदूरकर, विनायक काटकर पुरुषोत्तम पिल्ले संजय व्हावळ, सोनी भिंगेवाड, नीता पत्की, भारतीय अंकलेलू, नंदू मोटाडू, वैष्णवी झुंबरे,मनीष परदेशी, हरीश बनसोडे, आदि उपस्थित होते. कार्यक्रमाचे आयोजन भारतीय जनता पार्टी पुणे कॅन्टोन्मेंट ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष व शिवसेवा भीमसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष ज्ञानेश्वर कांबळे यांनी केले होते. भारतीय जनता पार्टीचे पुणे शहर उपाध्यक्ष शशिधर पुरम यांनी सूत्रसंचालन केले तर आभार ज्ञानेश्वर कांबळे यांनी मानले.

## बारामतीच्या कृषी महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांचे UPSC मध्ये यश




■ प्रज्वल पोळ याला अखिल भारतीय क्रमांक 434 ; IRS (Income Tax) सेवेत संधी मिळण्याची शक्यता

बारामती (दैनिक संध्या) : ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय,बारामती येथील माजी विद्यार्थी प्रज्वल राजू पोळ (बॅच 2018–2022) याने संघ लोकसेवा आयोगाच्या UPSC परीक्षेत अखिल भारतीय क्रमांक (AIR) 434 मिळवत उल्लेखनीय यश संपादन केले आहे. या यशामुळे त्याला भारतीय राजस्व सेवा (IRS – Income Tax) मध्ये अधिकारी म्हणून काम करण्याची संधी मिळण्याची शक्यता आहे.प्रज्वल पोळ याचे हे यश त्याच्या कठोर परिश्रम,जिद्द आणि चिकाटीचे फलित असून महाविद्यालयासाठी अभिमानाची बाब ठरली आहे.महाविद्यालयात कार्यरत असलेल्या डॉ.शरदचंद्रजी पवार कॉम्पिटिटिव्ह फोरमच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक सुविधा,मार्गदर्शन व अभ्यासाचे योग्य वातावरण उपलब्ध करून दिले जाते. तसेच महाविद्यालयाच्या माजी विद्यार्थी (Alumni) नेटवर्कमुळे विद्यार्थ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन मिळत असते. या यशाबद्दल ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे चेअरमन मा.श्री.राजेंद्रदादा पवार, विश्वस्त मा.सौ.सुनंदा पवार,श्री.विष्णुपंत हिंगणे,मुख्य कार्यकारी अधिकारी मा.श्री.नलावडे सर, उपप्राचार्य मा.श्री. संदीप गायकवाड तसेच डॉ.शरदचंद्र पवार कृषी महाविद्यालय,बारामती येथील प्राध्यापक व कर्मचारी वर्ग यांनी त्याचे अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

## कोळी नटसम्राट राजेश खर्डे वेसावकर यांच्या हस्ते दांडी फेस्टिवलचे सुरत येथे उद्घाटन



भिवंडी (दैनिक संध्या) : दांडी सी फूड फेस्टिवल 2026 सुरत गुजरात येथे नुकताच झालेल्या प्रेक्षकांनी उदंड प्रतिसाद दिलेल्या गांडीची फूड फेस्टिवल 2026 मध्ये मोठ्या संख्येवर खवय्यांनी विविध मच्छी प्रकारांवर चवीचा आस्वाद घेऊन, अत्यंत तृप्तीने खूप आनंद व्यक्त केला. याप्रसंगी दांडी फेस्टिवलच्या उद्घाटन फित कापून मुंबईमधील कोळी नटसम्राट राजेश खर्डे यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी मत्स्य व्यवसाय मंत्री मुकेश भाई पटेल सुरत पोलीस कमिशनर अनुपम सिंग जी कार्यक्रमाचे अध्यक्ष प्रदीप नाविक जी आणि सिने अभिनेता अक्षय आनंदजी, आमदार, खासदार,नगरसेवक,मान्यवर व वर्सोवा कोस्टल सी फूड आणि परंपरा वेसावकारांची या कार्यक्रमाचे सर्व कलाकार देखील याप्रसंगी आवर्जून उपस्थित होते.

# छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती



नाझरे सुपे (दै. संध्या)

पुरंदर येथे प्रस्तावित असलेल्या छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाच्या उभारणीसाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग देण्याच्या दृष्टीने राज्य शासनाने महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. या प्रकल्पासाठी आवश्यक असलेल्या जमिनीच्या संपादनाबाबत शासनाने अधिसूचना प्रसिद्ध केली असून संबंधित क्षेत्राला शासनमान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे विमानतळ प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेला गती मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ, पुरंदर या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी मोठ्या प्रमाणावर जमीन संपादन करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या पार्श्वभूमीवर दिनांक 09 फेब्रुवारी 2026 रोजी 1216.7522 हेक्टर आर क्षेत्रास कलम 32 (1) नुसार शासनमान्यता देण्यात आली असून त्यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली आहे. सदर अधिसूचनेनुसार या क्षेत्रातील भूसंपादन प्रक्रिया राबविण्यात येणार असून विमानतळ प्रकल्पासाठी आवश्यक जमीन उपलब्ध करून देण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. तसेच भूसंपादन करताना मोबदल्याच्या वाटपात 10 टक्के भूखंड परताव्यासाठी आवश्यक असलेल्या 254.34 हेक्टर आर इतक्या जमिनींचा चार गावांमधील कलम 32 (1) अंतर्गत प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडे (एमआयडीसी) मंजुरीसाठी पाठविण्यात आला आहे.

या प्रस्तावाला मंजुरी मिळाल्यानंतर संबंधित गावांमधील जमीनधारकांना नियमानुसार भूखंड परतावा देण्याची प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेत पारदर्शकता राखत जमीनधारकांना योग्य मोबदला आणि सुविधा मिळाव्यात यासाठी शासन प्रयत्नशील असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, दिनांक 27 फेब्रुवारी 2026 रोजी पुरंदर विमानतळासाठी जमीन संपादन करण्यासाठी आवश्यक आर्थिक तरतुदीबाबतही शासनाने निर्णय घेतला आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला (एमआयडीसी) हुडको किंवा तत्सम इतर वित्तीय संस्थांकडून स्पर्धात्मक दराने कर्ज घेण्यास शासनमान्यता देण्यात आली आहे. तसेच या कर्जासाठी शासन हमी देण्याबाबतचा निर्णयही जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयामुळे विमानतळासाठी आवश्यक असलेल्या जमीन संपादन प्रक्रियेसाठी निधी उपलब्ध होण्यास मदत होणार असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती मिळण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे. पुरंदर येथील प्रस्तावित आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्प हा पुणे जिल्ह्यासह संपूर्ण राज्याच्या दृष्टीने महत्त्वाचा मानला जात असून भविष्यातील विमान वाहतुकीची वाढती गरज लक्षात घेता या प्रकल्पाला विशेष महत्त्व दिले जात आहे.

पुणे शहर आणि परिसरातील विमानतळ क्षमतेवर वाढता ताण लक्षात घेता पर्यायी आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याचा निर्णय शासनाने घेतला असून पुरंदर येथील हा प्रकल्प त्या दृष्टीने महत्त्वपूर्ण ठरणार आहे. या विमानतळामुळे औद्योगिक, व्यावसायिक तसेच पर्यटन क्षेत्रालाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

> “पुरंदर येथील छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पासाठी भूसंपादन प्रक्रिया वेगाने पूर्ण करण्याच्या दृष्टीने शासनाने आवश्यक निर्णय घेतले आहेत. जमीन संपादन, मोबदला वाटप आणि निधी उपलब्धतेबाबत शासनस्तरावर महत्त्वाच्या अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आल्या असून प्रकल्पाच्या अंमलबजावणीला गती देण्याचा प्रयत्न सुरू आहे,” असे प्रशासनाकडून सांगण्यात आले.

## वारकरी संघाने राबविलेले उपक्रम समाजासाठी प्रेरणादायी : राजाभाऊ चोपदार

### वारकरी सेवा संघ बारामती शहर व तालुका कार्यकारणी जाहीर

बारामती (दै. संध्या)



महाराष्ट्रातील संतांनी समाजसुधारणेचे कार्य करताना जात-धर्म, उंच-नीच असा कोणताही भेदभाव केला नाही.आज मात्र त्यांना जातींच्या चौकटीत ठेवून काही मंडळी काम करीत आहेत.. संतांनी समाज प्रबोधनासाठी केलेले निरपेक्ष कार्य आजही प्रेरणादायी आहे.त्यामुळेच त्यांच्या विचारांचा गौरव शेकडो वर्षे झाली तरी विविध धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून अखंडपणे होत आहे. बारामती शहर व तालुका वारकरी सेवा संघाने राबविलेले सामाजिक व धार्मिक उपक्रमही समाजासाठी प्रेरणादायी व कौतुकास्पद आहेत,असे मत वारकरी सेवा संघाचे राज्य संस्थापक अध्यक्ष राजाभाऊ चोपदार यांनी व्यक्त केले. मोरयानगर,मेडद (ता.बारामती) येथील वारकरी सदन येथे वारकरी सेवा संघाच्या बारामती शहर व तालुका कार्यकारिणी पदाधिकारी व सदस्यांच्या नियुक्तीपत्र प्रदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. त्यावेळी चोपदार बोलत होते.कार्यक्रमास वारकरी सेवा संघाच्या राज्य सचिव ॲड.माधवी निगडे,पुणे जिल्हाध्यक्ष निवृत्ती कोळेकर,माजी जिल्हाध्यक्ष किशोर कामठे, बाळासाहेब बारवकर, संजय बोरगे,उपाध्यक्ष दत्तात्रय गावडे,मुळशी तालुकाध्यक्ष पांडुरंग दातीर,राजगड तालुकाध्यक्ष ईश्वर चोरघे यांच्यासह वारकरी संप्रदायातील कीर्तनकार व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बारामती तालुका कार्यकारिणीची घोषणा करण्यात आली.त्यामध्ये जगन्नाथ जगताप (अध्यक्ष),दत्तात्रय भोसले (कार्याध्यक्ष),सतीश गावडे व मोहनराव भांडवलकर (उपाध्यक्ष),निखिल कदम (सचिव), ॲड.दिक्षाताई गाढवे (सहसचिव), सोमनाथ भिले (प्रसिद्धी प्रमुख), बबनराव तावरे (संघटक), प्रियाताई जगताप (सहसंघटक), गणेश शिंदे (संपर्क प्रमुख), वैष्णवी पवार (सहसंपर्क प्रमुख) व गोविंद चव्हाण (मार्गदर्शक) यांची निवड करण्यात आली. तसेच तालुक्यातील १८ जणांना सदस्य म्हणून नियुक्तीपत्रे देण्यात आली. बारामती शहर कार्यकारिणीत श्रीकांत झोरे (शहराध्यक्ष),सचीन गवारे (कार्याध्यक्ष),नितीन चालक व ज्ञानेश्वर गावडे (उपाध्यक्ष),नानासो झांबरे (सचिव),प्रकाश कोळी (सहसचिव),संजय धुमाळ (खजिनदार),हणुमंत देवकाते (सहखजिनदार), राजेंद्र शिर्के (प्रसिद्धी प्रमुख),राजेंद्र सोळसकर (मार्गदर्शक),गणेश जोजारे (मार्गदर्शक),शत्रुघ्न घुले (संघटक),लहु तावरे (सहसंघटक),अजित खटके (कार्यवाहक) व सचिन शिंदे (संपर्क प्रमुख) यांची निवड करण्यात आली. दरम्यान,या कार्यक्रमात वारकरी सेवा संघाच्या इंदापूर तालुका अध्यक्षपदी सतीश खराडे व सचिवपदी अंकुश बनसोडे यांना नियुक्तीपत्रे देण्यात आली. येत्या १५ दिवसांत इंदापूर तालुका कार्यकारिणीची निवड करण्यात येणार असल्याचे तालुकाध्यक्ष खराडे यांनी सांगितले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक बाळासाहेब बारवकर यांनी केले.सूत्रसंचालन दत्तात्रय भोसले व गणेश जोजारे यांनी केले. नानासो झांबरे व जगन्नाथ जगताप यांनी आभार मानले.निखिल महाराज कदम यांच्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली.

## बारामतीमध्ये आदर्श आचारसंहिता लागू

### संबंधित प्राधिकरणाची परवानगी आवश्यक

बारामती (दै. संध्या)

भारत निवडणूक आयोग,नवी दिल्ली यांचे आदेश दिनांक 15/03/2026,मुख्य निवडणूक अधिकारी महाराष्ट्र राज्य,मुंबई यांचे निर्देश तसेच जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी,पुणे यांचे आदेश यांच्या अनुषंगाने दिनांक 15/03/2026 पासून आदर्श आचारसंहिता लागू करण्यात आलेली असून याबाबत बारामती शहर पोलीस स्टेशन हद्दीतील सर्व नागरिकांना कळविण्यात येते की, आचारसंहिता लागू झाल्यानंतर सर्व राजकीय पक्ष,पदाधिकारी,कार्यकर्ते तसेच नागरिकांनी निवडणूक आयोगाने घालून दिलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे. आचारसंहितेच्या कालावधीत सार्वजनिक ठिकाणी सभा,मोर्चे,प्रचार रॅली,मिरवणुका, ध्वनीक्षेपकाचा वापर, बॅनर,पोस्टर,फ्लेक्स किंवा भित्तीपत्रके लावणे यासाठी संबंधित प्राधिकरणाची पूर्वपरवानगी घेणे आवश्यक आहे. परवानगीशिवाय असे कार्यक्रम आयोजित करणे, सार्वजनिक संपत्तीवर अनधिकृत जाहिराती लावणे,मतदारांना पैसे,भेटवस्तू किंवा इतर कोणत्याही प्रकारचे प्रलोभन देणे,जातीय अथवा धार्मिक भावना भडकविणारी वक्तव्ये करणे किंवा निवडणूक प्रक्रियेवर परिणाम होईल अशी कोणतीही कृती करणे हे कायद्याने दंडनीय आहे. तसेच सोशल मीडियाच्या माध्यमातून अफवा,चुकीची माहिती किंवा आक्षेपार्ह मजकूर प्रसारित करणे टाळावे. अशा प्रकारचे कृत्य आढळल्यास संबंधितांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल. आचारसंहितेची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी बारामती शहर पोलीस स्टेशनकडून विशेष गस्त,नाकाबंदी, वाहन तपासणी मोहीम तसेच इतर प्रतिबंधात्मक उपाययोजना राबविण्यात येत असून नियमांचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्तींवर संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल.



## जेजुरी उद्योजक संघाच्यावतीने जीमा लीग क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी उद्योजक संघाच्या वतीने औद्योगिक वसाहतीतील उद्योजक व कामगारांच्या खेळाला प्रोत्साहन देण्यासाठी जीमा प्रीमियर क्रिकेट लीग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले असून या स्पर्धेचे उद्घाटन होऊन स्पर्धेला सुरुवात झाली आहे. जेजुरी कडेपठार रस्त्यावर असणाऱ्या पानसरे क्रिकेट टर्फ वर या स्पर्धा खेळवले जात असून या स्पर्धेचे उद्घाटन किर्लोस्कर फेरस कंपनीचे जब्बार पठाण, श्री मार्तंड देवसंस्थानचे माजी विश्वस्त नितीन राऊत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी जेजुरी उद्योजक संघाचे अध्यक्ष डॉ रामदास कुटे,पदाधिकारी रवींद्र जोशी,पांडुरंग सोनवणे,राजेश पाटील,शकील शेख,अनंत देशमुख,नगरसेवक प्रशांत लाखे,इंडियाना कंपनीचे शेखर बारभाई आदी उपस्थित होते.

## भिगवणला मराठा महासंघाने केला विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्यांचा गौरव

### ज्ञानदानाबरोबरच पाठीवर कौतुकाची थाप टाकणाऱ्या उपक्रमाचे मान्यवरांनी केले कौतुक

भिगवण (दै. संध्या)



भिगवण ( ता.इंदापुर) येथील अखिल भारतीय मराठा महासंघाच्या वतीने चालवण्यात येणाऱ्या छत्रपती शिवराय वाचनालयाच्या वतीने भिगवण व परिसरातील विविध क्षेत्रात प्राविण्य मिळवलेल्या तब्बल ४० व्यक्तींचा सन्मान वेंकटेश लॉन्स शेजारील हॉटेल विश्वजीत येथे रविवार( ता.१५) रोजी संपन्न झाला. यामध्ये शैक्षणिक, सामाजिक, राजकीय कला व क्रीडा क्षेत्रात यश संपादन केलेल्या व्यक्तींचा दत्तकला शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रा. रामदास झोळ, इंदापूर पंचायत समिती सदस्या हेमा माडगे, पुणे जिल्हा परिषद च्या माजी सदस्या प्रमिला जाधव यांच्या हस्ते शाल, श्रीफळ व स्मृतीचिन्ह देऊन सन्मान केला. यावेळी इंदापूर नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष बाळासाहेब ढवळे, करमाळा पंचायत समितीचे उपसभापती ॲड.अजित विघ्ने, इंदापूर अर्बन बँकेचे संचालक अशोक शिंदे, बाळासाहेब भांडवलकर यांनी मराठा महासंघाच्या वतीने गेले २५वर्ष चालवण्यात येत असलेल्या राजमाता जिजाऊ व्याख्यानमालेचे कौतुक करत समाजातील सर्व घटकांना बरोबर घेऊन जात ज्ञानदानाबरोबर सामाजिक सलोखा राखत यश संपादन करणारा व्यक्तीच्या पाठीवर कौतुकाची थाप टाकणाऱ्या या उपक्रमाचे कौतुक केले.

कार्यक्रमास मराठा महासंघाचे शाखाध्यक्ष डॉ. संकेत मोरे, पद्माकर माडगे,डॉ. जयप्रकाश खरड, छगन वाळके, अजित रणदिवे, सुनील वाघ, सुचिता साळुंखे, आधी पदाधिकाऱ्यांसह महासंघाचे कार्यकारणी सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन सुहास गलांडे, प्रस्ताविक महासंघाचे पुणे जिल्हा संघटक राजकुमार मस्कर यांनी केले तर आभार मराठा महासंघाचे पुणे जिल्हा अध्यक्ष ॲड.पांडुरंग जगताप यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी विकास वाघ, विजयकुमार गायकवाड, दत्तात्रय जाधव, दिनानाथ मारणे, दिपक वाघ, दिपक सूर्यवंशी, सतिश काळे,अनिल गलांडे, अभिनव वाघ, वाचनालयाचे ग्रंथपाल दादा रणसिंग यांनी विशेष परिश्रम घेतले

# वडगावशेरी मतदारसंघातील तरुण-तरुणींसाठी आशेचा किरण

## रोजगार मेळाव्यात टाटा मोटर्समध्ये नोकरीची संधी

पुणे (दै. संध्या)

सुरेंद्र पठारे फाऊंडेशन व सह्याद्री बहुउद्देशीय संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या रोजगार मेळाव्याला युवक वर्गाने उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. वडगावशेरी येथील रामचंद्र सभागृहात शनिवार (ता. १४) रोजी भरवलेल्या मेळाव्यात टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल्स लिमिटेडच्या वतीने २७५ पात्र उमेदवारांची निवड करण्यात आली.

मेळाव्यात वडगावशेरी मतदारसंघातील बारावी, आयटीआय, बी.ए., बी.एस्सी., बी.कॉम. तसेच डिप्लोमा उत्तीर्ण एकूण ३७६ तरुण-तरुणींनी सहभाग नोंदवला. राष्ट्रीय शिकाऊ प्रशिक्षण योजना अंतर्गत पिंपरी चिंचवड येथील टाटा मोटर्स कमर्शियल व्हेईकल्स लिमिटेड येथे रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यात आली. निवड झालेल्या उमेदवारांना दरमहा ₹१७,१९५ विद्यावेतन (स्टायपेंड), कंपनीकडून मोफत जेवण व बस सुविधा तसेच एक वर्षाचा प्रशिक्षण कालावधी देण्यात येणार आहे.

विशेष म्हणजे पात्र उमेदवारांना त्वरित कामावर रुजू होता, यावे यासाठी टाटा मोटर्सचे सय्यद यांच्या हस्ते ऑफर लेटर देण्यात आले. सोमवार (ता. १६) पासून निवड झालेले उमेदवार रुजू होत आहेत.



मेळाव्याबद्दल बोलताना सुरेंद्र पठारे फाऊंडेशनचे अध्यक्ष व नगरसेवक सुरेंद्र पठारे म्हणाले, "पूर्व पुण्यातील तरुण-तरुणींना रोजगारासाठी दूर भटकावे लागू नये व टाटा मोटर्स समूहातील नोकरीची कंपनीत संधी मिळावी, हा या रोजगार मेळाव्याचा मुख्य उद्देश होता. नोकरी क्षेत्र तसेच युवक वर्ग यांच्यामध्ये एक पूल निर्माण करण्याचा हा प्रयत्न असून अशा उपक्रमांमधून अधिकाधिक तरुणांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी पुढेही प्रयत्न सुरू राहतील."

पुणे महानगरपालिका शिक्षण समिती सदस्या व नगरसेविका ऐश्वर्या पठारे म्हणाल्या, आज अनेक तरुण-तरुणी शिक्षण पूर्ण करून रोजगाराच्या संधी शोधत असतात. त्यांना योग्य मार्गदर्शन आणि संधी मिळाली तर ते निश्चितपणे यशस्वी होऊ शकतात. या रोजगार मेळाव्याच्या माध्यमातून अनेकांना त्वरित नोकरीची संधी मिळाली, ही आनंदाची बाब आहे. भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे तरुण-तरुणींना सक्षम करण्यासाठी सातत्याने काम केले जाईल."

सह्याद्री बहुउद्देशीय संस्थेचे संस्थापक अध्यक्ष गणेश सातव यांनीही निवड झालेल्या उमेदवारांचे अभिनंदन करत शुभेच्छा दिल्या.

"मेळाव्याची संपूर्ण प्रक्रिया अत्यंत सोपी, पारदर्शक आणि नियोजनबद्ध पद्धतीने पार पडली. नोंदणीपासून मुलाखतीपर्यंत सर्व टप्पे व्यवस्थित पार पडल्यामुळे आम्हाला कोणतीही अडचण आली नाही. तसेच, मुलाखतीनंतर त्वरित ऑफर लेटर मिळाल्याने निश्चितच आनंद होतोय. सध्या बेरोजगारीची समस्या वाढत असताना नोकरी मिळणे कठीण झाले होते; अशा परिस्थितीत या रोजगार मेळाव्यामुळे आमच्यासाठी आशेचा किरण निर्माण झाला", असे सहभागी उमेदवारांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

मेळाव्यात सहभागी झालेल्या तरुण-तरुणींनीही समाधान व्यक्त करत सुरेंद्र पठारे फाऊंडेशन व सह्याद्री बहुउद्देशीय संस्थेचे आभार व्यक्त केले.